नागपूर महानगरपालिकेच्या दि.19.08.2017 शनिवार रोजी दुपारी 12.05 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| 6. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 7. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 8. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 9. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 10. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 11. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 12. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 13. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 14. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 15. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 16. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 17. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 18. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 19. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 20. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 21. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 22. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 23. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 24. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 25. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 26. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 27. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 28. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 29. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 30. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 31. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 32. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 33. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 34. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 35. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 36. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 37. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 38. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 39. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 40. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 41. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 42. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 43. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 44. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 45. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 46. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 47. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 48. | 14 | अ | शिल्पा ईशांत धोटे | सदस्या |
| 49. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 50. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 51. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 52. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 53. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 54. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 55. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 56. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 57. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 58. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 59. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 60. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 61. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 62. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 63. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 64. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 65. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 66. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 67. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 68. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 69. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 70. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 71. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 72. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 74. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 75. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 76. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 77. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 78. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 79. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 80. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 81. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 82. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 83. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 84. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 85. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 86. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 87. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 88. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 89. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 90. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 91. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 92. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 93. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 94. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 95. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 96. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 97. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 98. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 99. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 100. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 101. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 102. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 103. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 104. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 105. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 106. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 107. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 108. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 109. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य |
| 110. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 111. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 112. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 113. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 114. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 115. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 116. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 117. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 118. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 119. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 120. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 121. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 122. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 123. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 124. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 125. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 126. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 127. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| **128.** | **35** | **अ** | ——————(रिक्त १०.४.२०१७ पासून) | **रिक्त पद** |
| 129. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 130. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 131. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 132. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 133. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 134. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 135. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 136. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 137. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 138. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 139. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 140. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 141. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 142. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 143. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| 144. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 145. | मानद सदस्य | | रिक्त | |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 2. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 4. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 6. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 7. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 8. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 9. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 10. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 11. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

<u>उपस्थित अधिकारी</u>

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त

श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः— सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

<u>ठराव क्रमांक 77</u> :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

## <u>अभिनंदन प्रस्ताव</u>

### <u>रामनाथ कोविंद</u>

भारताचे 14 वे राष्ट्रपती म्हणून माननीय श्री. रामनाथ कोविंद यांची बहुमताने निवड झाली व त्यांनी दिनांक 20 जुलै, 2017 रोजी पदभार स्विकारला. श्री. रामनाथ कोविंद यापूर्वी बिहारचे राज्यपाल होते. एका सामान्य दलित कुटुंबातील व्यक्ती भारतीय प्रजासत्ताकाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपति पदावर विराजमान झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### <u>व्यंकय्या नायडू</u>

भारताचे 13 वे उपराष्ट्रपती म्हणून माजी शहरी विकासमंत्री माननीय श्री.एम.व्यंकय्या नायडू हे बहुमताने निवडून आले असून त्यांनी दिनांक 11 ऑगस्ट, 2017 रोजी उपराष्ट्रपती व राज्यसभेचे पदसिध्द सभापती म्हणून सूत्रे स्वीकारली. सार्वजनिक जीवनात समाजकारणा सोबतच राजकारण करतांना भा.ज.पा.चे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय मंत्री व राज्यसभेचे खासदार म्हणून तब्बल 40 वर्षे राजकीय सेवा देणाऱ्या सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्तीची या महत्वपूर्ण पदावर यांची निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### <u>डॉ.विकास महात्मे</u>

खासदार व प्रसिद्ध नेत्रचिकित्सक पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांची भारतीय नर्सिंग परिषदेचे सदस्य म्हणून निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### <u>प्रतापसिंह पाटणकर/अंकुश शिंदे</u>

पोलिस दलात उत्कृष्ट  कामगिरी केल्याबद्दल नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक प्रतापसिंह पाटणकर आणि नक्षलविरोधी अभियानाचे उपमहानिरीक्षक अंकुश शिंदे यांना राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>संजय भेंडे</u>**

नागपूर नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष तसेच ज्येष्ठ सहकार नेते प्रा. संजय भेंडे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या प्रशासकीय मंडळावर संचालक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>अविनाश शेंडे (म.न.पा. शाळेचा विद्यार्थी)</u>**

म.न.पा. दुर्गानगर माध्यमिक शाळेत वर्ग 9 व्या वर्गात शिकणारा विद्यार्थी अविनाश शेंडे याने दि. 31/07/2017 रोजी शाळेतून घरी जात असतांना खानखोजे नगर, काली माता मंदीराजवळ राजू महादेव लोणार यांच्या घरी धूर निघतांना बघितले त्या ठिकाणी गर्दी जमा होती. तेव्हा या विद्यार्थ्याने त्वरीत अग्निशामक व पोलिस विभागाला फोन करून सूचित केले. व तो स्वतः आग लागलेल्या घरी आत जावून तेथील घरातील लोकांना बाहेर काढले व बासाने सिलेंडरचे कॉक बंद केले. त्याने दाखविलेल्या या धाडसाबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्याचे विशेष रूपाने हार्दीक अभिनंदन करीत आहे.

महापौर :— सन्माननिय सदस्य, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करीत आहे आता 12 वाजून 10 मिनीटे झालेली आहे, प्रश्नोत्तराला 1 तास देण्यात येतील.

प्रश्न क्र.23:— नागपूर महानगरपालिकेच्या संपूर्ण शहरातील जेटींग—डिसेंल्टींगच्या संदर्भात प्रश्न.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या सभेच्या खालील कार्यवृत्त कायम करण्याचा विषय आहे. आणि या विषयामध्ये दि. 20.06.2017 ला ग्रंथालय अधिक्षकांची  शैक्षणिक अर्हता काय आहे ?

महापौर :— विषय पत्रिका जेव्हा पुकारण्यात येईल तेव्हा हा विषय घेवू सुरुवातीला प्रश्नोत्तर घेण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, विषयपत्रिकेमध्ये सुरुवातीलाच कार्यवृत्त कायम करण्याचा विषय आहे आणि या सभागृहामध्ये रुलिंग दिले होते की आयुक्त चौकशी करुन अहवाल देईल.

महापौर :— सन्माननिय सदस्य, तुमचे सर्व मान्य आहे सुरुवातीला प्रश्नोत्तर घेण्यात येईल नाही तर ते अर्धवट राहील,

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, कार्यवृत्त कायम करण्याचा विषय पहिला आहे आणि प्रश्नोत्तराचा विषय नंतर आहे, विषय पत्रिकेनुसार आपण पहिले चालायला पाहिजे की नाही ?

श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन भलेही विषयपत्रिकेपर पहला विषय है लेकीन पहले कौनसा विषय लेना है यह  महापौरजी का अधिकार है।

**<u>प्रश्न क्र 23</u>**:— नागपूर महानगरपालिकेच्या संपूर्ण शहरातील जेटींग—डिसेंल्टींगच्या संदर्भात प्रश्न.

आयुक्त :— लेखी दिल्याप्रमाणे

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आपल्या महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागामध्ये ज्या जेटींगच्या गाडया आपल्या येथे लावलेल्या आहे आणि त्या गाडयावर वार्षिक किती खर्च करण्यात आलेला आहे याची माहिती आपण दयावी.

महापौर :— विभाग प्रमुखांनी माहिती दयावी.

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :— मा.महापौरजी, जेटींग सक्शन गाडया आपण 3 विभागाकडे लावल्या आहे मागील वर्षी 2 कोटी 31 लाख 16 हजार 448 रु खर्च करण्यात आले आहे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आतापर्यंत आपण किती पैसे त्या जेटींग वाल्यांला दिले आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.विरोधी पक्षनेता श्री.तानाजी वनवे यांचा प्रश्न आहे, यामध्ये टेन्डर कुठल्या वर्षी झाले होते, आपण याला दिवसाच्या आधारावर पेमेंट करतो की कामाच्या आधारावर करतो, एकुण किती

मशीन आहे, याचे नीट डिटेल सांगा.

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, आपल्या कडे 3 मशीन घेण्यात आल्या होत्या आणि टेन्डर 2010 मध्ये झाले होते,

अपर आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये 10 मशीन आहेत 3 मशीन किरायाने घेतलेल्या होत्या. ज्या मशीन किरायाने घेतल्या त्यापैकी 2 मशीन 2011 मध्ये किरायाने घेण्यात आलेल्या होत्या त्याचे जे अॅग्रीमेंट होते ते 2011 ते 2017 या कालावधीसाठी होते. आणि किराया जो रिईस्टेट झालेला होता त्यापैकी एकुण प्रती 8 तासाकरिता 48 हजार रुपये या प्रमाणे लागलेला होता, यात दरवर्षी वाढ प्रमाणे

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, 8 तासाकरिता 48 हजार रुपये, मशीन दिवसभरात किती कॉल अटेंड करते. समजा काल ही मशीन चालली तर काल दिवसभरात किती काम केले याचा काही आलेख आहे काय? की मशीन 8 तास मशीन उभी राहणार आहे आणि त्याला 48 हजार रुपये देणार आहे काय? समजा 8 तासामध्ये त्यांनी एकही कॉल अटेंड नाही केला तरी त्या 8 तासाचे पैसे मोजायचे आहेत काय?

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, नाही.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, याचा अर्थ तुम्ही कामाच्या भरवश्यावर मशीन घेतली आहे. ज्या दिवशी ती मशीन चालली नाही त्या दिवशी त्याचे पेमेंट केले आहे काय? या संदर्भात माहिती आहे काय?

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, या संदर्भात माहिती नाही.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माहिती नसेल तर माहिती घेवुन येण्याची जबाबदारी कोणाची आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला तो या साठी की 8 तास मशीन उभी असेल आणि त्याला आपण पेमेंट केल्याची तक्रार आहे. आपण 3 मशीन घेतल्या आणि त्याला रोजचे 8 तासाचे 48 हजार रुपये दिले तर आपण या 5 वर्षामध्ये किती अमाउंट मोजली त्यामध्ये तर 10 मशीन विकत घेता आल्या असत्या, याचा अर्थ असा आहे की तुम्ही टेन्डर काढतांना, काय टेन्डर कंडीशन होत्या, काय अग्रीमेंट होते, ते निट तपासा मा.तानाजी वनवे यांना जे म्हणावयाचे आहे, ते बोलतील पण याचा संपुर्ण अहवाल मा.महापौरजी यांच्याकडे ठेवावा.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, प्रविणजी बोलले ती वस्तुस्थिती आहे ही मशीन माझ्या माहितीप्रमाणे कामच करीत नाही आणि आपण त्याला पैसे देतो दुसरे त्याचे मुल्यमापन करण्याचे कोणतेही साधन नाही. त्याच्या कर्मचा–यांना जे वेतनभत्ते कामगार नियमाप्रमाणे मिळतात ते त्यांना मिळत नाही त्यांची तक्रार माझ्याकडे आहे. म्हणुन कामगार कायद्याचे उल्लंघन त्या कंपनीने केले आहे. आणि त्या कंपनीचे प्रस्त मुंबई,नागपूर, पुणे, या संपुर्ण ठिकाणी आहे. जर ऐवढयाच पैशात जर आपण मशीन घेतल्या आणि महानगरपालिकेमध्ये त्या मशीनसाठी नगरसेवकांना वारंवार फोन करावे लागते, वारंवार विनंती करावी लागते, परंतु मशीन आपल्याकडे मिळत नाही माझी विनंती आहे की आपण या गाडया बंद करुन महानगरपालिकेने स्वतः मशीन घेऊन त्या ठिकाणी आपली पैशाची बचत होईल आणि तो पैसा विनाकरण खर्च केला जातो आणि त्या कंपनीला दिला जातो त्या कंपनीला दिल्या गेलेल्या पैशाची चौकशी करण्यांत यावी, अशी माझी विनंती आहे. आपण संबंधितांवर चौकशी बसवून त्यांना ताबडतोब अहवाल मागवावा, आणि कंपनीचे काम त्वरीत बंद करण्यात यावे अशी मी आपणाला विनंती करतो.

महापौर :– प्रशासनानी या संदर्भात संपुर्ण अहवाल 15 दिवसाच्या आत माझ्याकडे सोपवावा.

**प्रश्न क्र. 24**:– नागपूर शहरात जी.टी.एल. टॉवरची अधिकृतरित्या किती उभारणी झालेली आहे त्यांची संख्या व पत्ता नमूद संदर्भात प्रश्न.

अपर आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी वितरीत केल्याप्रमाणे

श्री.बंटी कुकडे :– मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये अनधिकृत आणि अधिकृत मोबाईल टॉवरची संख्या किती आहे.

महापौर :– प्रशासनानी माहिती दयावी.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, या प्रकरणा बाबत जी पिटीशन झाली होती त्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये जी माहिती दाखल करण्यात आली होती ती माहिती मी आता सादर करते, एकुण 10 झोन अंतर्गत एकुण मोबाईल टॉवर 551 त्यापैकी अनधिकृत मोबाईल टॉवर 126, आणि

ज्यांना नोटीस दिली आहे असे 112 याप्रमाणे यादी आपण मा.उच्च न्यायलयामध्ये दाखल केली आहे.

श्री.बंटी कुकडे :– मा.महापौरजी,एन.आय.टी. च्या हद्दीमध्ये जे मोबाईल टॉवर उभारले गेले आहे त्याची महानगरपालिकेमध्ये आपण नोंद घेतली आहे काय?

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, ही संपुर्ण यादी आहे जी मा.उच्च न्यायालयामध्ये सादर केली होती.

श्री.बंटी कुकडे :– मा.महापौरजी, त्यामध्ये जी.टी.एल. चे मोबाईल टॉवर किती आहे? मी माहिती घेतली महापौरजी, 51 जी.टी.एल. चे टॉवर नागपूर शहरात उभारण्यात आले आहे. त्यापैकी 6 टॉवर अधिकृत आहे. आणि 5 अनधिकृत आहे. 23 तारखेला 6 महिन्यामध्ये आलेले हे पुर्ण विवरण पत्र आहे. त्यामधुन आपल्या सचिवालया मधुन मला दुसरे पत्र आले 20 जुलै 2017 ला यामध्ये म्हटले आहे की 6 अधिकृत आहे. आणि बाकी अनधिकृत आहे. आणि या पत्रामध्ये म्हटल्या जाते की  सहा.आयुक्त झोन क्र 1 ते 10 च्या कार्यालयातुन प्राप्त झालेल्या माहिती नुसार जी.टी.एल. टॉवरची एकुण संख्या 36 आहे. आता नगररचना विभागाने दिलेले पत्र त्यामध्ये 51 जी.टी.एल. चे टॉवर आणि आपल्या सचिवालयामधुन 20 तारखेला आलेले पत्र त्यामध्ये एकुण जी.टी.एल. मोबाईल टॉवरची संख्या 36 ही जी तफावत आहे मला याचे उत्तर पाहिजे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, सचिवालय कार्यालयातुन जी माहिती पुरविण्यात आली आहे त्यामध्ये म्हटले आहे की जी.टी.एल. टॉवर हे 6 टॉवर करिता यापूर्वी तात्पुरती परवानगी देण्यात आलेली आहे. आणि 10 झोन कडुन जी माहिती घेतली त्यामध्ये 36 टॉवर जे अनधिकृत असल्याचे 10 ही झोनच्या सहा.आयुक्तांकडुन माहिती प्राप्त झालेली आहे. ज्या 6 मोबाईल टॉवरला मंजुरी देण्यात आली आहे असे मी नमुद केलेले आहे ते 2011 ला परवानगी देण्यात आलेली आहे तत्कालीन आयुक्तांच्या परवानगीने देण्यात आलेली आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :– पॉईंट ऑफ इन्फॉमेशन, मा.महापौरजी, मा.सदस्यांचा जो प्रश्न होता तो जी.टी.एल. टॉवरच्या संबंधित होता याच्यामध्ये उत्तर जे देण्यात आले त्यात टॉवरची संख्या 36 आहे परंतु नगररचना विभागाचे जे पत्र आहे. दिल  23.06.2017 चे त्याच्यामध्ये जी.टी.एल. टॉवरची संख्या 51 आहे. मा.महापौरजी, एकतर हा प्रश्न शहराच्या विद्रुपीकरणासंबंधात जोडलेला आहे व दुसरा नागपूर महानगरपालिकेच्या महसुलाशी जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासन याचे उत्तर देतांना एकीकडे 36 सांगायचे आणि दुसरीकडे 51 सांगायचे ही जी तफावत आहे, हा जो फरक आहे तो नेमका काय प्रकार आहे ? त्याची देखील माहिती मिळाली पाहिजे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, जे पेज मा.सदस्यांना देण्यात आले आहे त्यामध्ये नमुद आहे की 51 टॉवर बद्दल ज्यावेळी 2011 ला जी माहिती मा.उच्च न्यायालयामध्ये सादर केलेली होती त्याची प्रत देण्यात आलेली आहे. आणि अद्यावत त्यांनी जी आता माहिती विचारली, त्यानुसार आम्ही 10 ही झोनला माहिती विचारली 10 झोनकडुन जी माहिती प्राप्त झाली ती 36 संख्या होती त्यानुसार 36 हा आकडा त्यांना कळविण्यात आलेला आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, याच्यामध्ये आपल्याला असे म्हणायचे आहे काय की मागचे जे 51 टॉवर बद्दल 2011 ला माहिती दिली ते पत्र योग्य नाही आणि आजच्या तारखेला 36 चे पत्र योग्य आहे असे म्हणायचे आहे काय ? त्यांचे म्हणणे तेच आहे की पत्रामध्ये जी तफावत दिसत आहे 15 मोबाईल टॉवरची एक पत्र आपलेचं आहे आणि दुसरे आपण जी माहिती घेतली झोनच्या सहा.आयुक्तांकडुन त्या पत्रानुसार 36 आहे त्यामुळे 36 आहे की 51 आहे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौर महोदय, शक्यता ही असू शकते की 2011 ला जी माहिती देण्यात आली ती संपुर्ण शहराची असेल आणि जी माहिती झोनच्या सहा.आयुक्तांकडुन घेण्यात आली ती झोनच्या कार्यक्षेत्रातील असेल अशी तफावत राहु शकते.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, एकुण टॉवर नागपूर शहरामध्ये किती आहे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, माझ्याकडे असलेल्या माहिती नुसार 551 आहे 2011 च्या माहिती नुसार

श्री.तानाजी वनवे :– आणि अनधिकृत किती आहे?

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, अनधिकृत यापैकी 126 आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे कारण ज्यांच्या घरावर जे टॉवर्स लावले आहे त्यांना यांचा इतका त्रास होतो आहे की त्यांनी अनेक तक्रारी दिलेल्या आहेत.

श्री.धर्मपाल मेश्राम :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, हा प्रश्न महसुली उत्पन्नाशी संबंधित आहे. माझी विनंती अशी आहे की आज तारखेपर्यंत यामध्ये किती महसुली उत्पन्न नागपूर महानगरपालिकेला मिळाले? याची माहिती देण्यात यावी.

महापौर :– प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, जी.टी.एल. टॉवरच्या संदर्भात मला जी माहिती विचारण्यात आलेली होती त्यामध्ये 60 लाख 6 हजार रुपये प्राप्त झाले असल्याची माहिती कळविण्यात आलेली आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी पाईंट ऑफ इन्फॉर्मेशन, मी जो मुद्या या ठिकाणी उपस्थित केला हा महसूलाशी संबंधीत आहे परंतु ज्यांच्या घरावर टॉवर्स लावलेले आहे त्या लोकांच्या तक्रारी आहे ते टॉवर्स बंद करण्यात यावे, परंतु अनेक तक्रारी देवून सूध्दा त्यांचे टॉवर्स बंद करण्याकरिता काही ही पाऊल उचलल्या गेले नाही त्या संदर्भात काही उपाययोजना केलेल्या आहेत काय?

श्री.धर्मपाल मेश्राम :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, माझा जो प्रश्न आहे तो तसाच आहे याच्यामध्ये नागपूर महानगरपालिकेला किती महसुली उत्पन्न मिळाले आहे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, मा.उच्च न्यायलयाच्या आदेशानुसार 2 सप्टेंबर 2014 च्या यामध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे की कुठल्याही मोबाईल टॉवरच्या बाबतीत कुठलेही कोरेसिव्ह स्टेप्स् घेण्याची कार्यवाही करु नये, म्हणजे कुठलेही अनधिकृत टॉवर असेल तर ते पाडण्यात येवु नये तसेच त्यांचे पाण्याचे कनेक्शन आणि विजेचे कनेक्शन बंद करण्यात येवु नये असे स्पष्ट मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, त्यामध्ये हायकोर्टाने उल्लेख केलेला आहे 2014 चे निवाडा पत्र आहे. 2014 नंतर आज 2017 पर्यत इथपर्यत आम्हाला मान्य आहे की पाण्याचे कनेक्शन आणि विजेचे कनेक्शन कापण्यात येवू नये, परंतु यामध्ये नविन परवानगी दयावी किंवा अनधिकृत टॉवर्स उभारण्यात यावे असे काही उल्लेख आहे काय निवाडा पत्रामध्ये? मग आज तारखेपर्यत किती टॉवर्सची उभारणी करण्यात आली ?

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, शहरामध्ये किती अनधिकृत टॉवर्स उभारण्यात आले तदनंतर ही माहिती सहा.आयुक्त झोन कार्यालय यांच्याशी संबंधित आहे नगररचना विभागाशी संबंधित नाही.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी मा.सदस्यांचा प्रश्न असा आहे की ज्या दिवशी मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला त्याच्या आधीचे लोक त्या अंतर्गत येतील, पण त्याच्यानंतर जे काही अनधिकृत टॉवर्स झाले त्या संदर्भात नगरसेवक व नागरिकांनी काही तक्रारी केल्या त्या बाबतीतला निर्णय काय आहे. म्हणजे हाय कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी शहरभर अनधिकृत टॉवर्स उभे करण्याचे आम्ही काही पाऊल उचलले आहे काय? त्या दिनांकाच्या आधीचे टॉवर्स सेक्युरीटी राहतील परंतु त्यानंतरचे टॉवर्सचे काय? मग त्याच्यावर काय कार्यवाही झाली, त्याच्याकडुन काय उत्पन्न मिळाले, त्यांच्यावर आपण काय दंड लावला, या संदर्भातील त्यांचा रेव्हेन्यु चा प्रश्न आहे. तो निर्णय असेल आणि मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मानलेच पाहिजे. परंतु त्या नंतरच्या टॉवर्सचे काय? त्या संदर्भात त्यांची मागणी होती.

श्री.अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी, मा.औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय आला त्यानंतर महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आले त्यामध्ये दर निश्चित करण्यात आले त्याच्यामध्ये आपण परवानगी दिली असेल तर किती रेव्हेन्यु जनरेट झाला.आणि त्या परित्रकामध्ये काय आहे त्याचे वाचन या सभागृहामध्ये व्हावे.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, 2013 आणि 2014 अनुक्रमे केंद्र शासन आणि राज्य शासनाचे आपल्याला डायरेक्शन आहे त्यानुसार पडताळणी मोबाईल टॉवर्सच्या प्रकरणात करण्यात येते .

श्री.तानाजी वनवे :– पाइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, माझे हे म्हणणे आहे की आम्ही उच्च न्यायालयाचा आदर करतो परंतु नागरिकांना जो त्रास होत आहे त्याच्यासंबंधित महानगरपालिकेच्या

वकीलांनी काय भुमिका घेतली नागरिकांच्या हितांच्या संबंधित कारण ज्या तक्रारी वारंवार येतात. आपण कोर्टांना माहिती खरी दिली नाही म्हणुन न्यायालयाने तसे आदेश दिले असतील परंतु न्यायालयाला आपल्या कडुन काही माहिति दिल्या गेली काय? त्याची काही प्रत आहे काय आपल्याकडे?

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, 2014 नंतर कोर्टाला अशी काही माहिती दिल्या गेली काय अशी माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, एक अत्यंत संवेदनशील विषय आहे सन्माननिय सदस्य बंटी कुकडे यांनी या ठिकाणी मांडला आहे. याच्यामध्ये मग आपले विरोधी पक्ष नेता असतील, धर्मपालजी मेश्राम असतील, अविनाशजी ठाकरे असतील, प्रविणजी दटके असतील यांनी देखील अनेक इनपुट दिले आहे या विषयाअंतर्गत अनेक नागरिकांच्या तक्रारी येत असतात यामध्ये आपण कशी काय मंजुरी देतो याच्या संदर्भात देखील प्रश्न आहे त्यामुळे हा संपुर्ण प्रश्न बघता हा पुर्ण प्रश्न जो आहे तो स्थापत्य समितीकडे पाठविण्यात यावा आणि स्थापत्य समितीने यावर 15 दिवसात कुठल्याही स्थितीत पुढच्या सभागृहात संपुर्णतः अहवाल तयार करुन मग त्यामध्ये न्यायालयाचा काय निर्णय आहे, 2014 नंतर आपण किती लोकांना परवानगी दिली आहे, याचा संपुर्ण विचार करुन हा अहवाल पुढच्या सभागृहात ठेवावा यामध्ये जे सदस्य आज या ठिकाणी बोललेले आहे त्या सदस्यांच्या मनात काही प्रश्न असतील ते देखील त्यांनी स्थापत्य समितीकडे लिखीत पाठवावे जेणेकरुन त्यांचा अभ्यास स्थापत्य समितीला करता येईल, तसेच स्थापत्य समितीने रेडीयेशन फ्क्वेंनसी बद्दल संपुर्ण अभ्यास करुन हा विषय पुढच्या सभागृहापुढे ठेवावा.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, न्यायालयामध्ये हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि जे वकील मनपाच्या बाजुने न्यायालयामध्ये बाजु मांडतात त्याही गोष्टीच्या येणा–या सभागृहामध्ये खुलासा व्हायला पाहिजे.

श्री.अविनाश ठाकरे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.सदस्य श्री.संदीपजी सहारे यांनी जो मुद्या उपस्थित केला त्या संदर्भात माझा एक प्रश्न आहे मा.महापौरजी न्यायलयामध्ये जो विषय सुरु आहे तो राज्य शासन व्हर्सेस असोसिएशन याची सुध्दा माहिती दयावी.

सहा.संचालक, नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौरजी, आता न्यायालयामध्ये कुठलाही प्रश्न प्रलंबित नाही मोबाईल टॉवरर्सच्या संदर्भात या बद्दल जी पिटीशन होती मा.उच्च न्यायालयात 2043/40 याच्यामध्ये दि. 12 सप्टेंबर 2014 ला मा.उच्च न्यायालयाने आदेश पारीत केलेले आहे.

महापौर :– सन्माननिय सदस्य आणि सत्तापक्ष नेते यांनी केलेल्या सुचनेनुसार या विषयासाठी स्थापत्य समितीला संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन अहवाल पुढच्या सभेपर्यंत त्यांनी सादर करावा.

**<u>प्रश्न क्र 25</u>**:– नवीन प्रभाग रचनेनुसार प्रत्येक सभासद यांना 1 जमादार व 1 स्वच्छता निरीक्षक उपलब्ध करण्या संदर्भात प्रश्न.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, 2017 मे जो प्रभाग रचना हुई है, उस रचना के अनुसार क्या निती तयार की गयी थी। विशेष तौर पर प्रभाग के साफ सफाई के मामलो मे इसके विस्तृत जानकारी दि जाये।

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी प्रत्येक प्रभाग रचनेनुसार 1 स्वच्छता निरीक्षक व 1 जमादाराची मागणी केली परंतु तेवढे पद आपल्याकडे सद्यस्थितीत नाही.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मैंने जो प्रश्न पुछा है क्या आप के पास कोई निती तयार थी क्या चार सदस्यीय प्रभाग रचना अनुसार उसमे किस तरीके से सफाई पर ध्यान दिया जायेगा।

वैद्यकीय अधिकारी (श्री.दासरवार) :– मा.महापौरजी, प्रभाग रचनेनुसार प्रभागातील कर्मचारी त्या बिटवर राहुन त्याचा जर प्रभाग बदलला किंवा झोन बदलला तरी तो व्यक्ती त्याच रस्त्यावर काम करणार आहे आणि एका प्रभागाला 1 सिनिअर 1 एस.आय अशी 4 प्रभागाची रचना केली आहे.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, दासरवारजी के कहें नुसार 1 सिनीअर एस.आय. और एक जमादार यह पुरे प्रभाग की साफ सफाई का ध्यान रखेगें, हमारे यहा पर 2012 से लेकर 2017 के बिच के 2 प्रभाग की रचना के अनुसार 2017 के बाद 4 प्रभाग रचना हुई। पिछले 5 महिने इतने खराब रहे है उसके अंदर आज एस.आय. को फोन लगाते है तो एस.आय. फोन नही उठाता आप झोनल अधिकारी को फोन लगाते है तो झोनल अधिकारी आपको रिसपॉन्स नही करता उसका मात्र एक जवाब होता है की मै अभी फला ने फला ने नगरसेवक के साथ मे हुँ। ये जो शब्द है मा.महापौरजी, यह शब्द इतना हर्ट करता

है जब उसकी खास तौर पर जरुरत होती हो तो ऐसी व्यवस्था को देखते हुए मैंने इस सभागृह के माध्यम से प्रश्न सामने लाया जब 4 सदस्यीय प्रभाग समिती हुई है तो इस पध्दतीमे प्रति नगरसेवक 1 एस.आय. और एक जमादार क्या हमकों दिया जा सकता हैं क्यौकी जो विषय है प्रभागो के वह विषय जटील होते है कल रात मे बारीश हुई जो झोन के इमरजन्सी के अधिकारी है कोई नही रहते है आप फोन लगा लो सभी के फोन स्वीच ऑफ, जिसके फोन चालु है वह फोन उठाने को खाली नही है। इसके पहले भी बारीश हुई उस वक्त भी फोन उठाने को खाली नही थे।

श्री.जुल्फेकार अहमद भुट्टो :– मा.महापौरजी, हम इमरजन्सी मे जो डयुटी लगाते है वह इमरजन्सी डयुटी मे समझ लो सारे शहर मे अगर पानी आता है तो वह सारे लोग एक साईड चले जाते है। क्या नागपूर शहर के एक साईड के हिसाब से हम डयुटी लगाते है यहां हमारे यहां झोन के हिसाब से 50 जगह यह प्रॉब्लेम आ जाती है हमको बहोत तकलीफ का सामना करना पडता है। बार बार यही देखने को मिलता है जिसकी इमरजन्सी डयुटी लगती है हम लोगों को वहा रिलीफ नही मिलता है इस बातपर ध्यान दिया जायें।

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, यह विषय सभी लोगो के हितो का विषय है। एक प्रभाग के अंदर और झोन के अंदर 1 जे.ई. दिया गया है। प्रभाग मे 4 नगरसेवक है और कही ऐसे प्रभाग हो गये है की वहापर चारों के चारो एकही पक्ष के नगरसेवक है लेकीन कुछ प्रभागों के अंदर नगरसेवक अलग अलग पक्षों के है, उसमे कुछ नगरसेवक सिनिअर है, कुछ नगरसेवक ज्युनिअर है इसका भी भेदभाव जे.ई लोग, या झोनल अधिकारी कर रहें है। उसके लिये जो नगरसेवक चुनकर आये है उनके सन्मान के लिये मा.महापौरजी यह प्रावधान करना ही पडेगा क्योंकि आसीनगर झोन के नगरसेवकों की फाईले तयार नही हुई है। मैने तो विषय सिर्फ एस.आय. का कहा था।

अति.आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी, सद्या जे सफाईचे काम चालु आहे ते 38 प्रभागानुसार सुरु आहे. आपल्याकडे जो उपलब्ध स्टाफ आहे कर्मचारी वर्ग आहे त्या आधारे ही व्यवस्था केलेली आहे. सद्या आपल्याकडे एस.आय. 52 अगेंस्ट 38 आहे.

श्री.जुल्फेकार अहमद भुट्टो :– मा.महापौरजी, स्टाफ कम है तो उसकी जानकारी दी जायें।

अति.आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी, स्टाफची भरती करण्याकरिता आकृतीबंध तयार करुन शासनाकडे पाठविलेला आहे एकदा त्याला मान्यता मिळाल्यानंतर आपण म्हणता त्याप्रमाणे व्यवस्था करणे काही कठीन नाही परंतु सद्या आहे त्या स्थितीत आकृतीबंध मंजुर होईपर्यत आपल्याला व्यवस्था सांभाळावी लागणार आहे.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, ज्या ठिकाणी गडर लाईन आहे नाग नदी आहे, पिवळी नदी आहे अशा ठिकाणी आपण काही स्पेशल टिम प्रोव्हाईड केलेली आहे काय ? क्योकी यहा पर थोडा भी पानी आया तो यहापर प्रॉब्लेम होती है ऐंसा बहोत सारा ऐरिया है। अगर आप सिव्हील लाईन मे टिम अपॉइंट करते है तो उस टिम की वहा पर कोई जरुरत नही है। अपने यहा पर जो इमरजन्सी टीम लगायी जाती है वह टिम कौनसे ऐरिया के लिये लगायी जाती है, उसके लिये प्रायरिटी क्या है। अगर रात मे किसी क्षेत्र के अंदर मे पानी भरता है तो इमरजन्सी टीम का काम क्या है। (बेल)

श्रीमती हर्षला साबळे :– मा.महापौरजी, जेव्हा जेव्हा आम्ही अधिका–याला फोन करतो तेव्हा एकही अधिकारी फोन उचलत नाही मी रात्री 12.00 वाजता फोन लावला असता एकही अधिका'–यांनी फोन उचलला नाही आणि त्यांना दुस–या दिवशी विचारले तर झोपलो होतो असे उत्तर देतात. लोकांच्या घरात पाणी घुसते तेव्हा आम्ही कोणाकडे जाणार आहे (बेल)

महापौर :– एक एक करुन सदस्यांनी बोलावे.

श्री.बंटी शेळके :– मा.महापौरजी, काल रात्री शिवाजी नगर,नंदाजी नगर, चिटनीस पुरा, शहरामध्ये प्रत्येक जागेवर रात्री पाणी घुसले होते माझ्या जवळ त्याचे व्हीडीओ सुध्दा आहे.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मेरे विषय का विषयांतर हो रहा है। मेरा विषय प्रभाग रचना को लेकर है। प्रभाग रचना के अनुसार जो परेशानी नगरसेवकों को हो रही है। उसका समाधान क्या है यह प्रशासनने बताना चाहियें।

महापौर :– मा.सदस्य गण तुमच्या प्रश्नांचे उत्तर अधिका–यांनी दिलेले आहे.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मेरा प्रश्न यही है की प्रभाग रचना के अनुसार नगरसेवकों को सन्मानपुर्वक काम होना चाहियें। यह मेरा अकेले का प्रश्न नही है आप मा.महापौरजी वास्तुस्थिती देख लीजीये जो सिनिअर नगरसेवक है उसके ही काम हो रहे है। आप आसीनगर मे जाकर देख लिजीये कई नगरसककों की फाईले नही बनी हैं अभी भी नगरसेवकों की समस्या वैसी की वैसी ही है।

महापौर :– या प्रश्नासंदर्भात प्रशासनाने उत्तर दिलेले आहे की मनपाचे आकृतीबंध राज्य सरकारच्या परवानगीकरिता पाठविण्यात आले आहे त्याला मान्यता मिळाल्यानंतर हा प्रश्न सुटेल..

<u>**प्रश्न क्र 26**</u> :– मनपा माध्यमिक शाळा सेवाजेष्ठता यादी बनविण्याचे नियम संदर्भात प्रश्न.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, मनपा माध्यमीक शाळा त्याची सेवाजेष्ठता यादी हि कोणत्या नियमानुसार बनविण्यात आली व सेवाजेष्ठता यादी बनविण्याचे कोणते नियम आहे याची माहिती प्रशासनाने दयावी.

महापौर :– उत्तर प्रशासनाने दिलेले आहे.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, उत्तर समाधानकारक नसल्यामुळे संपूर्ण उत्तराची परिस्थिती माझ्याजवळ तयार आहे. त्यांनी फक्त सांगावे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती मेडपल्लीवार) :– मा.महापौरजी, सेवाजेष्ठता यादी कोणत्या नियमाप्रमाणे तयार केली असा प्रश्न या ठिकाणी मा.सदस्यांनी केला आहे त्या अनुषंगाने मी येथे सांगु इच्छिते की मनपा ची जी नियमावली आहे त्याच अनुषंगाने ती तयार केलेली आहे आणि 25 वर्षापासुन तीच चालत आहे.

अति.आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी, या संदर्भात मी खुलासा करु इच्छितो महानगरपालिकेमध्ये जी जेष्ठता यादी तयार करायची आहे, शिक्षकांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. सुरुवातीला महानगरपालिकेच्या ज्या मॅनडेटरी डयुटी आहे आणि ज्या ऑफीशीअली डयुटी आहे त्याचा विचार केला तर माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी आहे, ती मॅनडेटरी डयुटीमध्ये मोडते, त्याचप्रमाणे महानगरपालिका मिडल स्कुल आणि हायस्कुल चालवित आहे शिक्षकांच्या सेवेजेष्ठतेसाठी नुसार प्रत्यक्षात नियमावली तयार करण्याचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 465 प्रमाणे परंतु तशी वेगळी नियमावली तयार केलेली नसल्यामुळे इतर कर्मचा–यांना ही लागु आहे कि, महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठेतेचे नियम 1982 हेच आपल्याला लागू होतील जोपर्यत आपली नियमावली वेगळी तयार होत नाही आणि या नियमांसोबतच शासनाकडुन जे वेळोवेळी सर्कूलर काढलेले आहे किंवा परिपत्रक काढलेले आहे त्या निर्णयानुसार आपल्याला कार्यवाही करायची आहे.

श्री.प्रकाश भोयर :– मा.महापौरजी, शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे त्या अनुषंगाने अनेक शिक्षक हे नागपूरच्या हायकोर्टामध्ये गेले होते 7 शिक्षकांचा एकत्रित नियम झाला त्यामध्ये निर्णय दिला त्यामध्ये असे सांगितल्या गेले की पदवीधर प्राथमिक शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी करतांना त्याची पदवी कोणत्या दिनांकास त्यांनी प्राप्त केली त्याची सेवाजेष्ठता यादी निश्चित करावी, महापौरजी, आजपर्यतच्या इतिहासामध्ये एखादा शिक्षक 1988 ला डयुटीला लागला त्या नंतर 1988 ला तो बी.ए. झाला आणि 2008 ला त्यांनी महानगरपालिकेला वेतनश्रेणी लावली आहे. शासनाचे परिपत्रक जर आपल्या समोर असेल तर 2008 पासुन कसे काय लावले, नियुक्ती दिनांकापासुन का नाही लावण्यात आले, या सभागृहात जेव्हा नागपूर महानगरपालिका महाराष्ट्र शासन शिक्षकांना पगार देतो नागपूर महानगरपालिकेला याचा कोणताही भार पडत नाही. तर नागपूर महानगरपालिकेला याची सेवाजेष्ठता यादीनुसार पगार देण्यास काय अडचणी आहे. यांनी सेवाजेष्ठता यादी करीत असतांना काही लोकांची बाजु घेवुन जे ज्युनिअर होते त्या लोकांना सिनिअर केले आणि जे सिनिअर आहे त्यांना मागे केले अशा पध्दतीचे माझे ऑब्जेक्शन आहे. यांनी ही यादी तपासुन पहावी आणि त्यानंतर त्यांनी उत्तर दयावे.

श्री.दिलीप दिवे :– मा.महापौरजी मी ज्या दिवसापासुन शिक्षण समितीचा सभापती झालो त्या दिवसापासून मी सेवाजेष्ठता यादी ऑफीसला मागितली परंतु या ऑफीसने अजुनपर्यत अधिकृत यादी मला दिलेली नाही. या ऑफीसने आजपर्यत जेवढे सेवाजेष्ठतेचे जे नियम आहे त्या सेवाजेष्ठतेच्या नियमानुसारच प्रत्येक शिक्षकांना प्रमोशन दिले पाहिजे परंतु अशा प्रकारचे प्रमोशन येथे जाणुन बुजुन दिले गेलेले नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की जे काही असे प्रलंबित विषय असतील यामध्ये एक तज्ञ समितीची नियुक्ती करुन ती सेवाजेष्ठता यादी तपासण्यात यावी आणि नविन सेवाजेष्ठता यादी येणा–या पुढच्या

सर्वसाधारण सभेच्या पुर्वी करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रकाश भोयर :— मा.महापौरजी, स्थिती अशी आहे की, नागपूर महानगरपालिका राज्य शासनाचे सर्व भत्ते घेत आहे जिल्हा परिषदा, नगरपंचायती मध्ये शिक्षकांच्या सेवाजेष्ठता यादी नियमाप्रमाणे होते नागपूर महानगरपालिकेमध्ये ट्रान्सपरन्सीच्या दृष्टीकोणातुन ती तयार करण्यात येत असेल तर मनपा नियमानुसार चालेल नाही तर मा.महापौरजी, कालांतराने येथे चपराशी सुध्दा आपल्याला शिक्षणाधिकारी झालेला दिसेल त्यामुळे माझी विनंती आहे की एक नियम तयार करावा आणि त्या नियमानुसारच सेवाजेष्ठता यादी तयार करावी, त्याचा नियुक्तीचा दिनांकापासुन घ्यावे. या पध्दतीमध्ये काही लोक रिटायर्ड होवुन गेले त्यांना ज्या पध्दतीचे वेतन आणि भत्ते मिळायला पाहिजे होते ते मिळाले नाही कारण अनेक शिक्षकांचे नुकसान या सेवाजेष्ठता यादीमुळे झाले आहे. मा.महापौरजी ही यादी तयार करत असतांना आपल्याला अशी विनंती आहे की जी यादी तयार केली ती 100 टक्के चुकीची यादी आहे त्या करिता एक तज्ञ समिती बसवावी आणि 15 दिवसांच्या आत ही यादी तयार करावी आणि यामध्ये जे ज्युनिअर असुनही त्यांना सिनिअर दाखविण्यात आले असेल त्यांच्यावर स्पष्ट कारवाई करावी आणि त्यांच्याकडुन त्यांनी घेतलेले भत्ते आणि वेतन प्रशासनाने त्यांच्याकडुन वापस घ्यावे.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, या विषयावर मी सुध्दा पत्र प्रशासनाला दिलेले आहे 1 वर्षापूर्वी यानंतर हेअरिंग सुध्दा घेण्यात आली होती त्याचा निकाल नाही लागला, प्रशासनाने सांगितले की आम्ही यादी डिसप्ले केली परंतु अजुनपर्यत यादी डिसप्ले केलेली नाही. त्यामध्ये एक गृहस्थ कोर्टामध्ये गेले होते ते आता महानगरपालिकेत नाही आहे. त्यांच्या एकटाच्या बाजुने निकाल लागला नंतर त्यांचे प्रमोशन झाले आणि त्यानंतर त्यांच्या सोबतीचे जेवढे लोक होते त्यांचे प्रमोशन झाले नाही. विषय असा आहे की प्राथमिक मधुन माध्यमिक मध्ये प्रमोशन दिले जाते त्यामध्ये बराचसा घोळ आहे. सेवाजेष्ठता यादी मध्ये 5 वर्षापूर्वी जो शिक्षक 5 व्या नंबरवर होता त्याला 2014 मध्ये 200 व्या नंबर वर टाकले त्याचे कारण त्यामध्ये निकष असे आहे की तो इंग्लीश मिडीयमचा, मराठी मिडीयमचा व प्रवर्गाचा असे निकष महानगरपालिका ठरवत आहे त्यामुळे प्रकाश भोयर यांनी जो मुद्या मांडला तो अतिशय योग्य आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे.

श्री.प्रकाश भोयर :— मा.महापौरजी मी 25 लोकांची यादी देतो ते जेष्ठ आहे परंतु त्यांचे जेष्ठता यादीमध्ये नावं नाही.

महापौर :— प्रशासनाला तुमचा विषय कळलेला आहे त्यासंदर्भात उत्तर देवु दया त्यानंतर निर्णय देवु.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, हेअरींग घेतल्यानंतर सुध्दा चुकीच्या पध्दतीने यादी डिक्लेअर झालेली आहे.

अति.आयुक्त (श्री.कुंभारे) :— मा.महापौरजी,सेवाजेष्ठता यादी एकदा तयार झाल्यानंतर ते बदल करण्याचे अधिकार प्रशासनाला नाही त्या कॉम्पेटंट अथॉरिटीकडे जावे लागेल. 2011 मध्ये शासनाने एक शासन निर्णय निर्गमीत केलेला आहे. दरवर्षी पुर्णच्या पुर्ण प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात येवु नये, ज्या वर्षात आपल्याला प्रारुप यादी प्रसिध्द करावयाची आहे, त्या वर्षामध्ये ज्या नविन नियुक्त्या झालेल्या आहेत किंवा नविन पदोन्नती होईल त्या संवर्गामध्ये जे कर्मचारी आहे त्याचीच यादी प्रसिध्द करावी. आणि त्यावर आक्षेप मागवून ते आक्षेप निकाली काढुन नंतरच ती यादी अंतिम करावी अशा स्पष्ट सुचना आहे त्यामुळे सदस्यांच्या ज्या तक्रारी आहे त्या मान्य आहे की त्यामुळे कारण कुठल्याही पदोन्नती शिक्षक संवर्गामध्ये झालेली नाही त्यामुळे पुन्हा प्रारुप यादी व अंतिम यादीचा प्रश्नच उद्भवत नाही परंतु ज्या अंतिम यादीवर ज्यांना आक्षेप असेल त्यांना कॉम्पेटंट अथॉरिटी कडे त्यांना अपील मध्ये जावे लागणार आहे ते आपल्याला येथे दुरुस्त करणे शक्य नाही.

श्री.अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, ऑलरेडी अपिल मध्ये गेलेले आहे. त्यावर प्रॉपर चॅनल नी सुनावणी तर दयायला पाहिजे.

श्री.प्रकाश भोयर :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी 2015 ला ज्या 31 लोकांचे ऑब्जेक्शन मागविण्यात आले होते त्यापैकी 18 लोकांनी ऑब्जेक्शन क्लीअर केले आणि त्यानंतर एक पत्र या सभागृहाने पाठविले एकतर प्रशासन उत्तर देत आहे अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर ती पुन्हा प्रकाशीत करता येत नाही परंतु जे 31 लोक होते त्या 31 लोकांना उत्तर असे दिले आहे एक श्रीमती भारती शर्मा नावाची शिक्षिका आहे त्यांच्या सुनावणीचा निर्णय अशा प्रकारचा दिला आहे, अशा प्रकारे पुर्वलक्षी प्रभावाने

50 शिक्षकांचे निवेदन प्राप्त झाले असुन सदरचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून कार्यवाही सुरु आहे. मा.महापौरजी एकदा जर ही यादी फायनल झाली होती तर मग कार्यवाही सुरु आहे हे उत्तर शिक्षकांना दिले यामध्ये ही यादी दुस–यांदा करु शकत नाही अशा पध्दतीचे उत्तर जे शिक्षक सुनावणीला गेले होते त्यांना असे उत्तर देण्यात आलेले आहे. मा.महापौरजी या यादीमध्ये पुर्णपणे घोळ आहे यावर एक तज्ञ समिती बसवलीच पाहिजे आणि ज्या ज्या लोकांनी जे जुने असूनही सिनिअर्स होत असतील तर त्याच्याकडुन सर्व भत्ते वसूल केले पाहिजे.

महापौर :– मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता सेवाजेष्ठता यादीसंदर्भात ज्या लोकांचे आक्षेप आहेत त्यांची सुनावणी घेवून प्रशासनाने अहवाल सादर करावा.

**<u>प्रश्न क्र. 27</u>**:– डी.पी.डी.सी.फंडा अंतर्गत किंवा खासदारांच्या निधीतून म.न.पा.च्या हद्दीमधील बांधण्यात येणाऱ्या संदर्भात प्रश्न.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, हर झोन मे डी.पी.डी.सी. फंड के अंतर्गत या खासदार निधी से या दूर्बल घटक निधी से स्लम मे जो गर्व्हनमेंट का फंड मिलता उससे होनेवाले जो विकास कार्य है उसमे सिव्हर लाईन भी डाली जाती है और रोड भी बिछायें जाते है। मा.महापौरजी मेरा प्रश्न है की डि.पी. डी.सी. फंड के अंतर्गत किंवा खासदारांच्या निधीतून किंवा अन्य निधीतून मनपा च्या हद्दीमध्ये बांधण्यात येणा–या रस्त्यांची सूचना महानगरपालिकेला असते काय? मा.महापौरजी मला उत्तर मिळाले आहे की होय मनपा मध्ये मंजूर असलेल्या कामाबद्दल महानगरपालिकेला कल्पना असते व या सूचनेनुसार मनपा तील अधिकारी कर्मचारी कंत्राटदाराकडून काम सुरु असतांना निरीक्षण व दिशानिर्देश करण्यात येते काय यामध्ये लिहिलेले आहे मा.महापौरजी होय, ज्या वेळेस कंत्राटदाराकडून काम पूर्ण करण्यात येते तेव्हा तांत्रिकदृष्टया त्याचा वापर करतात त्याची शहनिशा केली जाते काय? मा.महापौरजी मला उत्तर मिळाले होय, मा. महापौरजी माझा प्रभाग क्र 21 आता नविन झालेला आहे त्याच्यामध्ये अनेक शासनाच्या योजना मधुन, अनेक शासनाच्या फंडामधुन विकास कामे झालेली आहे. ते दुर्बल घटकचे असो किंवा स्लम चे असो किंवा आमदार किंवा खासदारांच्या निधीतले असो, मा.महापौरजी प्रेमनगर एक असा ऐरिया आहे जेथे पूर्ण रोडचे टाल टाकण्यात आले मा.महापौरजी मेरा यह अनुभव के तथ्य पर आरोप है कि जिस तरीकेसे मूझे प्रश्न का उत्तर दिया गया कि टेक्नीकली भी हमारे महानगरपालिका के अधिकारी और कर्मचारी उसपर वॉच रखते है। मा.महापौरजी मेरा यह आरोप है कि अगर तांत्रिक दृष्टीकोनसे अगर उसपर वॉच रखे रहते तो आज जो परिस्थितीया मेरे प्रभाग मे जो पुराने प्रभाग था मासूरकर चौक मे जो स्थिती उत्पन्न हुई है वा स्थिती उत्पन्न नही होती, जब हम पुछते तो कहते है की मॅडम डि.पी.डी.सी. फंडातून झाले आमच्या अधिका–यांना माहिती नसते आमच्या जे.ई. ला माहिती नसते आणि येथे उत्तरामध्ये सांगितले की जर त्यांना माहिती असेल तर त्यांनी कामाच्या वेळेस का नाही बघीतले की लोकांच्या घरातील पातळी आणि रोडची पातळी एक सेम लेव्हल वर आली आहे. कालचा पाऊस त्याच्या अगोदरचा पाऊस त्याच्यामध्ये एवढी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. आणि हा विषय असा आहे कि संपूर्ण शहरात हा विषय आहे. संपुर्ण शहराची जनता आमच्याकडे येते मा.महापौरजी आमदार साहेबांनी जरी डि.पी.डी.सी. फंडातून काम केले असेल किंवा खासदारा साहेबांनी जरी त्यांच्या फंडातून काम केले असेल तरी जनता त्यांच्याकडे पहोचत नाही जनता ही सरळ नगरसेवकांकडे जाते आणि मग नगरसेवकांकडे पर्याय नसतो, माझे हे म्हणणे आहे की तुम्ही निर्देश दयावे कारण आता जे काम झालेले आहे त्याला आपण काहीही करु शकत नाही परंतू जे काम झाले आहे आणि जेथे जास्त अडचण निर्माण होत आहे त्या अडचण निर्माण होणा–या किंवा भयानक परिस्थीती निर्माण होणा–या ऐरियाची लिस्ट असली पाहिजे आणि जर डि.पी.डी.सी. फंडातून आम्हाला जी निधी मिळाली असेल त्या निधीचे जर काम असेल तर डि.पी.डी.सी. जी यादी असली पाहिजे आणि त्याच्यामध्ये आपण जे काम करु शकतो ती स्थिती सुधारू शकतो आणि ती स्थिती सुधारली पाहिजे. मा.महापौरजी, कारण प्रेम नगर मधून मला जवळ जवळ कालच्या रात्री 100 फोन आले असतील एक डिलीव्हरी जिसकी 7 दिन पहले हुई उसके बच्चे का झूला पानी मे तैर रहा था और मॉ जिसकी अभी डिलीव्हरी हुई उसने पानी मे नही रहना चाहिये यह आप भी जानती है, हम भी जानते है लेकीन वह घुटनेभर पानी को रातभर निकालती रही ऐसी परिस्थिती से हमने कैसे झुजना, इस परिस्थीती का निराकरन हमने कैसे करना। आज बहोत बिकट परिस्थिती है इसलिये आप से निवेदन करना चाहिती हुँ,

कि जो भी काम डि.पी.डी.सी या जितने भी फंड से हुऐ होंगे, जो भी काम 19–20 हुऐ होंगे तो सहा. आयुक्त के माध्यम से वहा का संबंधित जे.ई. के माध्यम से लिस्ट बनायें कि कहां ऐसे कामो मे कोहताई बरती गयी है उसमे जिस फंडसे निधी आया है उसको हमने गुजारिश करना चाहिये और अगर हमारी गुजारीश मान्य नही होती तो मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका मे आप लोग बहोत अच्छे काम कर रहे है, स्थायी समिती के अध्यक्ष भी बहोत गंभीर है शहर के विकास के लिये तो उनके तरफ गुहार लगाईये। आज जो हमारे प्रभाग या अन्य प्रभाग मे जो स्थिती उत्पन्न हुई है और हमने वह स्थिती से कैसे निपटना यह हमको समझ मे नही आ रहा है। मा.महापौरजी अगर डि.पी.डी.सी. या अन्य फंड से वह निधी खर्च हुई है वह लिस्ट बनाकर स्थायी समिती के अध्यक्षजी के सामने रखकर और मा.महापौरजी क्यौंकि आप ही हमारी सर्वेसर्वा है आप ऐसे निर्देश प्रशासन को भी दे की जहां ऐसे 19–20 के काम हुऐ है उन कामो कि सूची बनायी जाये। मा.महापौरजी अगर आप को लगता है की जिन जिन प्रभागों मे ऐसे काम हुये है और हर नगरसेवक चाहते है की उसके प्रभाग मे अच्छा काम हो अगर पालकमंत्री साहब के साथ भी मिटींग करना है तो आप के नेतृत्व मे हम सब आने को तैयार है। आप बतायें और इसका निराकरण किजिये, और प्रशासन को आदेश दिजीये।

श्री.नितीन साठवणे :– मा.महापौरजी प्रभाग क्र 21 मध्ये मी नगरसेवक आहे तेथे डि.पी.डी.सी. फंडामधून गडरलाईन चे काम चालू आहे इंजिनिअरला आम्ही म्हटले हे काम तुमचे नाही आहे डि.पी.डी.सी. च्या फंडामधून आहे पावसाळी नालीचे पाणी जेथून जाते आणि तेथे गडरलाईन जोडल्या जात आहे हे कसे काय होत आहे.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी जो काम सतरंजीपूरा झोन मे चल रहा है मालधक्का के पिछे और उसमे वेस्ट वॉटर लाईन मे सिवर लाईन मिला रहे है हमारे अधिकारी जिनकों कुछ भी नही पता हम उनको बता रहे है की वह काम डि.पी.डी.सी. फंड के माध्यमसे वह लाईन डाली जा रही है इसका कही अतापता नही है। मा.महापौरजी मेरी आपसे गुजारिश है कि डी.पी.डी.सी. को हमारे हाऊस के माध्यम से ठराव भेजियें जो भी काम आप करने वाले है जो प्रस्तावित काम है वह सारे कामो की सूची नगरसेवक को मिलना चाहिंये और संबंधित सहा.आयुक्त और जे.ई. को मिलना चाहिये तो यह समस्या नही आयेंगी।

महापौर :– डी.पी.डी.सी. च्या फंडाचा अधिकार आमदारांचा आहे परंतू आपण जो प्रश्न विचारलेला आहे प्रभाग क्र 21 मध्ये रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यात आले काय? (बेल)

श्रीमती आभा पांडे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, आप ने कहा की डि.पी.डी.सी. फंडपर आमदार महोदय का अधिकार है हम मानते है मा.महापौरजी की मा.आमदार महोदय का अधिकार है मै उसके विरोध मे नही हुँ लेकिन मेरा विरोधाभास केवल इसलिये है जो काम गलत तरीके से हुऐ है उसका खामीयाजा केवल नगरसेवकोंको भुगतना पडता है ।

महापौर :– झोनमध्ये जे डि.पी.डी.सी. फंडातून काम झालेले आहे त्या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी तसेच प्रभाग क्र 21 मध्ये सिमेंटीकरणाचे कोणते कोणते काम झाले याची देखील माहिती दयावी.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी प्रशासनाला हे उत्तर दयायला सांगा की डि.पी.डी.सी. फंडा बरोबर अन्य जे फंड आहे त्यामध्ये झालेल्या कामाची यादी विचारण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.सोनकुसरे) :– मा.महापौरजी, प्रभाग क्र 21 मे मा.आमदार मा.खासदार यांच्या निधीतून प्रभाग क्र 21 मध्ये कोणत्याही रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे काम करण्यात आले नाही.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, मी तुम्हाला तेच विचारत आहे की डि.पी.डी.सी. फंडाबरोबर खासदारांचा निधी आणि शासकीय जेवढे फंड असते त्या निधीचा उपयोग करुन जिथे जिथे काम झालेले आहे आणि आमचा जो प्रभाग आहे तो दोन विधानसभा क्षेत्रामध्ये येतो, तुम्ही कोणत्या विधान सभा क्षेत्राचे काम बघता?

कार्यकारी अभियंता (श्री.सोनकुसरे) :– मा.महापौरजी, दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रा बघतो.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी काय चालले आहे,

अति.आयुक्त (श्री.कुंभारे) :– मा.महापौरजी सन्माननिय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा स्पेसीफीक डी.पी. डी.सी. फंडाचा आणि सिमेंटीकरणाच्या रस्त्यांचा होता आता समजा जर वेगळी जर माहिती पाहिजे असेल तर ती दोन दिवसात मा.सदस्यांना कळविण्यात येईल या संदर्भात मा.महापौरजी परवानगी देण्यात यावी.

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, दोन दिवसांत नाही चार दिवसात तुम्ही माहिती दया पण असे करू नका की दक्षिण नागपूरची माहिती मागितली तर पश्चिम नागपूरची माहिती द्याल. मा.महापौरजी आपण प्रशासनाला निर्देश दयावे सन्माननिय सहा.आयुक्तांच्या निर्देशनास आणावे की ज्या ज्या प्रभागात असे कामे झालेले आहे त्याची कनिष्ठ अभियंता यांनी यादी बनवावी आणि सर्व नगरसेवकांबरोबर चर्चा करुन निर्णय घ्यावा.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, या प्रश्नातून आपल्याला अपेक्षित काय आहे पहिले याच्यावर चर्चा झाली पाहिजे, आपल्याला त्या कामांची यादी पाहिजे की आणखी काय पाहिजे या संदर्भात अपेक्षित काय आहे.

श्रीमती आभा पांडे :— पॉइंट ऑफ इन्फॉरर्मेशन मा.महापौरजी, मला हे म्हणायचे आहे की माझ्या प्रभागात ज्या ज्या फंडातून काम झालेले आहे त्याची यादी माझ्याकडे आहे. प्रशासनाकडे नसेल, 4 दिवसात माहिती न देता मला 10 दिवसांत माहिती दया चालेल माझी अपेक्षा फक्त ऐवढी आहे मा.प्रविणभाऊ दटकेजी आमच्या प्रभागात जी कामे शासनाच्या माध्यमातून जी खराब झालेली कामे आहे

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी जर कामे खराब झाली असेल तर त्यांनी तक्रार करावी, की हे डी.पी. डी.सी. फंडातील काम नियम निकषानुसार क्वॅालिटी नाही याची तक्रार योग्य ठिकाणी केलीच पाहिजे तुम्हाला तुमच्या प्रश्नातून अपेक्षित काय आहे. तुम्हाला सरकारच्या किंवा आमदारांच्या कामांवर अकुंश आणायचा आहे काय हे चालणार नाही ? तुम्ही तक्रार केली पाहिजे आणि तुमच्या तक्रारीचे निवारण झाले पाहिजे परंतु मा.महापौरजी, मा.सदस्य त्यांच्या प्रश्नातुन संबंधित सन्माननिय खासदार असतील किंवा सन्माननिय आमदार असतील इतर लोकप्रतिनिधी असतील त्यांच्या कामांवर अंकुश आणण्याचा प्रयत्न करीत असेल तर हे खपवून घेतले जाणार नाही.

श्रीमती आभा पांडे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, मी जो प्रश्न विचारला आहे तो राजकारणी प्रश्न अजिबात नाही तुम्हाला जर वाटते तर तुम्ही सर्व कामे करुन घ्या

श्री.प्रविण दटके :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, कोणी किती विकास कामे करायचे तो त्याच्या त्याच्या बुध्दीने करतो त्यामध्ये आभाताईने किती केले पाहिजे, प्रविण दटकेनी किती केले पाहिजे हा प्रश्न प्रत्येकाचा अधिकार काय आहे तो पाळल्या गेला पाहिजे. कामे खराब झाले असतील तर त्या त्या तक्रारींचे निवारण झाले पाहिजे, तो ज्याचा त्याचा अधिकार आहे. आपण या सभागृहाच्या माध्यमातून मा.आमदार मा. खासदार विधानसभा विधानपरिषदेचे त्यांच्या अधिकारांवर अंकुश आणू शकत नाही.

श्रीमती आभा पांडे :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, जिन जिन सांसद महोदय का मैने नाम लिया या मैने संबोधित किया उनका भी शहर के विकास मे योगदान है मेरा कही भी दोषारोपन नही है, यह जो विषय है वह दिशाहीन होते जा रहा है, मै कुछ और कर रही हुॅ और दिशा कही औैर जारही है।

महापौर :— मा.सदस्या श्रीमती आभा पांडे तुम्हाला तक्रार करायचा अधिकार आहे तुम्ही तक्रार करा.

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी नवीन एम.एम.सी ॲक्ट नुसार आम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे.

श्री.प्रविण दटके :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, तुम्ही प्रश्न विचारा तो तुमचा अधिकार आहे त्याबद्यल मला बोलायचे नाही. पण तुमचा प्रश्न भलतीकडे आहे आणि तुम्ही जावून दुसरीकडे राहिले. तुम्ही डि.पी.डी.सी. ला पत्र पाठवा, आणि मा. पालकमंत्री महोदयांशी बैठक घ्या.

श्रीमती आभा पांडे :— ज्या कामांमघ्ये तांत्रिकदृष्टया चूक झालेली आहे त्या चूकांना सुधारावे मा. महापौरजी फक्त एवढेच माझे निवेदन आहे.

महापौर :— या संदर्भात तुम्ही तक्रार दयावी ती चूक सुधरविण्यात येईल.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. लक्षवेधीला सुरुवात करण्यात येते

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, एका तासामध्ये 5 प्रश्न घेतले आहे 10 प्रश्न पुन्हा प्रलंबित आहे. या सभेमध्ये जे प्रश्न उपस्थित केले सन्माननिय सदस्यांनी त्यातला एकही प्रश्न आलेला नाही. मा.महापौरजी आपण अर्धा तासाचा वेळ यासाठी वाढवून दयावा.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी आपण प्रश्नोत्तराचा तास वाढविला पाहिजे, सर्व सदस्यांच्या भावना तिव्र आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, प्रश्नोत्तराचा तास वाढविला पाहिजे हा विषय बरोबर आहे परंतु एक समिती या सभागृहातील जेष्ठ सदस्यांची होती आणि त्या समितीने सर्वकष विचार करुन यावर एक तास हा प्रश्नोत्तराचा ठरवायचा निर्णय घेतला होता, निश्चितच वेळ कमी पडतो काय ? एखादयाने प्रश्न विचारल्यावर त्याला पॉइंट ऑफ ऑर्डर, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आणि त्याला एका ठिकाणाहून दुसरीकडे आपणच घेवून जातो, त्यामुळे माझी आपणाला सूचना आहे की हे जेवढे प्रलंबित प्रश्न आहे त्या संदर्भात आजच्या सभागृहात स्पष्ट निर्देश दयावे 6 मिनीटच्या वरती कोणालाही चर्चा करता येणार नाही, हा निर्णय जर झाला तर आपण सर्वांनी तो नियम पाळावा, माझ्या पासून ते सर्वांनाच हा नियम पाळावा लागेल, हे जर झाले तर निश्चितच यामध्ये मार्ग निघेल.

श्री. प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी जी सूचना केली त्याच्याशी मी सहमत आहे. सन्माननिय सदस्यांचा जो प्रश्न असतो त्याच सन्माननिय सदस्यांनी त्यावर चर्चा केली पाहिजे असे अपेक्षित आहे परंतु चर्चा संपल्यानंतर जर त्या प्रश्नांच्या संदर्भात काही उपप्रश्न मा.सदस्यांच्या मनात असेल तर ते विचारण्याची मुभा त्यांना देण्यात यावी. मात्र प्रश्नोत्तराचा तास सुरु झाल्यानंतर एखादयावेळेला जेव्हा आपण प्रश्नावर चर्चा करतो त्या सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यापेक्षा अधिक सदस्य या ठिकाणी बोलत असतात त्यामुळे मुळ प्रश्नकर्ता सदस्यांचे पूर्ण बोलणे झाल्याशिवाय दुस–या कुठल्याही सदस्यांनी यामध्ये उपप्रश्न विचारु नये अशा पध्दतीचे एक नियोजन आपल्या माध्यमातून या सभागृहापूढे आपण निर्माण करावे, अशी मी मा.महापौरजी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, निश्चितच ही सूचना चांगली आहे, माझी आपणाला विनंती आहे आता 10 प्रश्न अजून राहिले आहे पुढच्या सभागृहात सर्वच्या सर्व 10 प्रश्न आपण एक वेगळा वेळ देवून सुध्दा पुर्णच्या पूर्ण प्रश्न पूढच्या सभागृहात पुकारण्यात यावे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी माझा एक गंभीर प्रश्न आहे तो म्हणजे नागपूर शहरातील दुषित पाण्याचा प्रश्न त्याच्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडलेले आहे.

महापौर :– लक्षवेधी 1.10 मिनीटानी चालू केली आहे. नियमानी सर्व प्रश्न घेण्यात येईल.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेत्यांना मी विनंती करतो की सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांचा जो प्रश्न आहे तो घेण्यात यावा.

महापौर :– सभागृहाच्या भावना लक्षात घेवून प्रश्न क्र 30 घेण्यात येतो.

**प्रश्न क. 30** :– नंदनवन घरकुल येथे दुषीत पाण्यामुळे दोन व्यक्तिंना बळी गेला याची प्रशासनास माहिती आहे काय या सदंर्भात प्रश्न

श्री. तानाजी वनवे :– मा.महापौरजी, या सभागृहाला मी या प्रश्नाच्या माध्यमातून विनंती करतो की नागपूर शहरामध्ये गेल्या 5 ते 6 दिवसांपासून सातत्याने घाण पाणी येत आहे. आणि हे एकाच भागात येत आहे असे नाही तर संपूर्ण शहरामध्ये अर्धा अधिक भागामध्ये घाण पाणी येत आहे वर्तमानपत्रांनी ते छापून काढले आहे आणि त्याच्यामध्ये प्रशासनाने माहिती दिली हिरवे पाणी, पिवळे पाणी, जे या ठिकाणी येत आहे ते हिरवे पाणी पिण्यायोग्य आहे पिवळे पाणी पिण्यायोग्य आहे आणि त्याच्यामध्ये ओ.सी.डब्लु च्या लोकांनी खंडन केले आहे. माझी आपणाला विनंती आहे की या दुषित पाण्यांनी अनेक लोक तसेच नंदनवन घरकूलचा प्रश्न आहे त्याचे उत्तर पण दिलेले आहे. 2 लोक त्या ठिकाणी मृत्युमुखी पडलेले आहे. या ठिकाणी शाम कमाटकर, पिऊष तावडे, पुष्पा उमरे, विनोद मेश्राम, अंकिता गुप्ता, बनसोड,शिर्के, सोनटक्के, किशोर हरणे, शुभम कुंभलकर, निखील डेकाटे, संगमवार, वैद्य, घायवट, चव्हान आणि याच्यामध्ये श्रीमती चव्हान ज्यांचा मृत्यु झाला येथे जे कारण लिहिलेले आहे ते अतिशय चुकीचे कारण आहे त्यांनी यौन संबंध किंवा दुषित रक्ताशी व इतरत्र रक्तांशी संबंध आल्यास किंवा विषाणू युक्त दुषित पाण्यामुळे असू शकतात तर आता हे ज्यांनी उत्तर दिलेले आहे हे त्यामध्ये तज्ञ आहे काय? आणि हे चूकीचे उत्तर देवून नगरसेवकांशी आणि जनतेची दिशाभूल करण्याची जे काम करतात माझी या सभागृहाला विनंती आहे आपणाला विनंती आहे की ज्या लोकांनी चूकीचे उत्तर दिलेले आहे पहिले त्याच्यांवर निलंबनाची कारवाई करावी, कारण या ठिकाणी पाणी अत्यंत दुषित आहे.

( मा.सदस्यानी दुषित पाण्याचे नमूने दाखविले)

वैद्यकीय अधिकारी, एम (श्री.चिव्हाने) :– मा.महापौरजी, नंदनवन घरकूल संकुल रक्ताच्या दोन टेस्ट रिपोर्टेड झालेल्या आहेत त्या केवळ दुषित पाणी या कारणाने झालेले आहे म्हणुन झोनल वैद्यकीय अधिकारी लकडगंज झोन डॉ.मोवाडे व त्यांची चमू जेव्हा यांना या बद्दल माहिती कळली मा. नगरसेवकांकडुन आणि जी रुटीन एरियाची जी आपण पाहणी करतो त्या अनुषंगाने 2 व्यक्तींची नावे मिळाली ती म्हणजे श्रीमती प्रिती आनंदराव शिर्के, वय 48 वर्ष त्यांचा मृत्यु मृत्युपत्रानूसार बायलॅट्रॅरल न्युमोनिया विथ सेप्टेसिनिया, विथ मल्टी ऑरगन फेल्युअर यामध्ये कुठेही हॅपेटायटीस किंवा यकृताचा रोग याचा उल्लेख नाही. मृत्युचे कारण हे सेप्टीक शॉक आहे.

श्री.तानाजी वनवे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, या ठिकाणी जे 60 ते 70 लोक पिलीयाने बिमार आहे त्या संबंधाने का माहिती घेतली नाही. कारण हे जे आपण रिपोर्ट घेतले आहे किंवा त्या ठिकाणी अशुध्द पाणी असल्यामुळे ते झालेले आहे. त्या भागातले नगरसेवक येथे आहे श्री.बाल्या बोरकरजी त्यांना सुध्दा त्या भागातील माहिती आहे. हे सर्व लोक माझ्याकडे आले त्यांनी माहिती दिली. आपण जी माहिती देत आहे ती चुकीची आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :– पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, आता हा प्रभाग आमच्याकडे जोडला आहे. त्या भागात दुषित पाणी येत असल्यामुळे आम्ही मा.महापौरजी यांच्याकडे डेप्युटेशन दिले त्या नंतर महापौर, थोटे मॅडम, फायलेरिया अधिकारी, आणि वैद्यकीय अधिकारी (एस) श्री.दासरवार साईडवर आले घाणेरडे पाणी कुठे कुठे येते तेथे 4 ते 5 जी फ्लॅट स्किम आहे आणि तेथील जे गडर लाईन आहे तूटलेली आढळली आहे ती गडर लाईन लिकेज असते ते पाणी आपले जी वॉटर लाईन आहे ते दुषित पाणी खिचते त्यामुळे पिलीयाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सुरुवातीला ती गडर लाईन आहे ते बंद करा त्या संदर्भात मी सहा.आयुक्तांना सांगितले, त्यावेळेस दासरवार साहेब होते झोनल अधिकारी होते मी त्यांना सांगितले की आपल्या येथे 210 कर्मचारी आहे सफाई मजदूरांची इथे बिल्डींग आहे, तेथे सायं. 5 वाजता मी तेथील नगरसेवकांना विनंती करतो तुम्ही 5 मिनीटे पार्किग मध्ये उभे रहा तेव्हा तुम्हाला माहिती होईल की मच्छराचा आतंक कसा असतो, मा.महापौरजी मी त्या अधिका–यांना सांगितले की आपल्या येथे 210 कर्मचारी आहे. 210 कर्मचा–यांपैकी फक्त 50 कर्मचारी 11 ते 2 या 3 घंटे किंवा 2 घंटे पावडे घेवून तेथले गवत साफ करतील आज 15 दिवस झाले अजूनही कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी प्रशासनाने माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे.

वैद्यकीय अधिकारी, एम (श्री.चिव्हाने) :– मा.महापौरजी, नंदनवन घरकुल येथे दुषित पाण्यामुळे 2 व्यक्तींचा मृत्यु झाला या बाबत मी विश्लेषण करीत आहे प्राप्त झालेल्या अहवालानुसार बायलॅट्रॅरल न्युमोनिया विथ सेप्टेसिनिया, विथ मल्टी ऑरगन फेल्युअर याच्यामध्ये हिपॅटायटीस हा कशामुळे होतो याच्यात असे म्हटलेले नाही आहे की याचे उदाहरण देण्यात आलेले आहे यामध्ये दुषित पाण्याचा सुध्दा उल्लेख केलेला आहे. झोनल अधिका–यांसोबत या क्षेत्रांचे सर्वेक्षण केले असता 22 कावीळ सदृश्य रुग्ण आढळले, त्यांचा उपचार शासकीय व खाजगी रुग्णालयातुन झालेला आहे. दि. 02.08.17 मध्ये कळविल्याप्रमाणे 22 नमुने शासकीय आरोग्य प्रयोग शाळेत मानकापूर प्रादेशिक प्रयोग शाळेत तपासणी साठी पाठविले असून 15 पिण्याच्या पाण्याचे नमूने पिण्यास अयोग्य म्हणून रिपोर्ट आरोग्य विभागाला प्राप्त झालेला आहे. त्यानुसार जलप्रदाय विभागाला सुध्दा या बद्दल अवगत केलेले होते तसेच 884 घरांचा सर्व्हे करुन एकुण 7000 क्लोरिनच्या गोळयांचे वाटप करण्यात आले. व सर्वेक्षण करतेवेळी जलजन्य आजाराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन पत्रके वाटून संबंधित क्षेत्रात जनजागृती करण्यात आली तसेच तेथील रहिवासी असलेले स्कीमचे अध्यक्ष सचिव यांना पिण्याचे पाणी शुध्द करण्याच्या संबंधात सूचना देण्यात आल्या सरतेशेवटी हे निर्देशनास आले की नंदनवन घरकूल मध्ये 11 इमारती आहे त्याचे जे खाली संप आहे त्या टॅक मध्ये ब–याच प्रमाणात दुषितपणा आढळून आलेला होता त्या बद्दल जलप्रदाय विभागाला सूचना दिलेली आहे त्या बद्दल त्यांनी कारवाई सूरु केलेली आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, आपल्याकडे दुषित पाण्यामुळे पिलीया झालेला आहे हे आपण मान्य केलेले आहे. जलप्रदाय विभाग आणि ओसीडब्लु च्या अधिका–यांचा हा जो एक विषय आहे नंदनवन घरकुलचा आणि या घरकूलच्या संदर्भात आम्ही स्वतः जावून चौकशी केली आहे पाहणी केली आहे, आणि

त्याच्यानंतर आम्ही हा प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्यांनी चूकीची माहिती दिलेली आहे. येथे जे पाणी आहे आता जे संबंधित नगरसेवक बोलले तेथे जे घरकुल आहे तेथे मा.आयुक्त, मा.सभापती, नासुप्र, मा. पालकमंत्री, मा.आमदार यांची एक बैठक सुध्दा त्या ठिकाणी झाली आणि त्या ठिकाणी अक्षरशः मच्छर फॅक्टरी आहे. तेथे जर उभे राहिले तर जसे माताचे वळ येतात तसे वळ तुमच्या चेह—यावर येतात अशी विक्राळ परिस्थिती त्या ठिकाणी आहे. 12 फुट खोल खड्डा आहे त्यामध्ये साप, विंचू, आणि सर्व मच्छर तयार होतात त्या ठिकाणी मागच्या 5 वर्षामध्ये मोठया प्रमाणात सातत्याने पत्र व्यवहार केला, मा. पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत मिटींग झाली त्यामध्ये आदेश दिले तो खड्डा बुजविला पाहिजे, नगरसेवक या ठिकाणी पेठेजी आहे परंतु त्या ठिकाणी कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्या ठिकाणी रोगराईचे खरे कारण असेल तर ते आहे 12 फुट खोल खड्डा त्यामुळे इमारती एकदम केव्हाही कोलमडु शकते अशा प्रकारचे क्षारयुक्त पाणी आहे. आणि ते ताबडतोब ते बंद केले पाहिजे. शहरामध्ये जे घाण पाणी येत आहे पिवळे, हिरवे ओ.सी.डब्लु. चे सचिन द्रवेकर असेल तर त्यांना बोलवा आपण आणि त्यांना हे पाणी प्यायला दया, हे जे पाणी आहे हिरवे पाणी पिवळे पाणी जे कोणी असेल ओ.सी.ब्लु. चे किंवा या ठिकाणी जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता त्यांनी या ठिकाणी उत्तर दयावे हिरवे, पिवळे पाणी कसे येत आहे 8 दिवसांपासून कि ज्या डोल्यामध्ये पाणी येते कन्हान मध्ये कन्हानच्या डोल्यात जो फिल्टर प्लान आहे तो त्या ठिकाणी खचला त्या ठिकाणी ती जाळी तुटली आणि सर्व घाण पाणी फिल्टर न झालेले पाणी, त्यामध्ये सर्व घाण पाणी आणि शेवाळ आले आणि त्या शेवाळ पुर्ण पाईप लाईन आणि टाकीमध्ये आलेले आहे. आणि ते दुषित पाणी आल्यामुळे हा सर्व प्रकार होत आहे, त्या बद्दल त्यांनी माहिती दयावी.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, या संबंधात माझा एक प्रश्न असा आहे की येथे अधिका—यांनी सांगितले की 22 वॉटर सॅम्पल पैकी 15 सॅम्पल मध्ये पिण्यायोग्य पाणी नाही असा अहवाल त्यामध्ये आलेला आहे त्यासंदर्भात त्यांनी माहिती दयावी की कुठल्या कुठल्या भागात ते आहे आणि त्यावर कोणत्या उपाययोजना केल्या आहे.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :— मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेत्यांचा जो पहिला प्रश्न होता कन्हानच्या बाबतीत, कन्हान मध्ये 11 तारखेपासून ऑगस्ट महिन्यात त्या नदीमध्ये हिरवटसे पाणी यायला लागले ते पाणी का येत आहे त्याचा आम्ही शोध घेतला त्यावेळेस त्या पाण्याला घाण वास येतो. ती नदी फॉरेस्ट मधुन येते तेथील पाणी कमी झाल्यामुळे ते शेवाळ संपूर्ण मिक्स झालेले होते आणि त्याला हिरवटसा रंग आलेला होता आणि मग या करिता ट्रीटमेंटसाठी बरेच प्रयोग केले त्यासाठी 4 टेस्ट केले त्यामध्ये ॲरॉमचा डोस दिला त्या पाण्याची डरबिटी फार कमी होती आणि ज्या वेळी त्या पाण्यामध्ये ॲरॉम ॲड करीत होतो त्यावेळी पाण्यामध्ये फॉक तयार होत होता, जनरली पाण्यामध्ये ॲरॉम ॲड करतो त्यावेळी फॉक तयार होवून ते डिसॉल्व व ससपेक्टेड वॉटर असल्यामुळे निरीचे शास्त्रज्ञ,व्ही.एन.आय.टी. चे शास्त्रज्ञ डॉ.भोळे यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले त्यानंतर निरीचे जे शास्त्रज्ञ आहे डॉ. लापेटवार यांना सांगितले त्या पाण्यामध्ये डरबिटी वाढली त्यामूळे ॲरामचा डोस ॲड करावा लागेल आणि आज ती डरबिटी 1 वर आली आहे ती 5 वर येवून जाईल.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, आरोग्य विभागाने जो अहवाल दिला 15 सॅम्पल पिण्यायोग्य नाही ते कुठल्या भागातले होते त्यावर आपण काय उपाययोजना केल्या आहे. अनेक भागातून अशा प्रकारच्या किती तक्रारी आल्या आहे आणि त्या कुठल्या भागातल्या आहे त्याची पण माहिती दयावी.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :— मा.महापौरजी, मागच्या सभेमध्ये दुषित पाण्याबद्दल निर्देश दिले होते त्या संबंधात जे सर्व डेलीगेटस् आहे आणि झोनल मॅनेजर आहे त्यांना मी इन्फॉर्म केले की सर्व नगरसेवकांना कॉन्टॅक्ट करा त्यामध्ये कुठे कुठे दुषित पाणी येते.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, एकाही नगरसेवकांना या संदर्भात विचारणा केलेली नाही की कुठे दुषित पाणी येत आहे. तुम्ही त्यांच्याजवळून पूर्ण माहिती घ्या एक तर लोकांना दूषित पाणी पिण्यासाठी देत आहे आणि लाखो रुपयांचे बिल देत आहे

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी हे जे 22 सॅम्पल आहे ते कुठल्या भागातले आहे आणि 15 जे फेल्युअर सॅम्पल आले आहे ते कुठल्या भागातले आहे.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :— मा.महापौरजी, 15 लोकांचा अहवाल माझ्याकडे नाही आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, एकीकडे दुषित पाण्याने 15 लोकांचा मृत्यु झाला आहे अशा प्रकारचा अहवाल आहे आणि या ठिकाणी आरोग्य विभागाने पत्र दिल्याची माहिती या सभागृहामध्ये देवून राहिले आणि सन्माननिय कार्यकारी अभियंता या ठिकाणी हे म्हणतात की माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. इतका गंभीर विषय जेथे पावसाळयाच्या दिवसामध्ये डरबिटी वाढते आणि दुषित पाण्याच्या मोठया प्रमाणात तक्रारी आहे. या पावसाळयातच निर्माण झाल्या असे नाही. उन्हाळयापासुन निर्माण झालेल्या आहेत. हावरा पेठ असेल, नंदनवन असेल, कमलेश चौधरींचा ऐरिया असेल या संपूर्ण परिसरामध्ये मोठया प्रमाणात तक्रारी आहे. या संदर्भात यांच्याकडे माहिती नाही असे योग्य म्हणणे होणार नाही.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्री.गायकवाड) :— मा.महापौरजी, 15 सॅम्पल जे आहे ते नंदनवन घरकूल मधलेच आहे तेथे पाणी चांगले आहे परंतु तेथे जे बेसमेंट आहे त्या पाण्यामुळे ते पाणी दूषित झाले.

वैद्यकीय अधिकारी, एम (श्री.चिव्हाने) :— मा.महापौरजी, 22 सॅम्पल 2 ते 4 तारखेपर्यत घेण्यात आले होते घरकूल संकूल मध्ये ज्या 11 बिल्डींग आहे त्यामध्ये 1—1 बिल्डींग मध्ये 60 ते 70 फ्लॅट आहे तेथील सॅम्पल घेण्यात आले होते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी ही तक्रार फक्त नंदनवन घरकूलातीलच होती काय की याच्या व्यतिरिक्त कुठल्या भागातील तक्रारी होत्या

वैद्यकीय अधिकारी, एम (श्री.चिव्हाने) :— मा.महापौरजी ज्यांचा मृत्यु झालेला आहे त्याची माहिती घरकूल संकूलातीलच होती.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी हे चूकीचे माहिती देत आहे. आम्ही सुध्दा दुषित पाण्याबद्दल निवेदन दिलेले आहे.

(बेल)

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, सदस्यांनी ज्या तक्रारी केल्या आहेत त्या आपल्यापर्यंत पोहचल्यात काय? (बेल)

महापौर :— विषयाचे गांभीर्य ओळखूनच मी या विषयाला संम्मती दिलेली आहे आणि 6 मिनीटाच्या वर वेळ पण दिलेला आहे.

श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, अभी जो प्रश्न पूछा गया है वह तानाजी वनवे व्दारा पुछा गया है, प्रशासन जो आन्सर दे रहा है, पूरे शहर मे अगर दुषित पानी का प्रॉब्लेम हो रहा है तो उसके लिये अलग विषय रखना चाहियें। प्रफुल्ल भाई ने अभी कहा कि जिनका प्रश्न है उनको बोलने का मौका दिया जायें फिर उसी सदस्य ने विषय रखना चाहियें।

(बेल)

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या ठिकाणी जे प्रश्न सन्माननिय विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे यांनी विचारले निश्चितच त्या प्रश्नांच्या मागे गांभीर्य आहे, या शहरामध्ये केवल नंदनवन घरकुलच नाही तर अनेक ठिकाणी अशा पध्दतीचे दुषित पाणी येत असतील तर ते बघणे अत्यंत महत्वाचे आहे मग कुठे गडर लाईनचा प्रश्न असतील त्यामधुन गेलेले पिण्याच्या पाण्याचे नळ असेल आपले इतर कुठलेही विषय असतील त्या विषयाच्या माध्यमातून जर कोणाचा मृत्यु झाला असेल तर आणि त्याला जर नागपूर महानगरपालिका जबाबदार असेल तर दुर्देवानी ते बरोबर नाही. त्यामुळे या सभागृहातल्या ज्या ज्या सदस्यांच्या भावना त्यामध्ये जुळलेल्या आहे त्यांच्या भावना अत्यंत ख—या आहे त्यांच्या भावनांच्या मागची तळमळ तुम्ही आणि आम्ही सर्वांनी मिळून बघणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू हे होत असतांना प्रशासन देखील या मध्ये जर तंदरुस्त राहिले नाही तर याची जबाबदारी तुमची आणि आमची आणि सर्वांची आहे अनेकदा प्रशासनाला सांगून देखील काम होत नाही. जसे सन्माननिय कमलेशजी चौधरी यांनी सांगितले की मा.महापौरजी आपण आदेश दिले होते की 7 दिवसामध्ये करावे, आज 19 दिवस झाल्यानंतर जर प्रशासन झोपले होते तर त्या प्रशासनाचे कान पकडण्याचे काम देखील आपल्याला करावे लागणार आहे. 7 दिवस म्हटल्यावर 19 दिवस मा.महापौरांनी आदेश दिल्यानंतर तुम्ही झोपले असाल तर मा.महापौरजी यांना आज तंबी दया ज्या ज्या सदस्यांनी सांगितले त्या भागात 3 दिवसाच्या आत स्वतः विझीट करा, त्यांना हेल्थचे कर्मचारी दया, चिव्हाने

सारखा माणूस घ्या आणि 8 दिवसात जर तूमच्या टेबलवर जर रिपोर्ट यांनी ठेवला नाही तर मा.महापौरजी यांना घरी पाठवा, जर एखादयाचा जिव जात असेल तर विरोधी पक्ष सोडा, सत्तापक्ष सोडा तुम्ही आणि आम्ही आपण सर्व लोक जबाबदार आहे. कोणाचाही जीव जात असेल तर ते अत्यंत हलके पणाने घेण्याची गरजच नाही यांनी हे 7 दिवसांचे निवेदन केले त्यावर यांनी काय कारवाई केली बाकी सर्व सांगतात आहे मनोज सांगोळे सांगत आहे, घोडेस्वार सांगत आहे ते जे काही सांगत आहे ज्या ज्या सदस्यांनी सांगतले आहे त्यांना 7 दिवसात म्हणजे आजची तारीख आहे 19 यांना उद्याची सुट्टी जावू दया 23 आणि 24 तारखेपर्यत हा जर अहवाल तुमच्या टेबल वर नसला तर तुम्ही आज सक्त प्रशासनाला निर्देश दया की यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दया.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, या ठिकाणी सत्तापक्ष नेते बोलले ती वस्तुस्थिती आहे शहरातील जे घरकूल आहे आणि नगरसेवकांच्या ज्या गंभीर समस्या आहे या विषयांचे गांभीर्य ओळखून जर सत्तापक्ष नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे 4 दिवसांत जर अहवाल आला नाही तर जे कोणी दोषी असतील तर त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे, ही मागणी मी या ठिकाणी करतो. (बेल)

महापौर :– दुषित पाण्याच्या संदर्भात मा.सदस्यांच्या तिव्र भावना लक्षात घेवून प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे. सत्तापक्ष नेते, विरोधी पक्ष नेते यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे आरोग्य विभाग, जलप्रदाय विभाग, अपर आयुक्त कुंभारे साहेब येणा–या चार दिवसात याचा संपुर्ण अहवाल माझ्या समोर ठेवावा या करिता 25 तारखेची वेळ देण्यात येत आहे. याच्यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय होता कामा नये अन्यथा कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, अहवाल आज सादर होईल काय ? सभागृहातील कामकाज कलम 454 नुसार प्रश्न संपल्यानंतर मागील सर्व साधारण सभेची किंवा मागील सर्वसाधारण सभेनंतरच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे अशातला हा प्रकार आहे म्हणून प्रश्न उत्तराचा तास संपलेला आहे म्हणून हे कार्यवृत्त मंजूर करण्याआधी 20/07/2017 ला जी रुलिंग दिली होती त्या संदर्भात अहवाल येथे सादर करावा.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, तो अहवाल मा.आयुक्तांनी दिलेला आहे तो देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

महापौर :– जो अहवाल दिलेला आहे तो संदीपजी सहारे यांना देण्यात यावा.

श्री प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, माझ्या लक्षवेधीचे वाचन सभागृहात करण्यांत यावे, तश्या सूचना आपण प्रशासनाला द्याव्या.

महापौर :– लक्षवेधीचे वाचन करावे.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :– मा.महापौरजी, ही लक्षवेधी प्राप्त झालेली आहे ते मी वाचून दाखवित आहे. महोदया, नागपूर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थीना अद्याप शालेय गणवेश मिळाले नसल्यामूळे वर्तमानपत्रामध्ये मागील अनेक दिवसांपासून बातम्या प्रसिध्द होत आहे. अनेक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय गणवेश मिळालेले नाही त्याबाबत शासनाचे काय धोरण आहे या धोरणाची अंमलबजावणी करतांना कोणती अडचण निर्माण होते त्या प्रकरणी काय उपाययोजना करण्यात आली, आतापर्यत किती विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले व किती विद्यार्थी गणवेशापासून वंचित आहे याबाबत लक्षवेधी देण्यात आली. या लक्षवेधीवर आयुक्तांना निवेदन करायचे आहे, या संदर्भात माझी विनंती अशी आहे की आज नेमके या विषयाचे उपायुक्त आहे ते रजेवर आहे त्यामुळे मी येथे निवेदन करु शकत नाही या बद्दल माझी मा.महापौरजी आणि सत्तापक्ष नेते यांना विनंती करतो.

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, याला अनुमोदन आहे. पुढच्या वेळेस निवेदन करण्याची संधी दयावी.

महापौर :– स्थगन प्रस्ताव, मा.सदस्य, बंटी शेळके यांनी दिलेला आहे त्याला मी संम्मती देत नाही कारण प्रशासनाकडुन माहिती घेतली असता, अग्निशमन व आरोग्य विभागाने काल झालेल्या पावसाने कुठेही पाणी तुंबलेले नाही, अशी प्रशासनाची भुमिका आहे.

श्री प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, तो आपला अधिकार आहे आपण स्थगन प्रस्ताव नाकारता, माझी मागणी आहे कि आपण ते मतदानाला ठेवावी.

महापौर :– स्थगन प्रस्ताव मतदनाला ठेवावे व स्थगन प्रस्तावाच्या बाजूने ज्यांचे मत आहे त्यांनी हात

वर करावे व त्याची नोंद घ्यावी. (स्थगन प्रस्तावाच्या बाजूने हात वर करणा–या मा.सदस्यांची नोंद घेण्यात आली) स्थगन प्रस्तावाच्या बाजूने 34 हात वर आहे व (स्थगन प्रस्तावाच्या विरुध्द बाजूने हात वर करणा–या मा.सदस्यांची नोंद घेण्यात आली) प्रस्तावाच्या विरुध्द बाजूने 105 मते पडलेली आहे. स्थगन प्रस्ताव मतदानाने फेटाळला आहे.

श्री प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, विषय पत्रिका घेण्या आधी मागच्या सभेचे खालील कार्यवृत्त कायम करणे हे आपण आता घेणार आहे कि विषय पत्रिका संपल्यानंतर घेणार आहे, याबाबत माहिती देण्यांत यावी. मा.महापौरजी, मागील सभेचे कार्यवृत्त कायम करणे या विषयावर मला बोलावयाचे आहे. माझा यावर आक्षेप आहे.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, मला जो अहवाल दिला आहे त्याचे वाचन झाले नाही आणि त्या अहवालावर स्वाक्षरी सुध्दा नाही.

**<u>ठराव क्रमांक 78:–</u>** स्थायी समिती ठराव क्र. 883 दिनांक 27/12/2017 नुसार नागपूर शहरातील दहा झोन्स/ अंतर्गत अस्तित्वात असलेले पारंपारीक पथदिवे ;सोडीयम व्हेपर, मेटल हलाईड, टयुब लाईट/स, सि.एफ.एल. इत्यादी उर्जाकार्यक्षम एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलविणे तसेच हे संपूर्ण पथदिवे ज्या यंत्रणेत आहेत त्या यंत्रणेतील निकामी केबल्स/ बदलणे, तुटलेल्या खांबाच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इत्यादी कामे 84 ई.एम.आय.(इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंटस) व्दारा परतफेड करण्याच्या धर्तीवर बदलणे, मेट्रो रेल रूट वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करणे व रिंग रोड वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करण्याचे कामाचे रेग्युलर पध्दतीने भुगतान करणे व या संपूर्ण यंत्रणेची संपूर्ण कंत्राटाच्या काळात (15 महिन्यांचा जेस्टेशन पिरीअड + 84 महिन्यांचा परतफेडीचा काळ = 99 महिने ) देखभाल दुरस्ती करणे या कामातील इन्फास्ट्रक्चर स्ट्रदनिंग या कामाकरीता कंत्राटदाराने काम केल्यानंतर ई.एम. आय. रूपाने देय असणा–या रकमेचा विचार करता महानगरपालिकेने बॅके तर्फे कामाची संपूर्ण रक्कम एकमुश्त वळती केल्यास महानगरपालिकेचा आर्थीक फायदा होत असल्यास तसा तपासुन प्रशासनाने त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान करण्यात आलेली असल्याचे अनुषंगाने अंमलबजावणीकरीता या कामास्तव एकूण रूपये 73 कोटीची रक्कम ;रिंगरोडवरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करणे याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाकडुन निधी प्राप्त न झााल्यास या खर्चाच्या रू. 14 कोटीच्या रकमेचा समावेश करून 'महाराष्ट्र शासनास' एकूण रू. 73 कोटी) कर्जरूपाने उभारण्यास 'महाराष्ट्र शासनास' विनंती करण्यास महासभेपुढे मंजूरी प्रदान करण्यास्तव प्रस्ताव ठेवण्याचा प्रश्न विचारात घेऊन राज्य शासनाकडून जोपर्यंत कर्जास मंजूरी प्राप्त होत नाही तोपर्यंत अर्थसंकल्पीय तरतूदी मधुन कंत्राटदारांना EMI भुगतान करावे जेणे करून हे कार्य सुरळीत सुरू राहील या शिफारसीसह विषय मा. सभागृहास मंजुरीकरीता पाठविण्यास समितीने स्थायी समिती ठराव क्र. 81 दिनांक 23/06/2017 अन्वये एकमताने मंजूरी प्रदान केली असल्याचे अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 79:–</u>** पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालय प्रकल्पाकरीता

महाराष्ट्र वन विकास महामंडळास, नागपूर महानगरपालिकेच्या व्यवस्थापणाखाली असलेल्या मौजा गोरेवाडा सर्व्हे क्र. १०६ मधील एकूण १९.५५ हे.आर. जागेपैकी ११.५२ हे.आर. जागा, सर्व्हे क्र. ११३ मधील एकूण ०.६५ हे. आर. जागेपैकी ०.२८ हे.आर. जागा, सर्व्हे क्र. ११८ मधील २.९७ हे.आर जागा, सर्व्हे क्र. ११९ मधील ०.०१ हे.आर जागा, सर्व्हे क्र. १२० मधील ०.३३ हे.आर जागा, सर्व्हे क्र. १२१ मधील १०.४४ हे.आर जागा व सर्व्हे क्र. १२२ मधील ०.०२ हे.आर अशी एकूण २५.५७ हे.आर. जागा हस्तांतरणास महानगरपालिकेची हरकत नसल्याची मंजुरी , या जागेच्या हस्तांतरणाचे मोबदल्यात संचालक गोरेवाडा यांचे ताब्यात असलेली मौजा गोरेवाडा सर्व्हे क्र. २/१, २/२ व २/३ मधील एकूण २५.५७ हे.आर. जागा नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात येईल तसेच वन विकास महामंडळाने सदर जागेच्या वास्तविक वापरासंबंधीची ब्ल्यु प्रिंट व वन विकास महामंडळाचे वापरामुळे गोरेवाडा तलाव प्रदुषित होणार नाही असे हमीपत्र महानगरपालिकेला सादर करण्याचे अटींवर प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या प्रकल्पामधून प्राप्त उत्पन्नामधून काही हिस्सा महानगरपालिकेस देण्यात यावा या अटीसह

संबंधित परिसरातील नगरसेवकासमवेत मा.आयुक्त यांनी या जागेच्या सद्यपरिस्थितीची पाहणी करून अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यात येतो या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सूचनेसह हा विषय मंजूर करण्यांत येतो या मा.महापौर यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.जगदीश ग्वालबंसी :— मा.महापौर महोदया, गोरेवाडा कॅचमेंट इलाका यह 1985 की रेजीम मे नागपूर महानगरपालिका की हजारो हेक्टर जमिन वन विभाग को सोंपी गयी, और उसमे से जो बची हुई जमिन थी, श्री दशरत चौधरी उस वक्त जलप्रदाय विभाग के मुखिया थे, उन्होने वह जमिन राखीव रखा है, वह जो बची हुई जमिन है वह बहोत महत्वपूर्ण है। वह बहोत मुश्किल से बची हुई जमिन है, मा. मुख्यमंत्रीजी ने 25.57 हेक्टर ओर जमिन वन विभाग को देने का प्रस्ताव आपके सामने रखा है। और उसमे गोरेवाडा से लगकर माहुरजरी मे कम से कम से कम आठ खदाने है और उसमे से चार खदाने बंद पडी हुई है। और भारत सरकार ने उन खदानो को पांच कि.मि. आगे बढाने का प्रस्ताव सामने रखा। मा. मुख्यमंत्रीजी का सुझाव है, उन्होने मिटींग लेकर कहां है कि इतनी जमिन हमको कम जा रही है, इस विषय मे मेरा निवेदन है कि, यह जो जमिन है जो एकदम गोरेवाडा कॅचमेंट से लगकर माहुरजरी के पूर्व भाग मे है, पिठेसूर की जो खदाने है वह गोरेवाडा कॅचमेंट से लगकर है, वह 57 हेक्टर आर से ज्यादा जमिन है। और उसको हमको हस्तांतरण करना है, उसके बदले मे किनारे की जमिन ली जाये, और उसको अपने पास रखा जाये। ऐसा मैं आपसे आग्रह करता हुं। मौजा दाभा को जो दूषित पानी गोरेवाडा मे जा रहा है, पिछली बार 1997 मे यहां पर महापौर कौन्सिल मे महापौर श्री देवेंद्र फडणवीस थे, आज जो महाराष्ट्र के मुख्यमंत्री है, उस समय स्थायी समिती के सभापती श्री अशोक गोयल थे, मैं यह बात 1997 से लगातार हाउस मे उठाते आया हुॅं कि, मौजा दाभा का पुरा गडर लाईन का पानी गोरेवाडा तलाव मे जा रहा है, और उस काम के लिये कई बार टेंडर भी निकाले गये है आनेवाले हाउस मे नागपूर सुधार प्रन्यास से पूछा जाये कि आपने इस संदर्भ मे क्या कार्यवाही की है, और कितने दिन मे यह काम पुरा हो जायेगा। अगर वह काम जल्द नही किया गया तो आगे जाकर वह दुषित पानी गोरेवाडा तालाब मे जायेंगा आज गोरेवाडा मे पिने का पानी पम्पिंग किया जा रहा है और वही दुसरी ओर गोरेवाडा मे गडर का पानी जा रहा है। यह बडी शोकांतिका की बात है। इसलिये मेरी आपने प्रार्थना है कि आनेवाले हाउस मे आप नागपूर सुधार प्रन्यास से पुछें कि उनका काम चालु है वह काम कितने दिन मे आप पुरा करोगें, इसके संदर्भ मे यहापर जानकारी दि जायें, और मेरा आपसे निवेदन है कि अपने सत्तारूढ पक्षनेता और विरोधी पक्षनेता है वह इसमे रास्ता निकाले, वहां पर निगम आयुक्त को भेजकर पूरी टिम को भेजकर जानकारी ले, जो बात हमने आपके सामने रखे है, उसमे रास्ता निकालकर अपनी महत्वपूर्ण जमिन गोरेवाडा की बच सकती है, इस संदर्भ मे कार्यवाही करे।

श्री कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, मा.सदस्यांची भावना लक्षात ठेवून हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री.जगदीश ग्वालबंसीजी त्यांच्या भागातला जो विषय आहे, दशरथ चौधरी आपले कार्यकारी अभियंता जलप्रदाय हे त्यावेळेस सेवानिवृत्त होण्याच्यापूर्वी गोरेवाडा प्रकल्पाला जो प्राणी संग्रहालय त्या ठिकाणी होत आहे सामाजिक वनीकरणाला आपण मोठया प्रमाणामध्ये मोफत जमिन दिली होती. आणि त्या ठिकाणी पर्यटन स्थळ करण्याचा काम त्यांनी सुरू केलेला आहे. आणि आता जगदीश ग्वालबंशी यांचे म्हणणे आहे कि ती जमिन आहे ती देते वेळी जो मोबदला जो जमिन आपल्याला मिळणार आहे ती जमिन आणि आता जी जमिन आपण देणार आहे ती जमिन आणि त्याच्या बाजुला जी जमिन आहे खदानी ला लागुन असलेली आहे त्या जमिनीचा पुर्ण सर्व्हे करून प्रत्यक्ष त्या ठिकाणी जावून अहवाल येईपर्यंत हा विषय स्थगित ठेवण्यांत यावा, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री.हरीश ग्वालबंसी :— मा.महापौरजी, इस संदर्भ मे एक समिती बनाकर वहां के जो स्थानीय नागरिक है उनकी भी राय ली जाये। गोरेवाडा फिल्टर की जो जगह बची है 25.57 हेक्टर और वहां पर म.न.पा. कर्मचारीयो की भी वसाहत है, उनकी भी राय ली जाये। वहां जो स्थानीय नागरिक रहते है उनके भी इच्छा की राय लि जायें। उनका भी समिती मे समावेश किया जाये। और मेरी आपसे विनंती है कि इस संदर्भ मे जो समिती गठित करेगें उसमे वहां के स्थानिय नगरसेवक को भी समावेश किया जाये।

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, गोरेवाडा प्राणी संग्रहालय प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाचा व महानगरपालिकाचा देखील अत्यंत भुषणावह प्रकल्प येणा–या दिवसामध्ये होणार आहे. या प्रस्तावामध्ये जवळपास 25.57 हेक्टर जागा ही महाराष्ट्र शासनाने नागपूर महानगरपालिकेला मागितली आहे. आणि याच्या ऐवजी महाराष्ट्र शासन स्वतःच्या मालकीची 25.57 हेक्टर जागा नागपूर महानगरपालिकेला देणार आहे. मा.सदस्य जे या ठिकाणी बोलले त्यांची भावना लक्षात घेता माझी आपणास विनंती आहे की त्या ठिकाणी स्वतः मा.आयुक्तांनी भेट द्यावी, त्या संपुर्ण जागेचा एकंदरीत अवलोकन करून याबाबतीत योग्य तो निर्णय मा. निगम आयुक्तांनी घ्यावा, हया पध्दतीचे आदेश आपण प्रशासनाला द्यावे.

श्री.हरीश ग्वालबंसी :– मा.महापौरजी, आयुक्त साहब के साथ वहां के जो स्थानीय नगरसेवक है उनकी भी राय इस संदर्भ मे लेना चाहिये।

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, ज्यावेळेस आयुक्त त्याठिकाणी जातील त्यावेळेस त्यांनी स्थानीय नगरसेवकांना ही सोबत घेवून जावे. आणि हे होत असतांना या प्रकल्पामध्ये महानगरपालिकेला काही रेव्हेन्यु शेअर देखील त्या जमिनीचा द्यावा या पध्दतीचे निर्देश आपण प्रशासनाला द्यावे.

महापौर :– सत्तापक्षनेते यांनी दिलेल्या सूचनेसह रेव्हेन्यु शेअरचा विषय त्यांनी मांडलेला आहे त्यांच्या सूचनेसह हा विषय मंजूर करीत आहे.

श्री.हरीश ग्वालबंसी :– मा.महापौरजी, जो जमिन का विषय आया है वह जमिन देना है क्या ?

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, आमचे म्हणणे असे आहे कि आपण कुठली जमिन दिली ती जमिन देत असतांना महाराष्ट्र शासनाने त्या ठिकाणी रेव्हेन्यु कमविला तर त्यापैकी काही शेअर महानगरपालिकेला देण्यांत यावा, जोपर्यंत त्या ठिकाणी आयुक्त जात नाही, ते बघत नाही, ते बघितल्यानंतर जो निर्णय होईल, तो निर्णय होईल परंतू जर अश्यापध्दतीचा निर्णय झाला तर त्यापध्दतीने शेअर्स महानगरपालिकेला मिळावे. असे आमचे स्पष्ट म्हणणे आहे हे होत असतांना गोरेवाडाचे जे पाणी दूषित होत आहे, अश्यापध्दतीचा विषय मा.जगदीशजी यांनी या ठिकाणी ठेवला माझी विनंती आहे कि त्या ठिकाणी एस.टी.पी.ची रचना महानगरपालिकेतर्फे करण्यांत यावी.

**<u>ठराव क्रमांक 80</u>:–** मनपा ठराव क्र. 45 अन्वये दिनांक 20.06.2017 अन्वये महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची दिनांक 12.07.2017 रोजी भरलेल्या खालील सभेच्या अहवालास मंजूर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून 1) Regulation No 14.2.1(b)(i) मे Labour commissioner Mumbai की जगह Appropriate Labour Commissioner/ Labour Commissioner Nagpur किया जाये । 2) N.O.C. प्राप्त करने की अर्जी पर 30 (तीस) दिन के अंदर Labour Department ने प्रस्ताव उचित रहने से कार्यवाही करनी चाहिए अन्यथा N.O.C. मिली ऐसा ग्राहय किया जाए । तसेच अनुक्रमांक 5(i) वरील अभिन्यास सक्षम प्राधिकारणीने या सुधारणा करण्यापूर्वी मंजूर केलेले आहे. अशा मंजूर अभिन्यासाला किंवा भूखंडाला लागू होणार नाही. तसेच आक्षेप व सुचना सुनावणीनंतर शासनाकडे पाठविण्याचे अधिकार आयुक्त मनपा यांना प्रदान करण्यात यावे या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांच्या सुचनेसह व मा.सदस्य श्री. सुनिल अग्रवाल यांनी दिलेल्या लेखी सुचनेसह हा विषय एकमताने मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**अहवाल**

महापालिका ठराव क्र. 45 दिनांक 20.06.2017 अन्वये नागपूर शहराचा मंजूर विकास नियंत्रण नियमावली 2000 मधील नियम क्र. 14.2.1 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये खालील प्रमाणे फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्याकरीता सभागृहाच्या मंजूरीकरीता ठेवला असता सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार या विषयाचा अभ्यास करून महापालिकेस शिफारस करण्याकरीता उपरोक्त ठराव स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकडे पाठविण्यात आला होता.

उपरोक्त ठरावाचे अध्ययन करून ठरावामध्ये नमूद नियम क्र. 14.2.1(b) मध्ये सुचविलेल्या दुरूस्तीमधील (b)(i) वाणिज्य विभागातील सर्व अनुज्ञेय वापर वाणिज्य विभागातील अनुज्ञेय चटई श्रेत्र निर्देशांसह वापरता येईल. परंतू निवासी तसेच गैर वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 20टक्के ऐवजी 10 टक्के प्रिमीयमचा भरणा करावा

लागेल. पुर्णपणे वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 40 टक्के ऐवजी 20 टक्के प्रिमीयम भरणा करावा लागेल.

अनुक्रमांक 3, Regulation No. 14.2.1.(b) मधील पोट कलम (ii) However Provision shall be made for convenience shopping as per provisions of Rule No. 13-6 हि तरतुद वगळण्यात यावी.

तसेच अनुक्रमांक 11 वरील Note (iii)मध्ये Built up area up to 50 sq.mtrs. ऐवजी Built up area up to 80 sq.mtrs. असा बदल करणे.

अशा प्रकारची दुरूस्ती करून प्रशासनाने सादर केलेला उर्वरीत प्रस्ताव योग्य व समर्पक असल्यामुळे उपरोक्त प्रस्तावास अशाप्रकारची दुरूस्ती करून हा प्रशासनाचा प्रस्ताव मंजूर करण्याची ही समिती एकमताने शिफारस करीत आहे

**ठराव क्रमांक 81**:— नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा (जिल्हास्तर) योजना अंतर्गत एकूण रु. 15,14,875/— रकमेचे 1 कामाचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असून या कामाकरिता महाराष्ट्र शासनाचे 100 टक्के अनुदान प्राप्त असून याकरिता म.न.पा. च्या दक्षिण नागपूर क्षेत्रातील खाली दिलेल्या 1 कामाचा समावेश करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय राशी |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र. 34 अंतर्गत संजय गांधीनगर, भोलेबाबा नगर, श्रीरामनगर व विविध ठिकांणी सिव्हर लाईन टाकण्याचे काम | 15,14,875/— |
| | एकूण राशी | 15,14,875/— |

**ठराव क्रमांक 82**:— डॉ. मिलिंद गणवीर, सहा. आरोग्याधिकारी, प्रभारी उप संचालक(आरोग्य) व आरोग्याधिकारी (स्वच्छता) यांना नागपूर शहरात " कचराघर मुक्त शहर" योजना राबविण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. 200, दि. 24/12/2007 अन्वये मूळ निविदेतील अटी व शर्ती व करारनाम्यातील अटी व शर्ती परस्पर बदलविल्यामुळे मे. कनक रिसोर्सेस मॅनजमेंट लिमिटेड यांना अतिरिक्त भुगतान करण्यात आल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याने, वित्तीय अनियमिततेमुळे, स्थापना विभागाचे आदेश क्र. 119/ओ. ॲन्ड एम. दि. 05/08/2017 अन्वये निलंबित करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 56 (1) $^{2}$(ब) तरतुदीनुसार महानगरपालिकेतील निलंबित करण्यात आलेल्या वरील अधिकाऱ्यांचे निलंबन कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.मनोज सांगोळे :— महानगरपालिकेच्या स्थायी समितीने 24—12—2007 ला एक ठराव पारीत केला होता. त्यामध्ये फक्त डॉ.गणवीरच दोषी आहे कि आणखी किती लोक याच्यामध्ये दोषी आहे. त्या ठरावा मध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे कि भारतीय रिझर्व्ह बॅकव्दारे ठराव कमांक 200 दिनांक 24—12—2007 ला हा ठराव मंजूर झाला होता. याची थोडीसी माहिती दिली तर बरे होईल. ठराव क्रमांक 200, दिनांक 24—12—2007 ला मंजूर झाला होता.

श्री.संदिप सहारे :— मा.महापौरजी, आपण डॉ.गणवीरला निलंबित केले त्याच्याबद्यल काही बोलावयाचे नाही, परंतु त्यांना निलंबित करतांना काय काय चार्जेस त्यांच्यावर लागले, कश्यापध्दतीचे लागले, याची माहिती सभागृहामध्ये देण्यांत यावी.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):— मा.महापौरजी, डॉ.गणवीर यांना स्थायी समितीच्या ठरावानुसार निलंबित करण्यांत आले आहे आणि दोषारोप पत्र तयार करण्यासाठी आरोग्य विभागाकडे नस्ती पाठविण्यांत आली आहे. दोषारोप पत्र तयार व्हावयाचे आहे.

श्री.संदिप सहारे :— मा.महापौरजी, मग हा विषय वापस पाठवा. कारण जर त्यांच्या निलंबनाची पूर्ण माहिती सभागृहाला होत नसेल तर आम्ही या विषयाला समर्थन कसे करू.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, स्थायी समितीच्या आदेशामुळे त्यांचा निलंबन झाले आहे कि प्रशासनाच्या शिफारसीमुळे त्यांचे निलंबन झाले आहे याची माहिती सभागृहाला दयावी.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, स्थायी समितीने जो ठराव मंजूर केला होता, त्यानंतर प्रथमदर्शनी चौकशीत असे आढळले कि कनक कंपनीसोबत जो अग्रीमेंट झाला होता.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, स्थायी समितीचा ठराव काय होता, त्याचे वाचन करण्यांत यावे.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— **विषय: स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक १५/०५/२०१७ ची अंमलबजावणी करण्याबाबत**

नागपूर शहरात 'कचरा घर मुक्त शहर' योजना राबविण्याकरीता स्थायी समीती ठराव क्र. २०० दिनांक २४/१२/२००७ अन्वये मे. कनक रिसोर्सेस मॅनेजमेंट लि. यांच्यासोबत रु. ४४९/— प्रति टन घनकचरानुसार दिनांक ०१/०३/२००८ ला करारनामा करण्यात आला. सदर एजन्सीला प्रती टन कचरा वाहतुकीचा दर (Base rate) रु. ४४९/— प्रती टन निश्चीत करण्यात आला होता व त्यावर प्रती तिमाही RBI च्या ऑल कमोडीटीच्या बदलत्या WPI प्रमाणे अनुज्ञेय ठरणारी वाढ देणे अशा स्वरुपाचा करार आहे. सदर करार दहा वर्षांचा करीता लागू आहे. **करारनाम्याची प्रत सोबत जोडलेली आहे**. (FLAG- A) कंपनीच्या वर्ष २००८ पासून प्रती तिमाही वाढीसह दिल्या जाणाऱ्या प्रदानानुसार जानेवरी २०१६ ते मार्च २०१६ या तिमाहीकरीता रु. १०३३.६८/— प्रति टन नुसार दर देण्यात येत होता. एप्रिल २०१६ पासूनच्या पुढील तिमाही करीता वाढीव दर निश्चित करावयाचा होता. कंपनीने एप्रिल ते जुन २०१६ पर्यंतच्या तिमाही साठीची देयके रु. १६०६.६९ प्रती टन दराने सादर केली. मागील तिमाही दरापेक्षा रु. ५७३.०१ प्रती टन एवढया मोठया वाढीसाठी एजन्सीने तिच्या कामगारांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २४/०२/२०१५ च्या अधिसुचनेनुसार वाढीव वेतन द्यावे लागणार आहे असे कारण दर्शविले. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांचे मतानुसार उक्त अधिसुचनेपूर्वी कामगाराचे माहे एप्रिल २०१६ चे किमान वेतन रु. १४२४१५८८/— होते ते अधिसुचनेतील दरा नुसार माहे जुलै २०१६ मध्ये रु. २९५१९०१०/— झाले. त्यानुसार कामगारांच्या वेतनामध्ये दरमाह रु. १५२७७४२३/— एवढी वाढ झालेली असून किमान वेतनामुळे १०७ % वाढ झालेली आहे. कंपनीने मागणी केलेले दर खुप जास्त वाटल्याने सखोल पडताळणी केली असता; मुळ निविदेनुसार कंपनीने बेस रेट वर फ्युयल व लुब्रीकंटच्या RBI च्या WPI प्रमाणे देयके तयार केल्याचे आढळले नाही. **मुळ निविदेची प्रत सोबत जोडलेली आहे**.(FLAG- B)

सदर बाबतीत अधिक पडताळणी केली असता मुळ निविदेमधील प्रदानाचे निकष /अटी—शर्ती कंपनीशी करार करतांना बदलेल्या आढळल्या. एप्रिल, मे, जून २०१६ हया तिमाही साठी निविदेच्या अटी—शर्तीनुसार रु. ७६४.०६/— प्रती टन दर येतो, तर कराराच्या अटी—शर्तीनुसार रु. ७७९.६६/— प्रती टन एवढा दर येतो. कंपनीने तर रु. १०३३.६८/— प्रती टन काम परवडणार नाही म्हणून काम करण्यास असमर्थता दर्शविली.

मुळ निविदा व प्रत्यक्ष करार यात तफावत असल्याने काम चालु ठेवणे योग्य ठरणार नाही असे स्पष्ट झाले. त्याच प्रमाणे ऐजंन्सीला करण्यात आलेल्या भुगतानाबाबत मनपा पॅनलचे सी.ए. कडून तपासणी करण्यात आली असता मुळ निविदेतील शर्ती—अटीनुसार आणि करारनाम्यातील शर्ती—अटीनुसार देय दर व वास्तविक देण्यात आलेला दर यामध्ये तफावत आढळून आलेली आहे. मुळ निविदेतील शर्ती—अटीनुसार रु. २३.९३ कोटी आणि करारनाम्यातील शर्ती—अटीनुसार रु. २४.६० कोटी रक्कम अतिप्रदान करण्यात आलेली असल्याबाबतचा अहवाल

मनपा सी.ए. यांनी सादर केलेला आहे.त४ **सी.ए. यांचा सविस्तर रिपोर्ट नस्तीमध्ये टाचण आहे**. (FLAG- C)

शहरभराचा कचरा संकलन व वाहतुकीची पर्यायी यंत्रणा तातडीने निर्माण करणेही शक्य होणार नव्हते. तसेच मनपा सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहीता असल्यामुळे स्थायी समितीला प्रस्ताव पाठविणे शक्य नव्हते. त्यामुळे कंपनीला प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाचा विचार करुन पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या काळासाठी दर निश्चित करण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्त यांचेव्दारे घेण्यात आला. त्यानुसार रु. १३०६/— प्रती टन दर ठरविण्यात आला. (निविदेतील अटी—शर्तीनुसार येणारा रु. ७७६.०६/— प्रती टन(जुलै २०१६ पासूनची तिमाही साठी येणारा) अधिक किमान वेतन कायद्यानुसार कामगारांचे वेतन वाढविल्यामुळे येणारा बोझा रु. ४४३/— प्रती टन अधिक हुडकेश्वर—नरसाळा हया मुळ निविदेत/करारात नसलेल्या भागात काम करावे लागत असल्याने वाढणारा बोझा रु. ३७.५८/— प्रती टन अधिक ५% अकस्मीक खर्च रु. ६२.२३/— प्रती टनाचा समावेश आहे).

कंपनीने त्यांचा मागणीचा दर रु. १६०६.६९/— प्रती टन तुलनेत उक्त रु. १३०६/— प्रती टन दराने पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत काम करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार जुलै २०१६ पासून उक्त दर याकामासाठी नव्याने निविदा मागवेपर्यंत देण्याच्या व पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याच्या निर्णयार्थ मा. स्थायी समिती समक्ष विचारार्थ ठेवण्यात आला.

सदर प्रस्तावाला मा. स्थायी समितीने ठराव क्र. ५१ दिनांक १५/०५/२०१७ नुसार सुचनांसह ठरावाला मंजुरी प्रदान केलेली असून सदर ठरावास कार्यान्वीत करण्याकरीता मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. **ठरावाची प्रत सोबत जोडलेली आहे.** (FLAG- D)

सोबत जोडलेल्या ठरावातील सुचना क्र. १ ''नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील कचरा संकलन व वाहतूक करण्याकरीता निविदा काढण्यात आल्या होत्या. उपरोक्त कंपनीला स्थायी समितीच्या निविदा मान्यतेनुसार कार्यादेश देण्यात आले. सदर कार्यादेश दिल्यानंतर मुळ निविदेतील अटी व शर्ती आणि करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये परस्पर बदल केलेला आढळून येतो व यास कोणत्याही सक्षम प्राधिकारणीकडून किंवा स्थायी समितीची मान्यता न घेता बदलविण्यात आल्या. मुळत: निविदेतील अटी व शर्ती परस्पर बदलविण्यात आल्यामुळे सदर प्रकरणात वित्तीय अनियमितता झाल्याचे या स्थायी समितीस प्रथम दर्शनी आढळून आले आहे. त्यामुळे ही अनियमितता ज्या अधिकाऱ्याव्दारे करण्यात आली त्या अधिकाऱ्याचे प्रशासनाव्दारे तात्काळ प्रभावाने निलंबन करण्याचे ही स्थायी समिती निर्देश देते. तसेच आणखी असे की संबंधीत अधिकाऱ्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक आणि शिस्त व अपील नियम — १९७९ अन्वये विभागीय चौकशी सुरु करावी. विभागीय चौकशीमध्ये संबंधीत अधिकारी दोषी आढळून आल्यास सक्षम प्राधिकारणीने नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करावी” अशी सुचना केलेली आहे.

उपरोक्त सुचनेनुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील कचरा संकलन व वाहतूक करण्याकरीता निविदा काढणे, निविदेतील शर्ती—अटी तपासून सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने प्रसिध्द करणे व निविदा मंजुर झालेल्या एजन्सीसोबत करारनामा करणे इत्यादी कार्यवाही आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद गणवीर यांचेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे. कचरा संकलन व वाहतूक करण्याकरीता मुळ निविदेतील शर्ती—अटीवर व एजेन्सीसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यावर महानगरपालिकेच्या वतीने मनपा आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद गणवीर यांची स्वाक्षरी आहे. स्थायी समितीच्या निर्देशानुसार सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी मा. आयुक्तांचे स्तरावर प्रक्रीयेत आहे. तथापि उक्त अनियमिततेने मनपा आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद गणवीर हे सद्या दिर्घकाळ मुदतीच्या रजेवर आहेत. मा. स्थायी समितीने ही अनियमितता ज्या अधिकाऱ्याव्दारे करण्यात आली त्या अधिकाऱ्याचे प्रशासनाव्दारे तात्काळ प्रभावाने निलंबन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तथापी सदर अनियमिततेबाबत जबाबदारी आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद गणवीर यांचेवर निश्चीत

करण्यापुर्वी त्यांचेकडून निविदेतील अटी व शर्ती परस्पर बदलविण्याबाबत नैसर्गीक न्यायानुसार स्पष्टीकरण मागविणे व त्यांचे स्पष्टीकरण विचारात घेवून पुढील कार्यवाही करणे योग्य राहील असे विभागाचे मत आहे.

करीता पुढील आदेशार्थ सादर प्रस्तुत.

आरोग्य अधिकारी

मा. अति. उपायुक्त (२)
मा. अति. आयुक्त (सा.प्र.वि.)

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, हा जो प्रस्ताव होता यामध्ये प्रशासनाने निलंबन केले, असे आम्हाला अभिप्रेत होते. मात्र स्थायी समितीने याची चौकशी करून स्थायी समितीच्या निर्देशानुसार डॉ.गणवीर यांचे निलंबन झालेले आहे. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केलेली आहे असा त्याचा अर्थ होईल.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :— मा.महापौरजी, आपल्या कर्मचा–यांसाठी एक एम.सी.एस.आर. डिसीप्लीन हा रूल्स लागू आहे त्या रूल्समध्ये निलंबनाची शिक्षा आहे. स्थायी समितीने जो ठराव केलेला आहे, त्यामध्ये कुठल्याही अधिका–याचे नांव नाही. प्रशासनाने चौकशी करून निर्णय घ्यावा असे निर्देश त्यांनी दिलेले होते.

श्री प्रफुल गुडधे :— पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, माझा आक्षेप होता मी स्पेसेफिक प्रश्न विचारला होता कि ही प्रशासनाची कार्यवाही आहे कि स्थायी समितीची कार्यवाही आहे त्यामध्ये साहेबांनी उत्तर दिले होते की स्थायी समितीची कारवाई आहे म्हणून माझा हा प्रश्न होता.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :— मा.महापौरजी, स्थायी समितीने चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते, त्याप्रमाणे प्रशासनाने चौकशी केली, चौकशी केल्यानंतर अग्रीमेंटमध्ये जी तफावत आहे त्या आधारावर जास्तीचे पेमेंट झालेले आहे. त्या आधारावर शोकॉज नोटीस देण्यांत आले, आणि सोबतच कनक मॅनेजमेंट रिसोर्सोस कंपनीला नोटीस देण्यांत आलेले आहे कि त्यांच्याकडुन अतिरिक्त प्रदानाची रक्कम का वसुल करण्यांत येवू नये. निलंबनाची गरज यासाठी असते की डॉक्युमेंटमध्ये कुठलेही फेरबदल होवू नये त्यामध्ये तफावत होवू नये त्यामुळे प्रशासनाने काळजीपूर्वक हा निर्णय घेतलेला आहे आणि यात विभागीय चौकशी झाल्यानंतरच...

श्री प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, प्रशानाच्या निर्णया विरुध्द मी नाही, तो प्रस्ताव चुकीचा आहे असे माझे म्हणणे नाही. फक्त मला जाणून घ्यावयाचे की स्थायी समितीने हे जर फायडिंगस् काढले की प्रशासनाने काढले जर स्थायी समितीने हे फायडिंगस् काढले असेल तर मी स्थायी समितीचे कौतूक करतो प्रशासनाला जी बाब समजली नाही ती स्थायी समितीला समजली, मा.महापौरजी, त्याचा अर्थ असाच आहे, म्हणजे प्रशासन इतक्या वर्षापासून झोपा काढत होता, म्हणुन स्थायी समितीने निलंबन केले हे आपण याठिकाणी मान्य केले हे काम प्रशासनाने केले नाही हे आपण याठिकाणी मान्य केले आहे.

श्री तानाजी वनवे :— मा.महापौरजी, जो स्थायी समितीचा ठराव होता त्या ठरावाच्यानुसार डॉ.गणवीर यांनी त्याची अंमलबजावणी केली नाही, असे आपले म्हणणे आहे काय ?

सहा.आयुक्त (श्री धामेचा) :— मा.महापौरजी, स्थायी समितीने निर्देश दिले होते त्यानुसार प्राथमिक चौकशी करण्यांत आली व त्यानुसार निलंबनाचे आदेश काढण्यात आले यावर सविस्तर चौकशी पुढे करण्यात येईल.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आमचे ते म्हणणे नाही, जो मुळ ठराव ज्यावेळी कनक रिसोर्सेसला कॉन्ट्रक्ट दिला गेला होता हा कोणाच्या कारकिर्दीमध्ये दिला होता 2007 मध्ये कोण स्थायी समिती अध्यक्ष होते. त्याची माहिती आम्हाला देण्यांत यावी.

अति.उपायुक्त (श्री.दांडेगांवकर) :— मा.महापौरजी,हा करार दि. 8–6–2007 ला झाला आणि 8–1–2008 ला वर्क आर्डर दिले होते. आणि 1 मार्च 2008 रोजी करारनामा झाला होता. कनक रिर्सोसेसने त्यावेळी कामगारांचे पगार वाढविले हा सभागृहात प्रश्न विचारण्यात आला होता कि कामगार विभागाची

अधिसूचना आहे, त्यानुसार कामगारांना वेतन देण्यांत यावे. त्यांनी एकदम 573 रूपयांची वाढ मागितली ती अनैसर्गिक वाटली. म्हणुन मा.आयुक्तांनी मला व अति.उपायुक्त यांना सूचित केले कि रेट काय यावयास पाहिजे, यांना काय प्रदान करण्यांत येते, काय द्यावयास पाहिजे याची पडताळणी करून सांगा, त्या दरम्यान आम्ही सर्व कागदपत्रे पाहिली त्यावेळेस असे आढळले कि एकदा बेस रेट मंजूर झाला तर वर्षातून एकदा रिझर्व बॅकेच्या ज्या होलसेल प्राईस इंडेक्स असतात, त्यासाठी निर्दशंक वाढविले जाणार होते त्यामध्ये दोन असतात ल्युब्रीकेंट आणि फुअल मध्ये करार करीत असतांना होलसेल प्राईज इंडेक्स मध्ये सर्व कमुडीटीचे इंडेक्स घ्यायला तो पात्र ठरला परंतु प्रत्यक्षात करार करीत असतांना टेंडरमध्ये वर्षातून एकदा ही वाढ क्वार्टरली ठरली होती परंतु करार करीत असतांना जे कागदपत्र पाहिले त्यामध्ये असे आढळले कि कनकनी त्यामध्ये पहिले जे बिल घेतले त्यामध्ये क्वार्टरली वाढ बरोबर घेतले होलसेल प्राईज इंडेक्स प्रमाणे बरोबर दिली, पहिल्या क्वार्टरला त्यांनी सगळया कमुडीटीच्या होलसेल प्राईज तिमाही दिली. दुस–या वेळी त्यांनी डिझेल व लुब्रीकेंट आणि त्यानंतर तिस–यांदा त्यांनी वाढ केली डिझेल आणि लेबर वर घेतली जे की त्याच्या करारामध्ये होती त्यानंतर कराराची तिमाही वाढ असे होते त्यामध्ये एक वाढ त्यांनी 45 दिवसाची ठेवली. आणि त्यानंतर असे ही आढळले कि होलसेल प्राईज इंडेक्स प्रमाणे कंझुमर्स प्राईज रेटवर वाढ केली ही सर्व बाब दर ठरविण्याच्या समितीमध्ये आढळले हे ज्यावेळी आम्ही मा.आयुक्तांना कळविले त्यावेळेस आचार संहिता सुरू होती आणि कनकनी सांगितले होते की आम्ही काम बंद करणार त्यावेळी स्थायी समितीकडे विषय घेता नाही आला त्यावेळी मा.आयुक्तांनी रेट कसा ॲनॅलिसीस करायचा त्याच्या कॉस्ट बेसीसवर ॲनॅलिसीस करायला सांगितले ते ॲनॅलिसीस करुन 1306 चा रेट काढला आणि हे प्रकरण स्थायी समिती समोर आचारसंहिता संपल्यानंतर दयायला सांगितले ज्यावेळी स्थायी समितीसमोर हा विषय गेला त्यामध्ये इतक्या सर्व अनियमितता घडल्या याची सविस्तर चौकशी स्थायी समितीने मा.आयुक्तांना करायला सांगितली त्यामध्ये 3 महिन्याचा कालावधी दिला आहे अध्यक्ष महोदयांनी आणि ती चौकशी अंतिम टप्प्यात आहे. आणि मग त्या ठरावानंतर प्राथमिक गोष्टी मध्ये ज्या अनियमितता झाल्या त्यावेळी तत्कालीन परिस्थितीमध्ये डॉ.गणवीर साहेबच होते म्हणून त्यांना निलंबनाची नोटीस देण्यात आली आणि सविस्तर चौकशी मा.आयुक्तांकडे अंतिम टप्प्यांवर आहे दोषारोप पत्र व  जोडपत्र त्या प्रकरणामध्ये जोडले आहे.

श्री तानाजी वनवे :– मा.महापौरजी, याच्यामध्ये स्थायी समितीचा जो ठराव क्रमांक आहे त्याच्यामध्ये पांच नंबरचा एक मुद्या आहे. भारतीय रिझर्व बॅकेव्दारे निर्गमित होणा–या घाऊक किंमत निर्देशाकांनुसार प्रमाणे वेळोवेळी दरवाढ देणे. हा मुद्या काय आहे?

अति.उपायुक्त (श्री दांडेगांवकर) :– मा.महापौरजी, तेच मी आता सांगीतले कि करार करीत असतांना काय झाले. समजा उदाहरण देवून सांगायचे झाले तर राज्य शासनाने महागाई भत्याची वाढ मंजूर केली समजा तीन टक्के आणि त्याचवेळी केंद्र शासनाने 6 टक्के महागाई वाढ केली असेल तर मी सहा टक्क्यांची महागाई वाढ घेवू शकत नाही, तर त्यांनी काय केले रिझर्व्ह बॅंकेच्या डब्लु.पी.आय. त्यांना अलाऊ होता परंतु फक्त दोन टक्के काही ठिकाणी त्यांनी कंझुमर्स प्राईज दिले म्हणजे होलसेलरचा रेट सांगीतला. त्यांचा रेट कमी असो किंवा जास्त असो, डब्लु.पी.आय. महाग असो त्यामुळे त्याला करारचा फायदा झाला. कनकनी जे बील घेतले ते मंजूर झाले.

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, एकंदरीत सभागृहाच्या सर्व मा.सदस्यांची भावना लक्षात घेता चौकशी झाली पाहिजे, योग्य चौकशी झाली पाहिजे, जे जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. परंतु हे होत असतांना महानगरपालिकेच्या कायद्याप्रमाणे वर्षानुवर्षे चौकशी सुरू आहे, असा न होता येणा–या एक 15–20 दिवसाच्या कालावधीमध्ये महिन्याभराच्या आंत याच्यावर चौकशी करून मग निर्णय हा निश्चित घेण्यांत यावा तोपर्यंत जे निलंबन आहे तो कायम ठेवण्यांत यावे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, सत्तापक्ष नेत्यांनी याठिकाणी सांगीतलेला आहे जे दोषी असतील त्याच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे, आणि अहवाल जो आहे त्याला वर्ष लागतात. माझे ही म्हणणे आहे कि, 15 दिवसाच्या आंत आपण अहवाल सादर करावा.

वरील चर्चेनंतर डॉ. मिलिंद गणवीर, सहा. आरोग्याधिकारी, प्रभारी उप  संचालक(आरोग्य) व आरोग्याधिकारी (स्वच्छता) यांना नागपूर शहरात ‘‘ कचराघर मुक्त शहर’’ योजना राबविण्याकरिता स्थायी समिती

ठराव क्र. 200, दि. 24/12/2007 अन्वये मूळ निविदेतील अटी व शर्ती व करारनाम्यातील अटी व शर्ती परस्पर बदलविल्यामुळे मे. कनक रिसोर्सेस मॅनजमेंट लिमिटेड यांना अतिरिक्त भुगतान करण्यात आल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याने, वित्तीय अनियमिततेमुळे, स्थापना विभागाचे आदेश क्र. 119/ओ. ॲन्ड एम. दि. 05/08/2017 अन्वये निलंबित करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 56 (1) [2](ब) तरतुदीनुसार महानगरपालिकेतील निलंबित करण्यात आलेल्या वरील अधिका–यांचे निलंबन कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या प्रकरणाची चौकशी एक महिन्याच्या आत करून निर्णय घेण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूर आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 83</u>:– सतरंजीपुरा झोन क्र. 7 प्रभाग क्र. 20 अंतर्गत पांचपावली ठक्करग्राम दुर्गा माता मंदिर समोरील व पाचपावली हिंदी शाळेच्या नाल्याजवळील शिकस्त सार्वजनिक संडास तोडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 84</u>:– मौजा वाठोडा खसरा क्र. 173/1, 2 व 174/1, 2 मधील 4. 06 हे.आर (10.00 एकर) जागा "स्किल ट्रेनिंग सेंटर" स्थापीत करण्याकरीता लार्सन ॲड टुब्रो लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 79 (ग) (सुधारीत) मधील तरतुदीनुसार रु. 1 प्रति चौ. फूट अधिमुल्य दराने यावर 2% वार्षिक भुभाटक भरण्याचे व या विनीयोगास राज्य शासनाची मान्यता प्राप्त करण्याचे अटींचे अधीन राहून 30 वर्षांचे कालावधीकरीता भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता प्रदान करण्याचा तसेच राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्याकरीता चे अधिकार आयुक्त महानगरपालिका नागपूर यांना प्रदान करण्याचा व यापुर्वी पारित म.न.पा. ठराव क्र. 390 दि. 31.12.2016 हा जागेत बदल झाल्याने कार्यान्वीत होऊ शकत नसल्याची नोंद घेण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून उपरोक्त जागा विकता तथा गहाण (**Mortgage**) करता येणार नाही या अटीवर देण्यास मंजूरी प्रदान करावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, विषय क्रमांक 68 मध्ये महानगरपालिकेची आपली जागा आहे ती जागा आपण देत असतांना त्यामध्ये एक सूचना टाकण्यात यावी की, कुठल्याही पध्दतीने एखाद्या प्रोजेक्ट उभी करीत असतांना आपली जागा त्याला तारण म्हणुन वापरता येणार नाही, ऐवढी एक सूचना त्यामध्ये टाकून या सूचनेसह हा विषय मंजूर करावा.

<u>ठराव क्रमांक 85</u>:– ''प्रभाग क्र. 21 अंतर्गत येणाऱ्या शांतीनगर घाटाच्या सौंदर्यीकरण व सुस्थिती, दुरुस्ती करीता रु. 35 लक्ष चा प्रस्ताव वर्ष 2015 मध्ये मंजूर करण्यात आला. कार्यादेश देण्यात आले परंतु आजपावेतो सदर कार्य सुरु होऊ शकले नाही. सौंदर्यीकरण व सुस्थिती, दुरुस्तीची निकड लक्षात घेता अत्यंत तातडीने सदर काम लोकहितार्थ त्वरित सुरु करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून लोकहितार्थ असलेली कामे त्वरित सुरू करण्यात यावी. यात कोणत्याही प्रकारची दिरंगाई करण्यात येवू नये या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.आभा पांडे :– मा.महापौरजी, प्रभाग क्र.21 अंतर्गत येणा–या शांतीनगर घाटाच्या दुरुस्ती करिता रुपये 35 लक्ष रुपयांचा प्रस्ताव 2015 मध्ये मंजूर करण्यात आला, कार्यादेश देण्यात आले परंतू आजपावेतो सदर कार्य सुरु होवू शकले नाही. सौदर्यीकरण, सुस्थिती करिता अत्यंत तातडीने लोकहितार्थ त्वरीत सुरु करण्यासाठी अधिनियम 1 (जे) अंतर्गत नोटीस सादर केलेला आहे. तात्कालीन महापौर, माझे लहान बंधु दटकेजी हे जेव्हा महापौर होते तेव्हा त्यांनी आपल्या हातात हे काम उचलले होते आणि ते म्हणजे नागपूर

शहरात जितके घाट आहे त्या घाटांचा सौंदर्यीकरण आणि सुस्थिती व दुरूस्ती करण्याचा उत्तम कार्य त्यांच्या हातातुन घडले आहे. मा.महापौरजी, त्यांनी खूप ऍफर्ड घेतले. आणि 21 जानेवारी 2015 ला तत्कालीन महापौर आदरणिय प्रविणजी दटके जे माझे लहान बंधु आहे मी मोठी बहिण असल्यामुळे कधी कधी भांडतात त्यांनी दौरा केला आणि शांतीनगर घाटाचा दौरा करून ते अचंबित झाले कि येथे सुस्थिती दुरूस्तीची कामे अनेक वर्षापासून शांतीनगर घाटात झालेली नाही. आणि सौंदर्यीकरण सुध्दा झालेले आहे. मा.महापौरजी, मा.तात्कालीन महापौरांच्या आदेशानुसार एक प्राकलन तयार करण्यांत आले 35 लाख 35 हजाराचे ते प्राकलन होता. आणि नंतर 1.12.2016 ला म्हणजे 2015 मध्ये प्राकलन तयार करण्यांत आले आणि 2016 च्या बाराव्या महिन्यात टॅक्नीकल सॅक्शनकरीता ती फाईल गेली. मा.महापौरजी, सांगण्याचे तात्पर्य माझे असे आहे कि मा.महापौरांच्या आदेशानंतर एक एक टेबलवर एक एक फाईल मा.अधिकारी सहा–सहा महिने आठ–आठ ठेवतात. म्हणजे काम करण्याची पध्दत काय आहे. माझे म्हणणे असे आहे कि जर 1.12.2016 ला त्याला टॅक्नीकल सॅक्शन मिळाले तर त्याच्यानंतर लगेच टेंडर काढले असते तर त्या टेंडरचे आजपर्यंत वर्क आर्डर ही झाले असते व आजपावेतो ते काम ही पुर्ण झाले असते. परंतु आमचे कार्यकारी अभियंता व संबंधित जेवढे अधिकारी आहे त्यांनी या शांतीनगर घाटाच्या फाईलला टाळाटाळ केली आहे. मा.महापौरजी, मी आरोप करते व तुमच्या निदर्शनास आणुन देते व तुम्ही सुध्दा प्रशासनाला ही बाब सांगावी. कोणतीही फाईल किती दिवस ठेवली पाहिजे कारण हे जे काम आहे, हे कोणी व्यक्तिविशेषचे नाही हे घाटाच्या सौदर्यीकरणाचे काम आहे. मा.महापौरजी, मैं आपको बताना चाहती हुं उस घाट की दुर्दशा, उस घाट की दुर्दशा ऐसी है कि जहां शव को जलाया जाता है, वहां पर बडे बडे गडडे हो गये है आप सहा.आयुक्तजी से पुछिये। उन्होने भी उस घाट का दौरा किया है, जब वहां शव को रखते है तो शव ठिक से जल नही पाता है और वह शव उस गडडे मे चला जाता है यह बिकट परिस्थिती है। वहां आसपास के लोग रहते है, जो बाउंड्री वॉल है उसकी उंचाई ज्यादा नही होने के कारण जितने शव वहां पर जलाये जाते है, उसका जो धुंवा है उससे आसपास के लोगो को सांस की तकलीफ हो रही है। अनेक ऐसे पेशंट है वहां मेरा कहने का तात्पर्य यह है कि यह विषय इस तरीके से नोटीस पर लगानेवाला विषय नही था, लेकिन मैं मजबुर हुई कि 2015 मे जो प्राकलन तयार होता है, अभी टेंडर वाटाघाटी की चर्चा 8 जून 2017 को हुई, जब कार्यकारी अभियंता को पता चला इस विषय पर आभा पांडे बहोत सिरीयस है शायद अगली सभा मे वह यह विषय उपस्थित करेगी तो यह विषय आगे बढाया गया। मा.महापौरजी तीसरे महिने मे इस फाईल का टेंडर हुआ और छटवे महिने मे इस विषय को वाटाघाटी के लिये आगे बढाया गया। मा.महापौरजी, ऐसी कार्यपध्दती कब तक चलती रहेगी और एक अचंबित करनेवाला विषय मैं आपको बताती हुं कि जब मैंने यह विषय नोटीस के आधार पर लगाया तो दुसरे दिन फाईल स्थायी समिती मे चली गयी, अगर हमको अपने काम कराना है तो हमको प्रश्न लगाना पडेगा, यांनी हमको नोटीस देना पडेगा, इसका मतलब यही होता है। मा.महापौरजी, मैं आपसे निवेदन करती हुं कि भले ही देरी से काम हुआ है, लेकिन ऐसी देरी लोकाभिमुख कामो मे न हो, जनता से जुडे हुऐ जो गंभीर प्रश्न है उसमे यह देरी नही होनी चाहिये। ऐसा आप प्रशासन को निर्देश दे जो नियम है एक टेबल पर एक फाईल कितने दिन रहना चाहिये, उस नियम के मुताबिक हर अधिकारीने चाहे वह कनिष्ठ कर्मचारी हो या वरीष्ठ अधिकारी हो उसने उस नियम के मुताबिक काम करना चाहिये। आप सुनती बहोत अच्छे से है लेकिन कंक्लुड करते वक्त जो रूलिंग आपकी होनी चाहिये, वह नही होती, मैं बहोत छोटे पद पर हुं लेकिन आपके पद की एक गरीमा है लेकिन मुझे कही न कही ऐसा लगता है आप सुनती गंभीरता से है लेकिन उसके अंमलबजावणी के लिये जो रूलिंग आपकी होनी चाहिये, क्योंकि जब हम यहां पर बैठते है, वह बहोत मायने रखते है जो बात मैंने दो महापौरजीसे सीखी है श्री अनिल सोले और श्री प्रविण दटके इनकी रूलिंग बहोत मानने लायक होती थी।

**ठराव क्रमांक 86:–** नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची सोमलवाडा मनपा शाळा व मैदानाच्या जागेवर मा. अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांचे दि. 03.07.2017 च्या आदेशान्वये मालमत्ता पत्रकावरील नागपूर महानगरपालिका नावाची नोंद रद्द करुन श्री. कीर्तीकुमार नितेश भांगडीया व श्री. मितेश गोटुलालजी भांगडीया अशी नोंद करण्यात आली. त्यामुळे 1932 पासून असलेली मनपाची मालकी संपुष्टात आली. या संबंधी चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस

सभागृहाने विचारात घेवून

श्री प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची सोमलवार जी शाळा आहे 1932 पासून रेकार्ड उपलब्ध आहे. तेव्हापासून नागपूर महानगरपालिका अस्तित्वात येण्याच्या आधी श्रीमंत राजे भोसलेची ती जागा होती. महानगरपालिकेच्या त्या वेळेसच्या लोकल बॉडीला दानामध्ये त्या शाळेची इमारत बांधण्यासाठी ती दिली होती आणि तेव्हापासून ती शाळा अस्तित्वात आली त्याच्या मागे एक मैदान आहे मी त्या प्रभागाचा सदस्य असतांना तो मैदान विकसीत केला तेव्हा पासून महानगरपालिकेच्या रेकॉर्डवर सिटीसर्व्हेवर नागपूर महानगरपालिकेची नोंद आहे. असे असतांना काही कागदपत्रामध्ये हेराफेरी करून महानगरपालिकेची ती जागा आता भारतीय जनता पक्षाचे जे आमदार आहे किर्तीकुमार भांगाडिया व नितेशकुमार भांगाडिया या दोन आमदार पिता पुत्राच्या नांवाने परावर्तित झाली, म्युटेशन जे आहे ते किर्तीकुमार नितेश भांगडिया, नितेश भांगडीया या दोन पितापुत्राच्या नावांने झाली आहे. त्या जागेवर 1032 पासून महानगरपालिकेची मालकी आहे ती कशी काय बदलु शकते. त्या संदर्भात सातत्याने दहा वर्षापासून माझा पत्रव्यवहार आहे.ती महानगरपालिकेची जागा आहे मा.सत्तापक्ष नेत्यांना माहित आहे सोमलवार वस्तीला लागून मैदान विकसित केले आहे ती जुनी जागा आहे आता या प्रॉपर्टीचा इतिहास असा आहे कि, ती राजा भोसलेच्या मालकीची जागा होती, ती त्यांनी दानामध्ये महानगरपालिकेला दिली, दानामध्ये ती जागा महानगरपालिकेला दिल्यानंतर त्याचे कुठलेही रूटीन डॉक्युमेंट महानगरपालिकेकडे नव्हते, आणि कालांतराने ही संपुर्ण मालमत्ता कोर्ट ऑफ वाडर्स मध्ये गेली, कोर्ट ऑफ वाडर्सचे जे मॅनेजर आहे ते मा. जिल्हाधिकारी आहे. आणि मा.जिल्हाधिका–यांच्या अखत्यारीत या संपुर्ण मालमत्तांचा ऑक्शन झाले, ऑक्शन झाल्यानंतर राजीव गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या नांवानी या संपुर्ण जागेची सेलडीड झाली, त्या सेलडीडमध्ये त्याचा उल्लेख आहे. जी कोर्ट ऑफ वाडर्स मा.जिल्हाधिका–यांनी राजीव गृहनिर्माण सहकारीसंस्थेच्या नांवानी सेलडीड करून दिली त्याच्यामध्ये त्याचा उल्लेख आहे. कोर्ट ऑफ वाडर्सनी जी सेलडीड करून दिली होती हे त्याचे दस्तावेज आहे आणि ते रेकॉर्डवर आहे ते दस्ताऐवज 1995 चे आहे. राजीव गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या नांवानी जी सेलडीड करुन दिली ती 1975 ची आहे. मा.महापौरजी, याच्यातला नेमका घोळ काय आणि हया संपुर्ण ज्या बाबी आहे आपल्या वकिलांनी कोर्टामध्ये मांडल्या पाहिजे, परंतु मांडल्या जात नाही. मुख्य मुद्या काय आहे हे जे कोर्ट ऑफ वाडर्सचे जे मॅनेजेर असतात त्याचे नाहरकत प्रमाणपत्र इशु झालेले आहे. मुधोळकर नांवाचे एक मॅनेजर होते त्यांनी बोगस एन.ओ.सी. इशु केलेली आहे ती कलेक्टर ऑफिसच्या रेकॉर्डवर सुध्दा नाही. त्या एन.ओ.सी.च्या नांवानी श्रीमंत राजे भोसले यांच्या नावाची जागा बुंदेचा नावाच्या व्यक्तीला विकुन टाकण्यांत आली, याच्यात हया आमदार पितापुत्राचा सहभाग आहे आणि त्यांच्या नांवानी ही सेलडीड झाली, जागा महानगरपालिकेची, पजेशन महानगरपालिकेचे तेथे महानगरपालिकेने मोठे उद्यान तयार केले, त्याठिकाणी महानगरपालिकेची शाळा आहे आता ती अस्तीत्वात आहे. या संपुर्ण फ्रॉड डॉक्युमेंटच्या आधारावर त्यांनी संपूर्ण ट्रांजेक्शन केलेले आहे. तळेगाव दाभाडे पॅटर्न अन्वये तेथे योजना मंजूर केली कालांतराने ज्यावेळेस बांधकाम नकाशे महानगरपालिकेत मंजूरीसाठी आले महानगरपालिका तेथे बांधकाम नकाशे सुध्दा मंजूर करणार होते. त्यावेळेस मी पत्र दिले आणि बांधकाम नकाशे 10 वर्षाकरिता मी थांबविले. आम्ही याची तक्रार मा. लोकायुक्तांकडे केली होती त्या लोकांयुक्ताकडे सुध्दा याची हेअरिंग झाली, त्या भागाचे सर्व नागरिक जागरुक आहे ती मैदानाची जागा राहिली पाहिजे, महानगरपालिकेची मालमत्ता आहे यासाठी त्यांचा संघर्ष राहिला परंतु दुर्देवाने महानगरपालिकेचे अधिकारी आपला ईस्टेट विभाग जी बाजू मांडावयास पाहिजे कोर्टामध्ये किंवा एस.एल.आर.कडे बाजू मजबुतपणाणे न मांडत असल्यामुळे कोटयावधीच्या मालकीची जागा एका आमदारांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून महानगरपालिकेला तेथुन हद्यपार केले व आपले नांव चढवले. मा.महापौरजी, ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणुन देण्यासाठी मी उभा आहे. यामध्ये जिथे जिथे कोर्टामध्ये जाण्याची आवश्यकता भासत असेल तो जो निर्णय झाला एस.एल.आर. चा त्या निर्णयाच्या विरोधात अपिल करण्याची गरज भासत असेल त्याकरिता अपिल करण्यात यावी आणि चांगल्यातला चांगला वकिल तेथे नेमण्यात यावा कारण ज्युडिशियल प्रोसेसमध्ये महानगरपालिकेची बाजू तेथे कमकुवतपणे तेथे मांडली तर कालांतराने आपण ती केस हारु आणि कोटयावधी रूपयांची जागेपासून आपण वंचित राहू म्हणुन चांगले वकील तेथे एंगेज करुन कोर्टामध्ये त्याला अपिल करावे त्या जागेच्या संदर्भात मा.आयुक्तांना

काही कल्पना आहे काय  त्या जागेच्या संदर्भात काय कार्यवाही केली ती बाब सभागृहाला जाणुन घ्यावयाची आहे, माहिती देण्याचे आपण प्रशासनाला सांगावे.

महापौर :– प्रशासनाने माहिती द्यावी.

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, प्रशासनाने या विषयाच्या संदर्भात माहिती द्यावी, हे देत असतांना जसे प्रफुल गुडधेनी सांगीतले कि आपण वरच्या कोर्टात गेले पाहिजे, एस.एल.आर.च्या निर्णयाच्या विरोधात आपण अपिल केले आहे काय ते देखील आपण येथे सांगावे, त्याची माहिती देण्यांत यावी.

स्थावर अधिकारी (श्री.भुते):– मा.महापौरजी, या विषयात एस.एल.आर.चा जो आदेश झालेला आहे तो मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणुन देण्यांत आलेला आहे. या आदेशाच्या विरोधात डी.डी.एल.आर कडे अपिल दाखल करण्यासाठी हे प्रकरण लॉ सेक्शनला पाठविले आहे.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, या संबंधाने संपुर्ण दस्तावेज स्थावर विभागाकडे नाही ते मी संपूर्ण यादी उपलब्ध करुन दिले आहे. आपला वकिल चांगला असला पाहिजे. या कामाकरिता आपण कप्तान साहेबाला या ठिकाणी नियुक्त केले पाहिजे.

श्री प्रविण दटके :– मा.महापौरजी, हा एक मुद्या नाही तुमच्या निदर्शनास मी आणुन देवु इच्छितो कि एन.आय.टी.चा धरमपेठचा जो बाजार आहे ती जागा महानगरपालिकेची होती, त्या जागेच्या संदर्भात आपण दुर्लक्ष केल्यामुळे एक्स पार्टी निर्णय झाला, आता त्या जागेच्या संदर्भात एन.आय.टी.सोबत शेअरींगमध्ये बाजार बांधण्याचा प्रस्ताव आला आहे. अशा अनेक जागा आहे. लकडगंज पाण्याच्या टांकीच्या बाजुला एक मोठा प्लॉट आहे, त्या जागेवर 15 वर्ष स्टेटस्को होता मा.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर तो स्टेटस्को हटला, ती पण एक जागा आहे ती लिटीगेशन मध्ये आहे अशा अनेक जागा आहे. त्यावेळेस मा. दयाशंकरजींची सूचना होती आता मा.प्रफुलजी ची सूचना आहे ती अतिशय सुंदर आहे, याच्यासाठी एखादी एजंन्सी नेमुन आपली जागा कोणती, कुठे पब्लिक युटीलीटी आहे, याकरिता आपण एखादी एजंन्सी नेमली पाहिजे, वारंवार सभागृहात हा विषय येत आहे. जसे एन.आय.टी.ने आपल्या प्रत्येक जागेवर बोर्ड लावले, म.न.पा.चे त्यांच्या जागेवर बोर्डच नाही. याकरिता माझी विनंती आहे कि एक चांगली एजंन्सी आपली सर्व लॅड बॅक तयार करण्यासाठी आपण नेमावी, दयाशंकरजी पासून प्रफुलजी पासुन संदिपजी सगळयांच्या सूचना या सगळया सूचना लक्षात घेवून हया जागा हे भविष्यातील आपली जमेची बाजू आहे, उत्पन्नाचे साधन आहे, ही सगळया जागा आपल्या नांवावर करून घ्याव्यात. स्थावर विभागांनी हया सगळया जागा आपल्या ताब्यात करून घ्याव्यात. एक चांगली एजंसी नेमावी आपले स्थावर विभाग त्याबाबतीत कमकुवत आहे हे बोलतांना मला वाईट वाटते. एक चांगली एजंन्सी नेमुन पारदर्शीपणे हया सगळया जागा नागपूर महानगरपालिकेत आणाव्यात ऐवढीच माझी विनंती आहे.

श्री तानाजी वनवे :– मा.महापौरजी, हा जो ठराव मा.सदस्य, श्री प्रफुल गुडधे पाटील यांनी आणला त्याकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो, नागपूर महानगरपालिकेची प्रापर्टी अवैद्यरित्या काही लोक घेत आहे आणि त्यांच्यावर अंकुश बसावा संपुर्ण सभागृहाला या गोष्टीची माहिती मिळावी, आणि याकरिता आपण सिनिअर कौन्सिल कप्तान साहेब किंवा त्यापेक्षा ही आपल्याला मोठे वकिल करता आले तर निश्चित रुपाने असे वकिल करून आपली महानगरपालिकेची जागा आपण वाचवावी, अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री.प्रफुल गुडधे यांनी नोटीसव्दारे ही बाब आपल्या सदनाच्या ध्यानात आणुन दिलेली आहे. त्यामध्ये मी देखील ती नस्ती बघितली सन 2006–07 मध्ये बुंदेच नांवावर झाली, आणि त्याच्यानंतर बुंदेचाकडुन 2009 मध्ये ती जी प्रापर्टी आहे ती मा.किर्ती भांगाडिया आणि नितेश भांगडिया यांनी विकत घेतली, आणि विकत घेतल्यानंतर भुमी अभिलेखमध्ये महानगरपालिकेच्या विरोधात देखील दोनदा निर्णय झालेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे उच्च न्यायालयात देखील महानगरपालिका गेली आहे. माझी प्रशासनाला विनंती आहे कि उच्च न्यायालयाने याच्यात काय सांगीतले आहे ते देखील सदनापुढे सांगावे.

स्थावर अधिकारी (श्री.भुते):– मा.महापौरजी, सदर प्रकरण कोर्टामध्ये सुरु असल्यामुळे त्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही .

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री दटके, मा.सदस्य, श्री गुडधे यांनी ज्या सूचना केल्या, महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा असेल असे अनेक विषय यापूर्वी शहरामध्ये झालेले आहे, त्याच्यामुळे

या विषयात जी काही मा.सदस्यांची भावना आहे ती तिव्र आहे, आणि येणा–या काळामध्ये आपण कुठे डी. डी.एल.आर.कडे अपिल केले असेल तर त्याठिकाणी सिनिअर कौन्सिलर कप्तान साहेबाला स्वतः उभे राहण्याचे सूचना प्रशासनाने द्यावी. आणि आपल्या ज्या जागा आहे त्या महानगरपालिकेच्या ताब्यात राहवयास पाहिजे. या पध्दतीचे प्रयत्न आण 100 टक्के करावे असे प्रशासनाला निर्देश दयावे.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची सोमलवाडा मनपा शाळा व मैदानाच्या जागेवर मा. अधिक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांचे दि. 03.07.2017 च्या आदेशान्वये मालमत्ता पत्रकावरील नागपूर महानगरपालिका नावाची नोंद रद्द करुन श्री. कीर्तीकुमार नितेश भांगडीया व श्री. मितेश गोटुलालजी भांगडीया अशी नोंद करण्यात आली. त्यामुळे 1932 पासून असलेली मनपाची मालकी संपुष्टात आली. या संबंधी चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून उपसंचालक भूमीअभिलेख नागपूर यांचेकडे दाखल असलेल्या अपीलमध्ये महानगरपालिकेचे जेष्ठ विधीसल्लागार श्री. कप्तान यांची मदत घेवून महानगरपालिकेकडे या जागेचा ताबा 100 टक्के कसा मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात यावे त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या परिसरातील विविध वसाहतीतील लेआऊट प्लॅनमध्ये असलेली वेस्टेड लॅन्ड जी शासनाची मालकीची आहे. वैधानिकरित्या ही लॅन्ड स्वाययत्ता संस्थेची मालकीची असते अशा सर्व जागा शोधण्याची विभागाने कार्यवाही करावी किंवा याकरिता एजन्सी नियुक्त करावी या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी, जेष्ठ सदस्य श्री.प्रविण दटके, श्री. प्रफुल्ल गुडधे, श्री.तानाजी वनवे यांनी केलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घेवून कार्यवाही करावी या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 87ः–</u> नागपूर महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रात असलेल्या अनेक जीर्ण इमारती पाडण्याकरिता महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडुन नोटीस देण्यात आलेले असून या जीर्ण इमारतीवर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई विभागाकडुन झालेल्या अनियमिततेबाबत सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून प्राप्त झालेल्या तक्रारीची शहानिशा करून योग्य असलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात यावी या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने मान्यता प्रदान केली.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये अनेक जिर्ण इमारती आहे आणि अनेकदा त्या जिर्ण इमारतीच्या मालकांनी नागपूर महानगरपालिकेकडे अर्ज केले आहे कि आमच्या इमारती तोडण्याकरिता आम्हाला मदत करावी इतकेच नव्हे तर नागपूर शहरातील सर्व वर्तमानपत्रामध्ये मला अभिनंदन करावेसे वाटते सर्व पत्रकारांचे कि त्यांनी आपल्या वर्तमानपत्रामध्ये नागपूर शहराच्या जिर्ण इमारतीच्या संदर्भात आपल्या वर्तमानपत्रामध्ये छापले आहे. अनेक वृत्त प्रकाशित केले आहे, परंतू सातत्याने वृत्त प्रकाशित झाल्यानंतर सुध्दा आमच्या प्रशासनाला जाग आली नाही आणि म्हणुन नागपूर शहरातील जिर्ण इमारतीच्या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा करून हया जिर्ण इमारती पाडण्यात याव्यात जेणेकरून आपल्या नागपूर शहरात कोणतीही घटना घडणार नाही. याच्या आधी मुंबईमध्ये एक इमारत पडुन लोक मृत्युमुखी पडले आहे. आमच्या नागपूर शहरामध्ये देखील अश्या अनेक घटना याच्या आधी घडल्या आहेत. याच्यामध्ये अनेक जखमी झाले व काही लोक मृत्युमुखी सुध्दा पडले आहे, आणि म्हणुन त्यावर उपाय झाले पाहिजे. म्हणुन हा प्रश्न मी या सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे कि नागपूर शहरामध्ये एकुण किती जिर्ण इमारत आहे याची माहिती प्रशासनाने दयावी.

सहा.आयुक्त,अतिक्रमण(श्री.अशोक पाटील) :– मा.महापौरजी, 358 जिर्ण इमारती आहे त्यापैकी 41 तोडलेल्या आहेत व 83 रिपेअर्स केल्या आहेत. कोर्ट केसेस 30 इमारतीच्या संदर्भात आहे. आणि 58 तोडायच्या आहे. ती यादी आहे काय कारण कि मी आपणांस सांगतो कि, कारण यांनी जी माहिती दिली ती मोघम आहे सभागृहामध्ये चर्चा झाली कि अधिकारी वर्ग आपली माहिती मोघम तयार करून घेतात. यामध्ये लोकांची यादी आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.अशोक पाटील) :– मा.महापौरजी, 358 लोकांची यादी आहे.

श्री.संदिप सहारे :– मा.महापौरजी, मा.महापौरजी, अनेक प्रकरण यांच्याकडे येतात परंतु जिर्ण मकान

पाडण्याच्या कामात कसे काय लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होतो तो मी याठिकाणी सांगु इच्छितो. मा.महापौरजी, जी जिर्ण इमारत आहे ती इमारत पडुन आजपर्यंत किती लोक मरण पावले त्याची यादी प्रशासनाकडे उपलब्ध आहे काय ?

सहा.आयुक्त (श्री.अशोक पाटील) :– मा.महापौरजी, ज्यांना नोटीस दिले आहे असे एकही इमारत पडलेली नाही. तसेच आजपर्यत किती लोक मरणपावले ती यादी नाही आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, प्रशासनाकडून जे उत्तर आले मा.सदस्य सहारेजी विचारत आहे त्याची गंभीरता प्रशासनाकडून दिसत नाही. कारण आता नुकतेच वर्तमानपत्रामध्ये आले मा.सदस्या श्रीमती हर्षलाताई साबळे यांच्या वार्डामध्ये एम्प्रेस मिल, मॉडेल मिलच्या जवळची इमारत पडली. त्याठिकाणी दोन तीन लोक जखमी झाले वर्तमानपत्रात आम्ही वाचले, आम्ही फोन केले त्याठिकाणी गेलो. नागपूर शहरामध्ये जिर्ण इमारती खूप आहे. अश्या इमारतीमुळे धोका होत असेल, लोक मृत्युमुखी पडत असेल तर अश्या इमारतीला ताबडतोब पाडले पाहिजे. त्याठिकाणी आपण कार्यवाही सक्तीने केली पाहिजे, लोकांचे प्राण वाचविले पाहिजे आणि या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेवून आपण उत्तर द्यावे.

श्री.प्रमोद चिखले :– मा.महापौरजी, एक अत्यंत गंभीर विषय आमच्या भागात घडला 3.16 हेक्टरमध्ये ही मॉडेल मिल चाळ मागील 100 वर्षापासून येथे निर्माण आहे. 1994 साली या चाळीला जिर्ण इमारत म्हणून डिक्लेअर केले होते 1994 पासून 2017 पर्यत आजही त्या स्थितीमध्ये आहे. एकूण 416 परिवार राहतात. तेथे 416 परिवारांचे तेथे निवास आहे. ती चाळ इतकी जिर्ण झाली आहे तुम्ही जर ती चाळ पहायला जाल तर चालतांना देखील त्या ठिकाणी भिती वाटते की केव्हा ही इमारत पडेल, माझी विनंती प्रशासनाला ऐवढी आहे की त्या चाळीच्या बाबतीत बिल्डर सुध्दा कोर्टात गेले आणि त्यामध्ये निर्णय झाले माझ्या माहितीप्रमाणे ती जागा शहा म्हणुन एका बिल्डरला दिली आहे त्या शाहनी नागपूर महानगरपालिकेच्या ए.डी.टी.पी.विभागात आपला नकाशा सुध्दा सादर केलेला आहे. त्यामध्ये अडचणीचा विषय असा आहे त्याला 2.1 चा एफ.एस.आय. त्याला मिळालेला नाही. माझी विनंती आहे कि 416 परिवाराचा पुर्नवसनाचा प्रश्न आहे 100 वर्षापासून ते लोक तेथे राहत आहे. ती जर इमारत आपण पाडली तर त्या परिवाराची पर्याय व्यवस्था आपल्याकडे आहे काय ? नसेल तर त्या परिवाराचे कसे होणार नागपूर महानगरपालिका म्हणून त्या लोकांची आपल्यावर जबाबदारी आहे आपण ती स्वीकारली पाहिजे त्या शहानी आपल्याकडे जो नकाशा सादर केला तो आपण का सॅक्शन केला नाही. ए.डी.टी.पी. विभागाला विनंती आहे की जो नकाशा त्यांनी सबमिट केला आहे तो पास का केला नाही त्या संदर्भात कोणत्या अडचणी आपल्या समोर आल्या आहेत त्या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

उपसंचालक,नगररचना (श्रीमती थुल) :– मा.महापौर महोदया, हा प्रस्ताव 2015–16 मध्ये आमच्या विभागात आला होता तथापि त्याच्यामध्ये जो नकाशा आमच्या कडे सादर करण्यात आला होता त्यामध्ये मोजणीनुसार त्यांनी प्लॅन सादर केलेला नाही किंवा मोजणीच्या हद्यी जुळत नव्हत्या तसेच जे नियमानुसार पार्किंग आवश्यक असते ते पार्किंग नकाशामध्ये दर्शविलेले नव्हते त्या बाबी नसल्यामूळे तो नकाशा नामंजूर करण्यांत आला होता.

श्री.प्रमोद चिखले :– मा.महापौरजी, तत्कालीन महापौर, श्रीमती अर्चना डेहणकर तसेच केंद्रीय मंत्री मा.नितीनजी गडकरी त्यांनी पुढाकार घेवून हा विषय पुढे नेला होता. माझी आपणांस विनंती आहे कि नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातुन त्या शहा बिल्डरशी चर्चा करून तसेच तेथील जे स्थानिक लोक आहे त्याच्याशी बोलून कुठेतरी मध्यस्ती करुन हा प्रश्न निकाली काढावा एवढी विनंती आपणास आहे.

श्री संदिप सहारे :– पाईट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, विषयाचे विषयांतर होवुन राहिले आहे. मा. महापौरजी, मी सदनाच्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो कि मागील अनेक वर्षापासून नागपूर शहरातील अनेक इमारती पडल्या आहेत. सन 2007 मध्ये एक इमारत सदर भागामध्ये, बर्डी भागामध्ये पडली आणि त्याच्यामध्ये एक पुरूष व एक महिलेचा मृत्यु झाला, 2 जखमी झाले. 2010 मध्ये 3 घरे पडली, 2011 मध्ये 4 घरे पडली, 2012 मध्ये चार भिंती पडुन दोन लहान मुलांचा मृत्यु झाला. 2013 मध्ये 18 घरे पडली त्यात चार लोकांचा मृत्यु झाला. 2014 मध्ये तीन घरे पडली, 2015 मध्ये तीन घरे पडली. सन 2016 मध्ये तीन घरे पडुन चार लोक जखमी झाले. 4 जूलै 1985 ला घर पडुन चार लोकांचा मृत्यु झाला. रामबागमध्ये

1989 ला घर पडुन एक व्यक्ति जखमी झाला म्हणजे हा रेकॉर्ड आपण पाहिला तर आजपर्यंत एकूण 14 लोकांचा मृत्यु झाला व जवळपास 21 लोक जखमी झाले आहे. हा रेकार्ड मी माझ्या घरामधुन आणलेला नाही आहे तर मला आपल्या नागपूर महानगरपालिकेच्या विभागामधुनच हा रेकॉर्ड मिळालेला आहे. हे सांगण्याचे तात्पर्य याकरिता कारण ज्याप्रमाणे आजपर्यंत आपल्या शहरामध्ये घटना घडल्या त्या घटनेनंतर ही आमचा प्रशासन जागा झाले नाही. अनेक प्रकरणे आज न्यायालयात आहे. आता न्यायालयामध्ये जाण्यासाठी ही आमचे प्रशासन दोषी आहे कारण अनेक प्रकरणामध्ये आमचे प्रशासन कशी ढिलाई करते. त्यांचेच त्याच्यामध्ये काय लाभ असतो हे येथे सांगणे बरोबर नाही मी आपल्या निदर्शनामध्ये असे 3 ते 4 प्रकरण आणुन देवु इच्छितो कि त्यांचे घर अशा स्थितीमध्ये आहे की ती घरे केव्हाही पडु शकतात. एक चंद्रकांता शिवाजी रामटेके, 75 वर्षाची महिला, 67 वर्ष जुने मकान आहे त्यांनी त्या करिता 2010 ला अर्ज केला 2012 ला अर्ज केला, 20.06.2013 ला अर्ज केला. मा.मुख्यमंत्र्यांचे मा.आयुक्तांना पत्र आले 07.06.2013 ला त्यांनी 11.05.2016 ला पत्र दिले आताचे आमदार डॉ.मानेनी आयुक्तांकडे तो पत्र दिले आमचे घर पाडुन दयावे परंतू त्यामध्ये आमच्या अधिका–यांनी लक्ष दिले नाही त्या हद्दी मध्ये तेथे राहणा–या किरायादारांना स्टे घेतला आणि ते कोर्टामध्ये गेले कोर्टामध्ये गेल्यानंतर त्यांनी ऑडीट रिपोर्ट त्यांनी पेश केला जे आमचे वकील आहे त्यांनी मनपा ची बाजू घेण्यापेक्षा त्या किरायदारांची बाजू घेत होते, हे एक प्रकरण आहे दुसरे अजून एक प्रकरण आहे शांताबाई मुळे यांचे एक प्रकरण आहे मा.महापौरजी हा फोटो बघा तुम्हाला हा फोटो पाहून ते घर कधी पडेल हे सांगता येत नाही अत्यंत जिर्ण झालेले हे मकान आहे. 19.7.2009 ला आमच्या कार्यालयाकडुन त्यांना शिकस्त असलेले संपूर्ण घर पाडुन टाकावे असा नोटीस गेला, असा नोटीस दिल्याबरोबर त्यांनी घर पाडण्यास सुरूवात केली किरायदाराला आमच्या प्रशासनाला वेळ दिली. आणि ती केस कोर्टात गेली आणि ती केस कोर्टामध्ये सुरु आहे त्यानंतर 104 वर्ष जुनी इमारत आहे. त्यांनी अनेकदा महानगरपालिकेला विनंती केली कि ही जिर्ण इमारत कधी ही पडु शकते. त्याची एक भिंत बाजुच्या घरावर ही पडली त्या व्यक्तिनी आयुक्तांना पत्र दिले

श्रीमती आभा पांडे :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या किती जिर्ण इमारती अश्या आहेत ज्याबाबत जनप्रतिनिधी सुध्दा पत्र लावले आहे कि हया इमारतीला पाडण्यात यावे परंतु पाडण्याची कार्यवाही झालेली नाही, याचा खुलासा करण्यांत यावा. कारण असे किती तरी प्रश्न आहे आमच्या ही प्रभागाचे प्रश्न आहे. तर पहिले याचा खुलासा करावा असे किती घर आहे जे पडण्याच्या स्थितीत आहे. किती लोकांनी महानगरपालिकेच्या प्रशासनाला निवेदन दिले आहे कि ही इमारत जिर्ण आहे आणि ही इमारत पाडण्यात यावी तरी त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही, पहिले या बाबीचा खुलासा करण्यांत यावा कि यावर प्रशासनाच्या वतीने कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे. अश्या किती इमारती आहे कि मा.सदस्यांनी निवेदन केल्यानंतर ही त्या पाडण्यात आल्या नाही.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, श्री शिरसागर यांचे पत्र आहे 104 वर्ष जुनी इमारत आहे त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा कोर्ट केस नाही तरी त्याला पाडण्यात आली नाही.

श्रीमती आभा पांडे :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, पहिले अश्या किती जिर्ण इमारती शहरात आहे ज्या पाडण्यात आल्या नाही, आधी या बाबीचा खुलासा करण्यांत यावा.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :– मा.महापौरजी, आता मा.सदस्यांनी जो प्रश्न याठिकाणी विचारलेला आहे कि किती जनप्रतिनिधींची पत्र आहे ते काढायला थोडासा वेळ लागेल किमान 3 ते 4 दिवस तरी लागेल कारण वेळेवर आलेला हा विषय आहे किती इमारती नागपूर शहरात जिर्ण आहे त्याची आकडेवारी आम्ही देवू शकतो त्यामध्ये नेमके किती जनप्रतिनिधीचे पत्र लागले आहे त्यासाठी रेकॉर्ड शोधुन माहिती दयावी लागेल.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, मी आपणांस निवेदन करते कि ती माहिती आल्यानंतर सर्व मा. सदस्यांना वितरीत केल्यानंतर हा विषय सभागृहाच्या पटलावर ठेवावा. जेणेकरून अन्य नगरसेवक याबाबतीत आपली समिक्षा करतील व विषय ठेवतील.

श्री.संदिप जोशी :– मा.महापौरजी, मला एक बाब आपल्या माध्यमातुन प्रशासनाकडुन जाणुन घ्यावयाचे आहे कि लोकप्रतिनिधीनी सांगीतले कि हे जिर्ण घर पाडायचे आहे म्हणुन आपण पाडतो काय ? हे आपणास कळले पाहिजे म्हणजे लोकप्रतिनिधीनी सांगायचे व प्रशासनाने कार्यवाही करायची असा होते

काय ? यामध्ये कोण कोणते विषय समाविष्ट असतात सभागृहाच्या पहिल्या बाकापासुन तर शेवटच्या बाकापर्यंत बसलेल्या सर्व मा.सदस्यांना माहित आहे कि कसे पत्र जाते कोणाचे पत्र जाते हे सर्वांना माहित आहे. केवळ लोकप्रतिनिधींनी सांगीतल्यामुळे इमारती पाडल्या जाते काय ? त्याचे काय स्ट्रक्चरल आहे त्याची इंजिनिअरकडुन तपासणी केली जाते काय ? काही आर्केटेक्टकडुन त्याची तपासणी केल्या जाते काय ? एकंदरीत या सर्व बाबीची माहिती द्यावी व मग मा.सदस्य श्री संदिप सहारे यांच्या प्रश्नावर चर्चा पुढे न्यावी.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :– मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार एखादी इमारत जिर्ण असेल तर त्याच्याबाबत झोनच्या उपअभियंता कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या इमारतीला नोटीस दिल्या जाते व नोटीस दिल्यानंतर त्या नोटीस मध्ये 2 ते 3 गोष्टी आहे ती इमारत पाडण्यायोग्य आहे किंवा दुरुस्त करण्यायोग्य आहे याची शहानिशा केली जाते. ती राहण्यायोग्य होत असेल तर ती दुरूस्त करण्याच्या सूचना देण्यांत येते. मात्र जेथे पर्याय नाही ती पाडायचीच आहे त्या नोटीसचा पिरेड संपल्यानंतर प्रशासनाने ती कारवाई करायची असते या प्रकरणाची तपासणी आम्ही करतो तेव्हा असे लक्षात येते कि प्रशासनानी नोटीस दिल्यानंतर जिथे काही वाद नाही जिर्ण इमारत बरोबर पडते किंवा पाडल्या जाते. मात्र ज्याठिकाणी किरायेदार रिकामे करुन घ्यायसाठी ज्या कलमाचा प्रयत्न केला जातो ते रिकामे करुन घ्यासाठी ब–याच टेक्नीकल अथॉरिटीने स्पष्ट अभिप्राय दिला तर ती इमारत पाडण्या योग्य नाही, तर ती पाडण्याचे काही प्रयोजन नाही जर घरमालकांनी त्या केसेसमध्ये दुरुस्ती करुन घ्यावयाच्या आवश्यकतेप्रमाणे तर अशा केसेसमध्ये ते पाडल्याचे कुठलेही प्रयोजन राहत नाही. सन्माननिय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे किरायदार कुठेतरी कोर्टात जातो आणि केस असल्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहणे आवश्यक राहते. या संदर्भात पावसाळयाच्या पुर्वी सर्व सहा.आयुक्तांना निर्देश देण्यांत आले होते, आणि आम्ही स्वतः फॉलोअप घेतो की या महिन्यात किती इमारती पाडल्या आहेत, माझ्या माहितीप्रमाणे एक सर्वात मोठी इमारत या महिन्यामध्ये आपण पाडलेली आहे ती केस ब–याच वर्षापासून प्रलंबित होती. आणि मी आश्वस्त करु इच्छितो सभागृहाला ज्या काही नोटीसेस पेंडींग आहे आहे आकडेवारी दिलेली आहे ज्या खरच जिर्ण आहे त्या केसमध्ये डिसपूट नाही त्या केसमध्ये यादृष्टीने सहा.आयुक्तांना सुध्दा सूचना देण्यांत आलेल्या आहे त्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी. असा एक प्रोग्राम चॉक आउट करून आपण हे काम करणार आहे.

श्री.संदिप सहारे :– मा.महापौरजी, आताच मा.कुंभारे साहेबांनी सांगीतले कि जे शिकस्त इमारतींचे प्रकरण कोर्टामध्ये सुरू आहे त्याच्याबाबतीत मी काही बोलणार नाही परंतू असे काही प्रकरणे आहे की न्यायालयाने तोडण्याचे आदेशही दिले आहे. कमाल चौक येथे 2011 मध्ये सिध्दीकी साहेबांनी तोडण्याचे आदेश दिले होते ते कोठेही न्यायालयामध्ये गेलेले नाही. आमची टिम तेथे तोडायला जाते आशीनगर झोन चे सहा.आयुक्त तसेच तेथे पोलीसांचा ताफा असतो आणि ते तसेच्या तसे वापस येतात. कां वापस आले त्यांनाच माहिती, 2016 ला जैयस्वाल यांची बिल्डींग तोडण्याकरिता 24 तासाची आमचे कार्यालय नोटीस देते आणि 24 तासाची नोटीस दिल्यानंतर 2016 ला नोटीस देतो आणि 2017 ला मागच्या महिन्यामध्ये बिल्डींग तोडण्याकरिता पोलीसांची टिम आणि जे.सी.बी.आणि कर्मचा–यांची गॅंग राहते आणि ते ही न तोडता वापस येते याला आम्ही काय म्हणणार आहे. येथे 104 वर्ष जुनी इमारतीची गोष्ट केली आहे शिरसागर यांची, तो कोर्टामध्ये गेला आणि कोर्टामध्ये जाण्याकरिता दोषी कोण तर जेव्हा आपण त्यांना नोटीस देतो 16.09.2010 ला 7 वर्ष आधी त्याला 7 दिवसाची नोटीस देतो आणि 7 दिवसामध्ये तोडायला पाहिजे तर आम्ही ती 7 दिवसात कारवाई करीत नाही. त्यांना 2–2, 3–3 वर्षाचा अवधी देतो आणि त्याच्यामुळे बाकीच्या लोकांना कोर्टामध्ये जावे लागते आणि यामुळे एखादी जिर्ण इमारत पडली आणि तेथे काही लोक मृत्युमखी पडले तर त्याला जबाबदार राहणार कोण जेव्हा शाम वर्धने साहेब आयुक्त होते आपण तेव्हा उपायुक्त होते तेव्हा आपण स्वतः ऑर्डर काढले होते परंतु आपण काढलेल्या ऑर्डरलाही प्रशासनानी कच–याची टोपली दाखविली आहे. आणि ती गोष्ट आपण उपायुक्त म्हणुन या महानगरपालिकेत होते तेव्हाची आहे. आपणास सांगतो महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी असतील तितकेच महानगरपालिकेच्या पॅनलवर ज्या वकिलांची नेमणुक केली आहे, ते ही दोषी आहे. जेव्हा चंद्रकांता शिवाजी रामटेके यांच्या प्रकरणामध्ये ऑडिट रिपोर्ट सादर होते तेव्हा आमचे वकिल त्या रिपोर्टला सपोर्ट

करीत नाही. दुसरे वकिल विरोध करतो आणि आमचे वकिल शांत बसुन राहतात. कारण कि ज्या वकिलाला आम्ही पॅनलवर घेतले आहे ते वकिल कोर्टात जात नाही, त्यांचे असिसटेंट जातात, आम्ही हजारो करोडो रूपये वकिलांच्या पॅनलवर खर्च करून राहिलो आहे, व आजपर्यंत महानगरपालिका अश्या प्रकरणामध्ये जिंकलेली नाही. आपणांस सांगतो याच सदनामध्ये मागील दिवसामध्ये भावतकर नावांचे क्लीनिक आपण बंद केले, काय झाले त्या क्लीनिकचे आपल्याच एका पॅनलच्या वकिलांनी त्यांची सील उघडायला सांगीतली व त्याचे सामान वापस दिले ही कुठली पध्दत आहे. मागच्या सभागृहाचा तो प्रश्न आहे खरच ज्यांची इच्छा असेल हे तोडायला पाहिजे तर निश्चितच ते तोडु शकतात. आमच्या अधिका—यांकडुन वेळ मारून नेण्यात येते यावर आपण उपाययोजना केली पाहिजे आणि येणा—या सभागृहामध्ये किती इमारती पाडल्या त्याची माहिती आपण येथे सादर केली पाहिजे.

**<u>ठराव क्रमांक 88</u>:—** नागपूर महानगरपालिकेच्या मौजा—नागपूर खसरा क्र. 615/2 या जागेवरील प्राथमिक शाळेकरिता असलेले आरक्षण क्र. ME-28 चे फेरबदल करुन खेळाचे मैदान यास्तव आरक्षित करण्याबाबत मा. सभागृहाने ठराव क्र. 57, दि. 20.06.2017 च्या सभेत हा ठराव मंजूर करण्यात आला. जागेचे आरक्षण क्र. ME-28 असे करण्यात आले. याकरिता मा. महापौर यांना दि. 25.07.2017 चे पत्रानुसार या जागेचे आरक्षण क्र. ME-28 ऐवजी आरक्षण क्र. ME-26 प्राथमिक शाळेचा वापर बदलवून खेळाचे मैदान (PG) असे पत्र देऊन पत्रात उल्लेख केलेले आरक्षण क्र. ME-28 ऐवजी आरक्षण क्र. ME-26 या याप्रमाणे दुरुस्ती करुन फेरबदल प्रस्ताव खेळाचे मैदान (PG) असे करण्याबाबत विनंती केलेली आहे. महानगरपालिकेच्या नगररचना विभागा मार्फत मौजा – नागपूर खसरा क्र. 615/2 या जागेवर आरक्षणाचा फेरबदल प्रस्ताव सादर केल्याप्रमाणे येणाऱ्या महासभेच्या सभागृहात हा विषय, विषय पत्रिकेत घेण्यात यावा. उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 89</u>:—** नागपूर महानगरपालिकेच्या विभिन्न विभागांतर्गत व्यावसायिक दृष्टीकोनातुन माहिती अधिकारा अंतर्गत विचारण्यात आलेल्या प्रश्नानुसार प्राप्त माहितीचा दुरुपयोग करुन त्याचा गैरवापर करणाऱ्या समाजकंटकावर अंकुश घालण्याकरिता सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना प्रशासनामार्फत शासनाला कळविण्यात याव्यात या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने मान्यता प्रदान केली.

श्री सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत व्यावसायिक दृष्टीकोनातून माहिती अधिकारान्वये विचारण्यात आलेल्या माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन त्याचा गैरवापर करणा—या समाजकंटकांवर अंकुश घालण्याकरिता सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये नोटीस दिलेला आहे. मा.महापौरजी, तत्कालीन सरकारने जनता की सुविधा के लिये और शासकीय काम जनता के जल्द हो, इसलिये आर.टी.आय. का ॲक्ट लागु किया। आर.टी.आय. का जो उद्येश था वह बहोत ही सराहनीय था लेकिन कालांतर मे हम देखते है कि, इस ॲक्ट की आड मे अनेक समाजकंटक सक्रिय हो गये है। जो लोग विभागो से माहिती प्राप्त करके उसका दुरूपयोग करते है, और जनता और अधिकारीयो को ब्लेकमेल करते है। हमारे कर्मचारी जो है उनका अधिकांक्ष समय वह पुछे गये प्रश्न उनका उत्तर देने मे और उत्तर देने के बाद जो पूरक प्रश्न आते है उसका उत्तर देने मे उनका अधिकांक्ष समय चला जाता है। इससे जो रूटीन वर्क है वह काम करने मे उनको समय का अभाव होता है। मेरा निवेदन है कि इस विषय पर बहोत सारे मा.सदस्य बोलने वाले है और हमारे अधिकारी वर्ग इससे त्रस्त है। मैं सिर्फ यह कहना चाहुंगा कि राजस्थान हायकोर्ट का भी इस विषय पर निर्णय हुआ, और देश के अन्य अलग अलग कोर्टो मे भी इस विषय पर कई निर्णय हुऐ है। यह सब आदेशो का निर्णयो का हमने संकलन करना चाहिये, इन सब निर्णयो का अभ्यास करके अधिकारीयो की और हो सके तो जनप्रतिनिधीयो की एक समिती गठित की जाये। और जो इसके अंतर्गत आगे की जो कार्यप्रणाली रहेगी उसमे हम क्या सुधार कर सकते है सिर्फ जनता को सुविधा प्राप्त हो, समाजकंटको को कैसे इससे दुर रख सकते है इन सारी चिजो का विचार करके, और बाकी जो मा.सदस्य इस विषय मे

अपने विचार रखेगे उन विचारो का समावेश करे। एक अच्छा आर.टी.आय.ॲक्ट जिससे लोगो को फायदा हो, और समाजकंटक भी उससे दुर रहे, इस बात पर विचार होना चाहिये।

श्री कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, असे जे ब्लॅकमेलर आहे त्यांना टेस्ट करण्यासाठी आपली टेस्टींग लायब्रेरी आहे काय ? अश्या लोकांना आपण कसे ओळखणार आहे.

श्री प्रफुल गुडधे :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, याठिकाणी मा.सदस्य श्री अग्रवाल यांनी विषय ठेवला, हा जो विषय आहे तो आर.टी.आय. ॲक्टमध्ये केंद्रानी तयार केलेल्या एखाद्या कायद्याची अंमलबजावणी कश्यापध्दतीने करावी, यासंबंधात काही सूचना केंद्राला करण्याचा या सभागृहाला अधिकार आहे काय ? प्रशासन याकरिता सक्षम आहे काय ? याची माहिती आपण प्रशासनाकडुन घ्यावी.

अपर आयुक्त (श्री कुंभारे) :– मा.महापौरजी, माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा केंद्राचा कायद्या आहे, या कायद्यात काही बदल करावयाचे असतील किंवा या कायद्याबद्यल काही निर्देश करावयाचे असतील तर ते उच्च न्यायालय, केंद्र शासन हेच करू शकतात. वेगवेगळया हायकोर्टाचे जे काही निर्णय झालेले आहे, त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या समान्य प्रशासन विभागानी शासन परिपत्रक निर्गमित केलेला आहे. शासनाचा परिपत्रक दिनांक 17 ऑक्टोबर 2014 चा आहे, त्यात त्यानी वेगवेगळया न्यायालयाचे निर्णयाचा गाभा आहे. एकंदर ही पार्श्वभुमी लक्षात घेता सर्व विभागाना सूचित करण्यांत येते कि वरील प्रमाणे माहितीच्या अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याच्या दृष्टीने व्यापक आहे ती देता येईल परंतु व्यक्तिगत बाबीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती माहिती अधिका–यावर बंधनकारक नाही. शासनानी हे परिपत्रक काढलेला आहे, याची अंमलबजावणी झाल्यास मा.सदस्यांचे जे म्हणणे आहे. त्यानुसार व्यक्तिगत माहिती त्या व्यक्तिच्या संम्मती शिवाय कोणालाही देता येणार नाही.

श्री सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, मा.प्रफुलजी ने जो कहां वह मुझे भी मालुम है कि वह अधिकार हमको नही है। मेरा वक्तव्य पुरा होने के पहले ही उन्होने प्रश्न उठाया, मेरा कहना यह था कि यदि कर सकते है तो जो राजस्थान हायकोर्ट का आदेश है या जो शासन का निर्णय हो उसकी समिक्षा करके चिफ इन्फॉर्मेशन कमीश्नर को आग्रह कर सकते है क्या ? ऐसा मैंने विषय रखा था, और बाकी भी मा.सदस्य इस विषय पर बोलना चाहेंगे उनका सुनने के बाद मे आप इस विषय पर विचार करे।

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, अग्रवाल साहेबांनी जे म्हटले समाज कंटकांवर अंकुश घालण्यासाठी त्यांना असा काही अनुभव आलेला आहे काय काही समाज कंटक या कायद्याचा दुरुपयोग करीत आहे. त्यांच्या जर नोंदीमध्ये असेल तर सभागृहाला त्यांनी माहिती दयावी.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, सुनिल भय्याचा जो विषय आहे तो एका सद्भावनेतून आहे. त्यामुळे कायदा बदलू शकत नाही, तो सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे, केंद्र सरकारचा निर्णय आहे परंतू असे जर वारंवार घडत असेल तर जे कुंभारे साहेबांनी सांगितले की कुठल्याही त्रयस्थ माणसांची वैयक्तीक माहितीची मागणी करीत असेल तर ती देणे आपल्याला बंधनकारक नाही याच्यातच ते उत्तर आहे त्यामुळे वेगळे काही कारण सांगायचे गरज नाही. त्रयस्थ भावनेतून असे होत असेल म्हणजे शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण ते बघावे तशी सुनिल भैय्याची विनंती आहे आणि प्रफुल्ल गुडधे यांची विनंती आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, कायद्यामध्ये स्वयंस्पष्ट आहे की कुठल्या प्रश्नावर उत्तर दयावे, कश्यास्वरूपात द्यावा, त्याची कार्यपध्दती काय असली पाहिजे, ते नमूद आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, यात दुसरा मुद्या असा आहे की आपले अनेक अधिका–यांचा वेळ माहितीच्या अधिकार आणि उत्तर देण्यामध्ये जातो मग वरचा खालच्यांना सांगतो खालचा आणखी खालच्यांना सांगतो मग यासाठी काही वेगळा स्टाफ वेगळा टेक्नीकल अधिकारी आपल्याला नेमता आला तर इतर अधिका–यांचा त्रास आपल्याला कमी करता येईल या संदर्भात निश्चितच काही चांगले पाउल उचलावे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, या माहिती अधिकाराचा त्रास कर्मचा–यांना व अधिका–यांना असतो त्यामध्ये त्यांचा खूप वेळ जातो. आपण सरकारला किंवा न्यायप्रविष्ठेला अशा काही सूचना करु शकतो काय एवढीच विनंती मा.अग्रवाल साहेबांची आहे व माझे त्या विषयाला समर्थन आहे.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, ये जो नोटीस विषय क्र 73 आदरणिय अग्रवालजी ने लगाया यह बात उतने ही सच है जो आदरणीय प्रफुल भाई ने कही कि हम उसमे कुछ सुधार नही कर सकते।

लेकिन मा.महापौरजी, समाज कंटक की परिभाषा क्या है ? मा.महापौरजी, नागपूर शहर के हद मे 10 झोन मे से  बहोत सारे ऐसे झोन है जहॉ अधिकारी भी पिडीत है, जनता भी पिडीत है और नगरसेवक भी पिडीत है इन समाज कंटको की वजह से। मा.महापौरजी, मै उदाहरण देना चाहती हुॅ अगर आप सबुत पुछेंगे तो मै सबुत भी इस सभागृह मे पेश करना चाहती हुॅ मा.महापौरजी मैने कभी भी बिना तथ्तो के आधार पर मैने कभी भी संभाषण नही दिया या उद्‌बोदन नही दिया। और आज भी बिना तत्थ्य के या बिना आधार के मै आपसे बात नही कर रही हुॅ। मा.महापौरजी, सतरंजीपूरा झोन यहा आये दिन ऐैसे समाज कंटको का और बहोर सारे ऐसे सफेदपेशो का जमावडा लगा रहता है। यह समस्या  को वही समज सकता है जो इसका भुक्तभोगी है। मा.महापौरजी जिस समय राऊतजी हमारे सतरंजीपूरा झोन के सहा.आयुक्त थे। एक दिन मै किसी काम के लिये ज्यु.इंजिनिअर जहॉ पर बैठते है वहापर गयी मा. महापौरजी वहा का दृश्य देखकर मै अचंबित रह गयी, एक व्यक्ती आया मै मनसे का पदाधिकारी हुॅ, जे.ई के चेअर पर बैठा आणि म्हणतो की मी हा माहितीचा अधिकार विचारला होता कुठे गेला, मा.महापौरजी मैने उस व्यक्ती को झापा मैने बोला वह कनिष्ठ अभियंता है लेकिन उसकी इज्जत करना पडेंगा आपकों और किसी नगरसेवक के सामने किसी अधिकारी की बेईज्जती जो की हम पसंद नही करेंगे। मा.महापौरजी ऐसे समाजकंटक यह पत्र लगाते है यहा इल्लीगल बांधकाम है वहा इल्लीगल बांधकाम है , रहते कई और है इन समाजकंटक का एक ही काम है सफेद कपडे पहन के बढिया सुबह अपनी स्कुटी या ॲक्टीव्हा लेकर निकलते है और जहॉ गिट्टी, मिट्टी, ईटा जो जो भी सामुग्री रहती है मकान को बनाने की देखते है की कहॉ कहॉ काम चालू है और पूछते है कौन है मालक क्यौकि बाजू वाला पहलेसेही त्रस्थ रहता है और वह बताता की फलाना फलाना का बांधकाम है, ठीक आहे आणि अधिका—यांना सांगून टाकतो की पार्टी तूमच्याकडे आली की तुम्ही सांगुन दयायचे की हे पत्र आहे मा.महापौरजी ऐसे समाजकंटकोने सतरंजीपूरा झोन मे पत्र लगायें है मुझे इससे परेशानी है इसने इल्लीगल बांधकाम किया है और वही समाजकंटकोने बाद मे वही पत्र लगाया आमचे या बाबतीत समाधान झालेले आहे.

श्री.प्रफुल गुडधे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, मा.आभाताईनी ज्या समाजकंटकाचा उल्लेख या ठिकाणी केला आहे त्याचे नाव पण सांगून दिले तर बरे होईल.

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, प्रशासना जवळ सगळी माहिती आहे आणि प्रशासनाला काहीच सांगायची गरज नाही. येथे बसलेल्या सर्व नगरसेवकांना सगळी माहिती आहे.

श्री.तानाजी वनवे :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, या विषयावर अवाजवी चर्चा होत आहे जो अधिकार आपल्याला व सदनाला असेल तर त्याच्यावर चर्चा करावी अन्यथा हा विषय संपवावा

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, सतरंजीपूरा झोनमध्ये मा.सहा.आयुक्त श्री.वराडेजी येथे बसले आहे अशा समाज कंटकांची जनतेनी अशी धुलाई केली 2 महिन्या अगोदर की जो समाजकंटक येत होता तो समाजकंटक आता घाबरला आहे आणि आता तो दूस—याच्या नावांनी पत्र देत आहे. कभी कभी ऐसा लगने लगता है की कही कूछ मिली भगत तो नही है कही कही ऐसा लगता है की अधिकारीयो की मिलीभगत तो नही क्योंकी हम उनसे बात करने को बोलते है तो वह कहते है कि त्यांचा पत्र आला, दोन वेळा आला ऐसा हमे  बताते है। मा.महापौरजी इस विषय को गंभीरता से लेना चाहिंये अधिकारी ने अगर मै किसी के घर के बाजू मे रहती हुॅ अगर उसने अवैध बांधकाम किया तो मेरे को तकलिफ हो सकती है अगर मै धरमपेठ मे रहती हुॅ तो इतवारी मे कैसे प्रॉब्लेम हो सकती है। कही ना कही सब चिजें दिखाई देती है। इसिलिये मेरा यह मानना है ऐसे समाज कंटको की यादी बनाकर हमने विधी विभाग को भेजना चाहियें। म्हणुन कुणी तरी याची दिशाभुल सुध्दा केली होती की अन कॉन्स्टीटयुशनल हा विषय आहे. हा अन कॉन्स्टीटयुशनल विषय नाही आहे कारण माहितीच्या अधिकाराला बंद करण्याकरिता विषय नाही आणला आहे. माहितीच्या अधिकारामध्ये जे समाजकंटक आहे ते अशी दिशाभुल करीत आहे की ज्याच्यामध्ये अधिकारी सुध्दा घोळले जातात हा असा प्रकार होवू नये म्हणुन आपण निर्देश दयावे आणि अशा समाजकंटकांची यादी विधी विभागाला पाठविण्यांत यावी.

महापौर :— सन्माननिय सदस्यांच्या माहिती अधिकारा बद्दल ज्या तिव्र भावना आहे त्या सगळयांनी येथे व्यक्त केलेल्या आहे तो विषय गंभीरतेकडे झुकु नये यासाठी प्रशासनाला सूचित करण्यात येते की या भावना त्यांनी शासनाकडे पोहचवाव्यात.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी दि. 20.06.2017 च्या बैठकीमधले हे कार्यवृत्त आहे पान क्र 17 वर त्यामध्ये दुरुस्ती प्रस्तावित करतो. आपला प्रस्ताव नाकारत नाही आहे अशा पध्दतीचे वर्डींग आपण या ठिकाणी नोंदविलेले आहे. आणि त्यानंतर दुस—या दिवशी वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या त्यामध्ये आपले एका वर्तमानपत्रामध्ये आपले व्हर्जन आहे. स्थगन प्रस्तावावर विषय पत्रिकेनंतर चर्चेची तयारी होती मात्र सदस्यांना ते अमान्य होते महत्वाचे विषय असल्यामूळे त्या विषयावर चर्चा होणे आवश्यक होते मात्र त्यांनी हट्टीपणा केला, गोंधळ घातला त्यामुळे स्थगन प्रस्ताव नाकारला शिवाय स्थगन प्रस्ताव नियमानुसार वेळेत न आल्यामुळे तो नाकारला, मा.महापौरजी आपण आपल्या प्रोसेडिंग मध्ये म्हटले आहे की आपला स्थगन प्रस्ताव नाकारत नाही आहे आणि सभा संपल्यानंतर पत्रकार परिषदेमध्ये म्हणता की मी प्रस्ताव नाकारलेला आहे. मा.महापौरजी तुम्ही सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. आपण एका जबाबदार पदावर बसलेल्या आहेत. आपल्याला या सभेचे संचालन करायचे आहे, आपण या सभागृहाच्या नेत्या आहेत मा.महापौरजी, आणि आम्ही जो काही प्रस्ताव आणतो ज्या काही नियमाअंतर्गत चर्चा करतो तो आमचा अधिकार आहे आणि ही सभा संचालन करण्याची जबाबदारी आपली आहे आणि दुस—या दिवशी वर्तमानपत्रामध्ये वेगळया प्रकारच्या बातम्या येतात मा.महापौरजी सत्तापक्ष नेत्यांचे या ठिकाणी वर्जन आहे स्थगन प्रस्ताव सभा सूरु होण्याच्या तास भ—यापुर्वी देणे आवश्यक आहे परंतू 11 वाजून 20 मिनिटाला स्थगन प्रस्ताव देण्यात आला इतर विषयानंतर या विषयावर चर्चेची तयारी होती परंतु विरोधकांनी गोंधळ घालत सभा उडवून लावली त्यामुळे सत्ताधारी बाकांवरील नगरसेवकांनाही अतिवृष्टीवर चर्चा करता आली नाही. म्हणजे अतिवृष्टी इतकी महत्वाची होती मात्र प्रफुल गुडधे या सदस्यांने गोंधळ घालून अतिवृष्टी वरची चर्चा उधळून लावली अशा प्रकारचा सर्व सामान्य समज शहरामध्ये वर्तमानपत्राच्या माध्यमातून दुस—या दिवशी गेला म्हणून मा. महापौरजी आपल्याला आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल आपण सभागृहामध्ये जो निर्णय घेता तो आपण वर्तमानपत्रामध्ये ब्रिफ केला पाहिजे. सभागृहामध्ये एक निर्णय घ्यायचा आणि वर्तमानपत्रामध्ये दुसरे ब्रिफींग करायचे मा.महापौरजी त्यामुळे या सभागृहाची गरिमा जाते. मा.महापौरजी मी आपला अत्यंत आदर करतो मात्र सभा संचालन करतांना आपल्याला तो आदर कमवून ठेवावा लागणार आहे अशा पध्दतीने चूकीच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापून एखादया सदस्यांची प्रतिमा मलिन करण्याचे काम मा.महापौराकडून होत असेल तर नगरसेवकांच्या संरक्षण करण्याची जबाबदारी आपण स्विकारलेली आहे मात्र आपण ती जबाबदारी पार न पाडता तो विरोधी पक्षाचा सदस्य आहे म्हणुन पक्ष अधिवेश बाजूला ठेवून मी पक्षीय राजकारणासाठी हा प्रस्ताव आणलेला नव्हता मा.महापौरजी, आणि आपणनही या पक्षाचे महापौर नाही आहे आपल्याला ज्या पक्षाने महापौरपदी आरुढ केले असेल तरी पण आपण या शहराचे महापौर आहे या सर्व नगरसेवकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे हे करीत असतांना स्थगन प्रस्ताव पाण्याच्या संदर्भामध्ये ज्यावेळी मांडला लोकांच्या घरामध्ये पाणी घूसन राहिले त्यावेळेस आपण मतदान घेवून राहिले आणि आपण ते मतदान घेवून नाकारत आहे मा.महापौरजी, आणि कारण असे दिले की प्रशासनाकडून अशी कुठलीही माहिति उपलब्ध झाली नाही. कारण घरामध्ये पाणी घुसले नाही वर्तमानपत्रामध्ये येवून राहिले सन्माननिय सत्तापक्ष नेते, सन्माननिय दटके साहेब सर्व लोकांनी म्हटले होते लोकांच्या घरामध्ये पाणी घुसले आणि यावर आपण चर्चा होवू दिली नाही, गोंधळ घातला आणि जेष्ठ सभासदाला हे शोभणारे काम नाही, मा.महापौरजी, आपण यामध्ये सूधारणा करावी, आपले जे म्हणणे आहे ते या ठिकाणी निश्चित करावे,

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, खरे म्हणजे कार्यवृत्तांत मंजूर करणे ऐवढा सोपी विषय होता परंतू दुर्दैवाने त्या विषयाला धरुन मा.महापौरांवरती आरोप करायचे असा देखील प्रयत्न झाला. मी मा.जेष्ठ सदस्यांना आठवण करुन देवू इच्छितो की त्या सभागृहात काय झालेले होते आपला प्रस्ताव जेव्हा मिळाला त्यावरती 11 वा. 20 मि. ची वेळ टाकण्यात आलेली होती याचा अर्थ असा आहे की आपण प्रस्ताव 11 वा. 20 मि. दिला. आपण त्यापूर्वी मेल केले मान्य आहे मेल कोण वाचते मी तर वाचत नाही आणि मा.महापौर वाचत नाही. आपण फोन केले परंतू ते देखील चालले नाही या ठिकाणी चर्चा झाली त्यावेळी मा.महापौरांनी एक विषय वारंवार म्हटला होता की हा विषय अत्यंत महत्वाचा आहे आणि या विषयावर सर्व पक्षांच्या सदस्यांना यावर चर्चा करायची आहे. परंतु या विषयावर आताच चर्चा केली पाहिजे, मला स्थगन प्रस्ताव किंवा सर्व विषय माहिती आहे मला संसदीय सर्व आयुध माहित आहे त्यामुळे या सर्व संसदीय आयुधांचा वापर मी केला पाहिजे. आणि ते माझ्या नावांवर आले पाहिजे अशा पध्दतीची जर भूमिका असेल तर ती

भूमिका अत्यंत चूकीची आहे. कारण असे आहे की मा.महापौरांचा हा अधिकार आहे आपण म्हणतो की आपण मा.महापौरांचा आदर करतो मा.महापौरांनी ठरविले की या विषयांवर आपण चर्चा करु परंतू ज्यावेळी आपण मा.महापौरांचा आदर करतो असे म्हणतो, ज्या वेळी आपण महापौर हे सर्व सभागृहाचे आहे हेही म्हणता त्यावेळी विषय पत्रिकेच्या चिंध्या मा.महापौरांवरती फेकता हे देखील बरोबर नाही म्हणजे केवळ बोलत असतांना मा.महापौरजी मी आपला आदर करतो मग मा.महापौरांवरती विषय पत्रिका फाडून फेकता काय ? आपण हा आदर करता काय? माझी विनंती आहे सभागृहाला ते केवळ चूक आहे मा.महापौरांनी हेच म्हटलेले होते प्रस्ताव स्विकारत नाही. विषय संपूर्णतः संपलेला आहे आणि दुसरी गोष्ट प्रफुल्लजी तुम्ही इतके सिनिअर आहे तूमची इमेज इतकी चांगली आहे एखादया वर्तमानपत्रातील एखादया बातमीने तुमची इमेज बदलायची काहीच गरज नाही. अत्यंत सुंदर पेपर कटींग्ज आपल्याजवळ आहे त्यामुळे हा टेक्नीकल विषय आहे त्यामध्ये चूक झालेली आहे त्याला मान्यता दयावी अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी सत्तापक्ष नेत्यांनी सांगितले तो जो स्थगन प्रस्ताव आला तो 11.29 ला आला मा.महापौरजी या ठिकाणी प्रोसिडींग मध्ये अशा संदर्भातला कोठेही उल्लेख नाही. महानगरपालिकेचे कामकाज हे प्रोसेडींगने चालते माझा अट्टाहास त्यांनी जो नोंदविला की या संपूर्ण सांसदीय आयुधांचा वापर एकटयाला माहीत आहे आणि आणि तो माझ्या नावांनीच झाला पाहिजे हा अट्टाहास माझा अजिबात नाही मा.महापौरजी, मात्र हा अट्टाहास अशा प्रकारे आहे की याची माहिती नविन सदस्यांना झाली पाहिजे. नविन सदस्य बहुतांश भारतीय जनता पार्टीचे आहे मा.महापौरजी, आज स्थगन प्रस्तावाची नोटीस दिल्याबद्दल प्रशासनाला 3 महिन्यानंतर जाग आली आणि सभागृहामध्ये कामकाज नियमावली देण्याची आवश्यकता भासली.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन,जी नियमावली आहे ती प्रत्येक सदस्यांच्या घरी तेव्हाच पोहचली आहे आज हे आपण दुस—यांदा देत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, हे या अगोदर माझ्या घरी केव्हा पोहचले या संदर्भात माहिती दयावी.

निगम सचिव :— मा.महापौरजी, हे जे सदन आहे हा सदन जेव्हा पहिल्यांदा बसला तेव्हा गव्हर्नमेंटचे गॅजेट नोटीफिकेशन यायचे होते ते कव्हर लागलेले नव्हते ती प्रत सदस्यांना दिलेले आहे. आणि आज जो महाराष्ट्र महानगरपालिका ॲक्ट सर्व सदस्यांना दिलेला आहे कारण गर्व्हनमेंटची जी प्रत होती ती बुक डेपोमध्ये उपलब्ध नव्हती आता उपलब्ध झाल्यामुळे ती सर्व सदस्यांना दिली आणि जी सभेच्या कामकाजाची नियमावली देत आहे ती दुस—यांदा देत आहोत.

श्री. प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, जर त्या दिवशी पाठविली असेल तर निश्चितपणाने चांगली गोष्ट आहे. मात्र अजूनही बहुतांश लोक मान्य करायला तयार नाही. मग याचा वापर कमीत कमी होत आहे मा. महापौरांनी या निमित्ताने त्याचा वापर झाला. आपल्या जवळ खूप मोठा ग्रंथ आहे आणि आपण वाचूनच नाही राहिलो त्यावर अक्षदाच टाकून राहिलो तर हे बरोबर होणार नाही, वर्षोनुवर्ष आपण अक्षदाच टाकत राहिलो म्हणून त्याचा वापर केला नाही म्हणून ही अवस्था झाली. दुसरा महत्वाचा मुद्या हा काही तांत्रिक मुद्या नाही मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेता जेवढया सहजतेने बोलत आहे त्यामध्ये शब्दाची चूक झाली आपला प्रस्ताव नाकारत नाही आहे असे मा.महापौरांनी म्हटलेच नाही नाकारण्यात येते असे म्हटले मात्र चूकीने असे छापून आले ऐवढी काही साधी गोष्ट नाही मा.महापौरजी मी निश्चितपणाने सांगतो सर्व सभागृह या ठिकाणी साक्षीदार आहे आपले वर्डीग जसे आहे तसेच आले मा.महापौरजी, आपण जे म्हटले आपला प्रस्ताव नाकारत नाही आहे कारण त्याच्या अनुषंगाने बाकीचे जे खाली लिहीले आहे. ते तसेच आहे कारण सदस्यांच्या भावना तिव्र आहे म्हणुन आपण माझा प्रस्ताव नाकारलेला नाही मात्र आपण स्वीकारला ही नव्हता म्हणून त्याचा निषेध नोंदविला आणखी एक महत्वाची गोष्ट मा.महापौरजी सत्तापक्ष नेत्यांनी म्हटले की मा.महापौरांचा आदर करतो एकीकडे म्हणायचे आणि कागदाच्या चिंध्या करुन भिरकावून बाहेर निघुन जाणे हे आपल्याला शोभत नाही. हे मला शोभत नाही निश्चीतपणाने त्या दिवशी न शोभणारी गोष्ट केली मा.महापौरजी मी खुल्या दिलाने कबूल करतो की त्या दिवशी 14 वर्षाच्या या सभागृहाच्या कारकीर्दमध्ये मी कधीही ही गोष्ट केली नव्हती पण हे करीत असतांना आपण प्रोसिडींग वाचा मा.महापौरजी माझा अट्टाहास काय होता की आपल्याला अधिकार पुर्ण आहे या नियमावली अंतर्गत आहे आज जी

प्रक्रीया अवलंबली त्या दिवशी सुध्दा ती प्रक्रीया अवलंबिता आली असती मात्र सभा चालू झाल्यापासून 11 वाजून 29 मि. तो प्रस्ताव मिळाला असे टेक्नीकल आणि खोटे कारण सांगून आपण या संदर्भामध्ये माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला म्हणून हा जो अधिकार आहे तो प्रत्येक सदस्यांचा अधिकार आहे ऐवढा साधा विषय नाही फक्त तांत्रिक चूक दुरुस्त करण्याची मा.महापौरजी, याआधी अनेकदा सभागृहाचे प्रोसेडिंग बदलल्या जात होते.

श्री.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, वर्तमान पत्रातील बातम्या या डॉक्युमेंट होवू शकते काय? हा माझा पहिला प्रश्न आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, या ठिकाणी प्रेक्षक दिर्घा सुरु केलेली आहे संसदीय कामकाजामध्ये तुमच्या पत्रकार दिर्घा असतात, प्रेक्षकांना आपल्याला तेथे अलाव्ह करायचे आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी माझा प्रश्न साधा आहे वर्तमान पत्रातील बातम्या या डॉक्युमेंट होवू शकते काय?

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी यांच्या मुद्यावर माझा हरकतीचा मुद्या आहे की वर्तमान पत्रातील बातम्या सभागृहाचे वृतांतन करण्यासाठी वर्तमान पत्रकारांना आपण गॅलरी उपलब्ध करुन दिली आहे आणि या गॅलरी मध्ये या पत्रकारांच्या बातम्यांवर विश्वास नसेल याचा अर्थ पत्रकार खोटे बोलत आहे असा अर्थ होतो काय? मा.महापौरजी, ही वर्तमान पत्रातील बातमी चूकीची आहे, प्रोसेंडींग चूकीचे आहे याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे म्हणून मला अपेक्षा आहे की आपण विवेक बुध्दीने काम करणा—या आहात, विवेक बुध्दीने काम करा

महापौर :— वर्तमानपत्रातील बातमी ही डॉक्युमेंट होवू शकते काय? या प्रश्नाचे उत्तर दयावे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, वर्तमानपत्रात आलेली बातमी जो पर्यत ती बातमी देणारा व्यक्ती अधिकृत व्यक्तीने दिलेली नसेल तर त्याला आपण डॉक्युमेंट म्हणून मानू शकत नाही.

श्री.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, वर्तमान पत्रातील बातमी ही कधीही डॉक्युमेंट होवू शकत नाही. कायद्यातील सारी पुस्तके चाळली तरी ते होवू शकत नाही. दुसरा मुद्या मी येथे मांडू इच्छितो की मा.प्रफुल्लजींने येथे सांगितले की येथे भा.ज.पा. चे सर्व नविन नगरसेवक आहे मी त्यांच्या निर्देशनास हे आणून देवू इच्छितो माझा पक्ष एवढा सक्षम आहे की सर्व नविन सदस्यांना प्रशिक्षण देण्याची कुवत आमच्यात आहे. आम्ही ज्या पध्दतीने प्रशिक्षण घेत आहोत त्यांनी कृपया आमच्या पक्षावर बोट दाखवू नये त्यांना काय हवे आहे ? तेच त्यांनी सभागृहात सांगावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मा.सदस्य जे बोलले आहे ते बरोबर आहे तो तुमच्या पक्षांचा अंतर्गत मामला आहे आणि तुमचा पक्ष ते करण्यासाठी सक्षम आहे त्या बद्दल मला ही काही म्हणायचे नाही. मला काय अभिप्रेत आहे नेमका प्रश्न विचारला आणि दुसरा प्रश्न यांनी विचारला की हे डॉक्युमेंट होवू शकते काय आणि मग असे चुकीचे डॉक्युमेंटेशन झाले मा.महापौराचा वर्जन चूकीचे छापण्यात आले मा. महापौरांनी त्या चुकीच्या व्हर्जनाचे खंडन करावे ही माझी मागणी या ठिकाणी आहे. वर्तमान पत्रामध्ये आलेल्या संपूर्ण बातम्या या चुकीचा आहे खोटया आहे आणि हा प्रस्ताव मी नाकारलेला होता म्हणुन वर्तमानपत्रामध्ये चुकीच्या बातम्या छापण्यात आलेल्या आहे हे खंडन करावे आणि चूक दुरुस्त करावी.

श्री.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, जी काही चूक मागच्या सभागृहात झाली मी या सभागृहाच्या निर्देशनास येथे आणुन देवू इच्छितो कॉग्रेसच्या जेष्ठ सदस्याने विषयपत्रिका फाडून मा. महापौरांवर भिरकावली, घंटा घेवून ती बडवत सभागृहात मा. महापौरांसमोरील वेल मध्ये वाजविली हीच यांची संस्कृती आहे काय? प्रभागातील जनतेने मताधिक्याने निवडून देवून त्यांच्या समस्या मांडण्यासाठी सभागृहात पाठविले आहे की ? हया पध्दतीच्या घटनाबाहय कृती करण्यासाठी? हयांच देखील उत्तर शहरातल्या जनतेला दयावं लागेल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, विषयाचे विषयांतर होत आहे.

महापौर :— सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे यांनी जे कार्यवृत्तांत सुधारणा करायला सांगितले आहे ती चुक असेल तर ती सुधारणा करण्यात यावी.

**<u>ठराव कमांक 90</u> :—** नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.06.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्तात मा. सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी माझे निर्देशावर जे वक्तव्य केले त्यामध्ये मी विषयपत्रिकेवरील विषय झाल्यावर आपण हया विषयावर चर्चा करू आता प्रस्ताव स्विकारत नाही असे म्हटले होते परंतू कार्यवृत्तात टायपिंग मिस्टेक झाली आहे ती दुरूस्त करावी. या दुरूस्तीसह कार्यवृत्त कायम करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. साधारण सभा दिनांक 20.06.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.06.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.07.2017 सकाळी 11.35 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.07.2017 सकाळी 12.10 वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव कमांक 91</u> :—** नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांच्या सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती
    1. बुधवार दि. 13.07.2017 दुपारी 02.30 वाजता चे कार्यवृत्त
2. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
    1. सोमवार दि. 05.06.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
    2. गुरुवार दि. 06.07.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
3. विधी विशेष समिती
    1. सोमवार दि. 12.06.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
4. गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती
    1. गुरुवार दि. 29.06.2017 दुपारी 03.30 वाजता चे कार्यवृत्त
5. क्रीडा विशेष समिती
    1. सोमवार दि. 17.07.2017 दुपारी 03.30 वाजता चे कार्यवृत्त
    2. मंगळवार दि. 18.07.2017 दुपारी 03.30 वाजता चे कार्यवृत्त
6. महिला व बालकल्याण विशष समिती
    1. गुरुवार दि. 15.06.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
    2. शुक्रवार दि. 30.06.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त
7. जलप्रदाय विशष समिती
    1. शुक्रवार दि. 30.06.2017 सकाळी 10.30 वाजता चे कार्यवृत्त
8. अग्निशमन विशष समिती
    1. शुक्रवार दि. 16.06.2017 दुपारी 12.30 वाजता चे कार्यवृत्त
    2. गुरुवार दि. 29.06.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **महापौर** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **नागपूर महानगरपालिका,नागपूर** |